# घटना परिषद

लेखक :

**त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर**

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
093448

ग्रंथ स्थानांक -
खल नं. -
किंमत -
दिनांक -

१९४६

किंमत दोन रुपये

– एकमेव विक्रेते –
**अ. अं. कुलकर्णी**
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
१९६।१९ टिळक रोड, पुणें २.

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

प्रकाशक :
**के. एस्. गुत्ते**
६९१ बुधवार पेठ,
पुणें २.

मुद्रक :
**एस्. व्ही. पोरे**
'चैतन्य प्रिंटिंग प्रेस'
६३६ सदाशिव पेठ, पुणें २.

नगर वाचनालय
ता.
सातारा.

# पहिलीं पानें

हिंदुस्थान घटना-परिषदेच्या शिवेवर उभा आहे. घटना-परिषदेंत सामील व्हावयास जिनांनीं नकार दिला आहे. हंगामी सरकारांतहि लीग जाणार नाहीं. अशा परिस्थितींत पुन: ' शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं ' गेले आहेत. या घडामोडीला पं. जवाहरलाल नेहरू, लॉर्ड वेव्हेल किंवा जिनांची भ्रमनिवृत्ती जबाबदार आहे किंवा काय हे कोणी सांगावे ? पण ब्रिटिश सरकारला ह्या गोष्टीचा एकदां कायमचा निकाल लावलाच पाहिजे. एक पक्ष किंवा एक जात जर कोठल्याहि घटनेवर बहिष्कार घालू लागली, प्रत्यक्ष प्रतिकाराची भाषा बोलू लागली व त्यांचे जर ऐकले गेले तर त्या पक्षाला अगर जातीला नेहमींच राजकारणाचा गाडा रोखून धरतां येईल. त्यामुळें शांततेनें सत्ता संक्रमण होणार नाहीं. त्या ऐवजीं मि. अॅटली यांनीं १५ मार्च १९४६ रोजीं पार्लमेंटांत सांगितल्याप्रमाणें [We cannot allow a minority to place their veto on the advance of a majority.] बहुसंख्य वर्गाच्या प्रगतीला अल्पसंख्याकांचा होत असलेला अडथळा चालू देतां कामा नये. त्यामुळें कदाचित् हिंदी घटनापरिषद ही फक्त एका पक्षाची होईल. त्या परिषदेला कॉंग्रेसची राजकीय परिषद असेंहि कोणी म्हणतील. पण ब्रिटिश मंत्रिमंडळाला आपले उद्गार खरे करावयाचे असतील तर त्यांनीं ही परिषद

भरू द्यावी व त्या परिषदेच्या घटनेंत (1) Adequate Provision for the protection of the minorities (2) Willingness to conclude a treaty with His Majesty's Government to cover matters arising out of the transfer of Power ( Cabinet Missions' statement 25th May 1946 ) अल्पसंख्यांकाचे हक्क संरक्षण व ब्रिटिशाबरोबर सत्तासंक्रमणामुळें करावा लागणारा तह एवढ्या दोन गोष्टी आहेत कां नाहीं हें पहावें. हंगामी सरकारच्या बाबतींतसुद्धां जर लीगला न्यायानें वागवूनहि लीग यावयास तयार नसेल तर एका पक्षाच्या हातांत राज्यकारभार सोपवावयास पाहिजे.

ह्या साऱ्या परावलंबनामुळें घटना शास्त्राचे तज्ञ म्हणतात ही घटना परिषदच नाहीं. लोकांनीं बोलावलेली, लोकाकरतां बसलेली व लोकांनीं मान्य केलेली जी घटना व घटनापरिषद तीच खरी घटना व घटनापरिषद. घटनापारिषदेचें शास्त्र हें अद्याप सर्वमान्य झालें नाहीं. हिंदुस्थानची घटनापरिषद यशस्वी झाली तर ती घटनापरिषद नव्हती असें कोणी म्हणू शकणार नाहीं. आणि हिंदुस्थानचा हा दाखला शास्त्रज्ञ घेणार नाहींत असेंहि नाहीं.

हिंदुस्थानच्या घटनापरिषदेला मर्यादा आहेत हें कोणीहि मान्य करील. पण रक्तहीन क्रांतीनें जर सत्ता संक्रमण व्हावयाचे असेल तर त्याला दुसरा मार्गच नाहीं. आजची घटनापरिषद ही उधळली गेली तरी पुनः नव्या घटनापरिषदे मार्फतच हिंदी घटना बनवावी लागेल. तीहि फसली तर तिसरी घटनापारिषद भरवावी लागेल. पण कांहीं झाले तरी ब्रिटिश सत्ता येथें आहे

तोपर्यंत व आपण सत्ता काबीज केली नाहीं तोपर्यंत ह्याच पद्धतीनें आपल्याला जावे लागेल.

हिंदी घटनापरिषदेला, घटनापरिषद न म्हणणें फार सोपें आहे. पण जर काँग्रेसनें अत्यंत कसोशी करून ही घटनापरिषद यशस्वी केली नाहीं तर त्याचे परिणाम फार भयंकर होतील. घटनापरिषद नुसती यशस्वी करून भागणार नाहीं. घटना यशस्वी केली पाहिजे. त्याकरतां देशांतील असंतोषाचें व बंडखोर वृत्तींचें निर्मूलन झालें पाहिजे. हें निर्मूलन करावयास काँग्रेसला कांहीं त्यागहि करावयास लागेल. तो त्याग करणें आणि लीगला बंडखोर बनू न देणें हें जरूर आहे. पाकिस्तानशिवाय इतर तपशीलाच्या बाबतींत जास्तींत जास्त तडजोडीची वृत्ती ठेवली तरच हें शक्य होईल. कदाचित् लीग आपली वृत्ती सोडणारहि नाहीं. पण आपल्याकडून आपण समजूतदारपणा व औदार्य हें सिद्ध केलेंच पाहिजे. आमची खात्री आहे काँग्रेस असें केल्याशिवाय रहाणार नाहीं.

आज आपण हिंदुस्थानची घटना आमूलाग्र बदलली जाईल अशी अपेक्षाहि करूं नये. विद्यमान परिस्थितींत जितकी प्रगति आपल्याला करतां येईल तितकी केली पाहिजे. एवढी दृष्टी आपण ठेवली म्हणजे कोणाला निराश होण्याचें कारण उरणार नाहीं. हिंदुस्थानच्या व जगाच्या परिस्थितीचा विचार करतां ही परिषद यशस्वी करणें हेंच आजचें कर्तव्य आहे.

पुणें ता. ८।८।४६ | त्र्यं. र. देवगिरीकर

# श्री. त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर

यांचीं इतर पुस्तकें

## प्र का शि त

- गांधीचा अहिंसावाद
- फेडरेशन
- वसाहतीचें स्वराज्य
- फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास
- औद्योगिक हिंदुस्थान
- आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास

इ. इ.

## आ गा मी

- गीतांजली (मूळ बंगालीवरून)
- कै. वासुकाका जोशी (चरित्र)

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६।१९ सदाशिव, पुणें २

## ★ आमचीं प्रकाशनें ★

### श्री. वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| नवा प्रात:काल ( दु. आ. ) | २॥ |
| पूजन ,, | ३ |
| पहिल्या-वहिल्या | २। |
| गोफ आणि गोफण | २॥ |

### श्री. वि. वि. बोकील
( 'वसंताच्या लीला' )

| | |
|---|---|
| बेबीचा भाऊ ( दु. आ. ) | ३ |
| साडेतीन शहाणे | ३ |
| चिमखडे | २॥ |
| वसंत | ३ |
| भाऊ-भाऊ | २॥ |

### श्री. द. र. कवठेकर

| | |
|---|---|
| नादनिनाद | १॥ |
| चांदण्यांतील सावल्या | ३ |
| शालन् | ३ |
| मंदा | २ |

### श्री. ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| आमचे हे | ३ |
| मामा ( दु. आ. ) | १॥ |
| विद्यामंदिरांत | .॥. |

### श्री. अनंत काणेकर

| | |
|---|---|
| घरकुल | १। |
| काळी मेहुणी | १॥। |

### श्री. ना. ह. आपटे

| | |
|---|---|
| मी वाट पाहीन ! | २। |
| एकटी | ५ |

### श्री. चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| संचार | २॥ |
| ओसाडवाडीचे देव | १॥ |

### श्री. र. गो. सरदेसाई

| | |
|---|---|
| स्वाति | १॥ |

### श्री. 'धनंजय'

| | |
|---|---|
| कलावंतांच्या सहवासांत | ३ |

### सौ. शांताबाई नाशिककर

| | |
|---|---|
| नीलेचा दिलरुबा | २ |

### श्री. चिरडे

| | |
|---|---|
| भंगलेली मूर्ति | २ |

### श्री. दत्त उ. वैद्य

| | |
|---|---|
| मोगरीचा गजरा | १॥ |

### श्री. प्रभाकर पाध्ये

| | |
|---|---|
| प्रकाशांतील व्यक्ति | १॥। |

### श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| जीवन-साहित्य | २॥ |

### श्री. काका कालेलकर

| | |
|---|---|
| जीवन आणि समाज | १॥। |

### श्री. साने गुरुजी

| | |
|---|---|
| अमोल गोष्टी | २ |

### श्री. शामराव ओक

| | |
|---|---|
| धोंड्याचे कळे | २ |

### श्री. जे. एल. रानडे

| | |
|---|---|
| गोड ललकाऱ्या | १॥ |

### श्री. जी. एस. पाटणकर

| | |
|---|---|
| मधुर चिजें | १। |

### श्री. गोपिनाथ तळवलकर

| | |
|---|---|
| अनुराधा | २ |

### त्र्यं. र. देवगिरीकर

| | |
|---|---|
| घटनापरिषद | २ |

### श्री. भा. कृ. केळकर

| | |
|---|---|
| भाष | ३॥ |

# अनुक्रमणिका

१ घटनापरिषदांचा इतिहास .... .... .... ८
२ काँग्रेस व घटनापरिषद् .... .... .... ३७
३ त्रिमंत्र्यांची शिष्टाई .... .... .... ६५
४ स्वतंत्र हिंदुस्थानची घटना .... ... .... ९४

## परिशिष्टें

रशियाची घटना— ११३
गांधीप्रणीत घटना— १२०
म. गांधींचें अहिंसक राज्य-घटनेचें कल्पना सूत्र— . १२५

नगर वाचनालय
ता.
सातारा

# घटना-परिषदांचा इतिहास : : १

हिंदुस्थानची घटना परिषद ही लवकरच भरणार आहे. या घटना परिषदेंत हिंदी जनतेचे प्रतिनिधी हिंदुस्थानची घटना तयार करणार आहेत. अशा वेळीं वाचकांना घटना परिषदांचा पूर्व इतिहास व तदनुषंगिक इतर विचारप्रवाह यांचा परिचय करून द्यावा म्हणून हा प्रयत्न करण्यांत येत आहे.

घटनापरिषदेला स्वकीयांकडून विरोध होत आहे, हें आपण पहातोंच. या विरोधाची अनेक कारणें सांगितली जातात. ( १ ) हिंदुस्थानांत सशस्त्र राज्यक्रांती झाली नाहीं व लोकांनीं सत्ता बळकावली नाहीं म्हणून घटना-परिषदेची मागणी ही अशास्त्रीय आहे ( २ ) हिंदुस्थानचा विस्तार लक्षांत घेतां घटनापरिषद भरविणें अशक्य आहे. ( ३ ) घटना परिषदेंत हिंदूंचें बहुमत होणार असल्यामुळें अल्पसंख्याकांचे हितसंबंध सुरक्षित राहणार नाहींत. ( ४ ) वयांत आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला मताधिकार दिला नाहीं. ( ५ ) घटना-

परिषदेला सार्वभौमत्वाचे अधिकार असलेच तर ते मर्यादित आहेत. ( ६ ) ज्या घोषणेंत प्रांत व मध्यवर्ती सत्ता यांचे अधिकार आखून टाकले आहेत त्या घोषणेप्रमाणें भरणारी घटना परिषद ही स्वतंत्र नाहीं.

या कारणाशिवाय आणखी विरोधाचीं कारणें असतील; पण हीं प्रमुख कारणें आहेत.

यांपैकीं कांहीं कारणांचा आपण विचार करूं. घटनापरिषदेला विरोध असण्याचीं हीं तीन प्रकारचीं कारणें आहेत; एक ऐतिहासिक, दुसरे कायदेशीर व तिसरे व्यावहारिक. यापैकीं पहिलें कारण आपण घेऊं. सशस्त्र क्रांती करूनच घटना बनविल्या पाहिजेत असें शास्त्र नाहीं. सशस्त्र क्रांतीपर्यंत परिस्थिती बिघडवूं देणें हें राज्यकर्त्यांच्या बेफिकीरीचें, अरेरावीचें किंवा सत्तेच्या लोभाचें लक्षण आहे. सूज्ञ राज्यकर्ते प्रजेच्या भावनांचा अंदाज लागतांच प्रजेला घटना बनवूं देतात. तेव्हां राज्यक्रांति हीच घटना बनविण्याला शास्त्रीय दृष्टया योग्य असते असें नाहीं. फ्रान्सच्या इतिहासांत घटनापरिषद हा शब्द क्रांतीमुळें विटाळला गेला असल्यामुळें तो इतर घटनांना लावूं नये, असे होत नाहीं. जर्मनी, ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, वगैरे स्वतंत्र देशानीं सशस्त्र क्रांत्या न करतां घटनापरिषदा भरविल्या आणि आपापल्या घटना तयार केल्या. ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतीनीं आपापल्या घटना बनविल्या तेव्हां त्यांच्या देशांत क्रांत्या कुठें झाल्या होत्या? त्यांनीं त्या परिषदांना घटनापरिषद हा शब्द लावला नाहीं एवढें खरें; पण त्यामुळें त्यांची सत्ता अमान्य होते असें नाहीं. पण त्याहिपेक्षां ठळक उदाहरण आयर्लंडचें आहे. आयर्लंडमध्यें घटनापरिषद भरली, तिनें घटना तयार केली व तिला ब्रिटिश पार्लमेंटची संमतीहि घेतली. तेथें क्रांतीचा जो अर्थ आहे, त्या अर्थानें क्रांति झाली नव्हती. इंग्रजांच्या संमतीनेंच तेथें घटनापरिषद भरली. तेव्हां साम्राज्यांतर्गत वसाहतींत घटनापरिषदा भरल्या, स्वतंत्र देशांनीं घटनापरिषदा भरविल्या आणि क्रांतीच्या वातावरणांतहि घटनापरिषदा भरल्या. क्रांतींतच घटनापरिषद होऊं शकते, असा जर सिद्धांत असता तर इतर देशांत भरलेल्या घटनापरिषदा ह्या घटना परिषदाच नव्हत्या असें म्हणावें लागेल. पण तें चूक आहे. स्वेच्छेनें, परेच्छेनें, क्रांतींत

अगर क्रांतीशिवाय ज्या ज्या वेळीं घटना बदलण्याची लोकांना इच्छा होते अगर जरुरी भासते तेव्हां ते घटना परिषद भरवूं शकतात.

टीकाकारांचा मुख्य आधार फ्रान्स आहे. या देशांतील घटनापरिषदेचा विचार केला म्हणजे तोहि आधार कसा लटपटीत आहे, हें कळून येईल. याकरतां आपण फ्रान्सच्या घटनापरिषदेचा थोडक्यांत परामर्ष घेऊं.

## फ्रान्सची घटना-परिषद

१६ वा लुई हा १७७४ पासून १७९२ पर्यंत राज्यावर होता. तो स्वभावानें फार चांगला होता; पण मनानें दुर्बल होता. त्याची राणी मेरी अँटनेट व इतर लोक त्याच्यावर सत्ता गाजवीत. तो बुद्धीनें बेताबाताचाच होता. त्याच्या अमदानीला सुरवात चांगली झाली. त्यानें सुधारणावादी मंत्रि-मंडळ नेमलें. टर्गो हा मुख्य होता. त्याची इच्छा श्रीमंत लोकांवर कर बसवावे अशी होती. पण राणी व इतर लोकांना तें पसंत नव्हतें. तिनें त्याची हकाल-पट्टी केली. नंतर नेकर नांवाच्या जर्मन सावकाराला फडणीस केले, तो हुशार होता; पण सुधारणावादी नव्हता. त्याला यश आलें असतें; पण त्याच वेळीं अमेरिकेंत स्वातंत्र्याचें युद्ध झालें. त्या युद्धांत फ्रान्स इंग्लंडच्याविरुद्ध सामील झाल्यामुळें फ्रान्सच्या तिजोरींत खडखडाट झाला. मोठमोठीं कर्जें काढावीं लागलीं, नेकरला पैसा उभारतां येईना, म्हणून त्याला १७८१ मध्यें काढून टाकला. पुढें कॅलोन फडणीस झाला. त्यानें भारी व्याजानें कर्जें काढलीं; तरी पैसा पुरेना. तेव्हां त्यानें नोटेबलसची सभा बोलावली. त्यांत राजानें नेमलेले १४२ सभासद होतें. या नोटेबलसनीं राजाला मदत करण्याऐवजीं स्टेट्स जनरलची सभा बोलावण्याचा आग्रह धरला. कॅलोनला परिस्थिति सुधारता येईना. म्हणून १७८७ सालीं त्याला रजा मिळाली. पुढें चवथा फडणीस लोमेन डी ब्रीन हा आला. त्यानें राजाच्या हुकमानें लोकांवर कराचा बोजा लादला. त्याला पार्लमेंटनें प्रतिकार केला. आतां कांहीं मार्ग उरला नाहीं असें पाहून राजानें १७८८ सालीं स्टेट्स जनरलची सभा बोलावली. त्यावेळीं लोकांना तीन

सुधारणा हव्या होत्या. ( १ ) राजकारणांत सुधारणा ( २ ) दारिद्र्य व गुन्हेगारीला आळा ( ३ ) धर्मकारणांत क्रांती.

स्टेट्स जनरलची अगदीं पूर्वीची सभा १६१४ सालीं भरली होती. नव्या सभेस तीन वर्गांचे प्रतिनिधि होते. ३०८ भिक्षुक प्रतिनिधी; २८५ सरदारांचे व ६२१ सामान्य लोकांचे. प्रत्येक वर्ग आपापल्या निवडणुका स्वतंपणें करी. सर्वसाधारण वर्गाच्या प्रतिनिधींची निवड २५ वर्षे वयाचा व खातेदार असलेला करी. हे मतदार आपल्या प्रतिनिधींना आपली गाऱ्हाणी लेखी देत व त्यानें तीं दूर केली पाहिजेत असें सांगत. १७८९ सालीं झालेल्या या निवडणुकांत लाचलुचपत व वशीला वगैरे कांहीं नव्हता. ते प्रतिनिधी अगदीं कच्चे, राजकारणांत अनभ्यस्त असें होते, सभेंत काय करावें, कसें बोलावें हेंहि त्याना ठाऊक नव्हतें. एकेका वेळीं १०० जण बोलायला उठत. सभा सुरू असतां हसणें, ओरडणें चालू असें; पण हें सर्व खवळलेल्या भावनांचें उद्रेक असत. तीन वर्गांच्या प्रतिनिधींमध्यें सलोख्याऐवजीं भांडणेंच चालत.

४ मे १७८९ सोमवार रोजीं हे सर्व १२०० सभासद देवळांत जमले, त्यांनीं प्रार्थना केली व ते मिरवणूकीनें सभास्थानीं गेले. ही सभा व्हर्सायला भरली, पॅरीसला भरली नाहीं. त्यांची मिरवणूक पहायला रस्त्यानें हजारों लोक जमले होते. लोकप्रतिनिधींनीं काळा पोषाख केला होता व लोक त्यांना पाहून टाळ्या पिटीत होतें. राजा आला तेव्हांहि टाळ्या पिटल्या गेल्या. पण राणी, भिक्षुक व सरदारांचें स्वागत झाले नाहीं. आठला सभा जाहीर केली, पण दहापर्यंत सभेला सुरवात झाली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सभेला पुनः सुरवात झाली. राजसाहेबांची इच्छा लोकांना संघटना व हक्क द्यावे अशी होती. पण त्यांच्या मंत्र्यांनीं कांहींच योजना केली नव्हती. दुसऱ्या दिवसापासून या तीन वर्गांत इतकीं भांडणें झाली कीं, तिघे निरनिराळ्या ठिकाणीं बसूं लागले. १७ जून रोजीं स्टेट्स जनरलचे जे सभासद होते, त्यांनीं स्वतःला नॅशनल ॲसेंब्ली हें नांव घेऊन आपला कारभार सुरू केला. त्यांनीं भिक्षुक व सरदारांना आपल्यांत यावयास प्रतिबंध केला नव्हता; पण त्याकरतां एका मसुद्यावर सह्या कराव्या लागत. राजाला ह्या

पृथक् बैठका मान्य नव्हत्या. त्यांची एकत्र बैठक २२ जूनला भरेल असें मंत्र्यानें पुकारलें पण ही नोटीस अध्यक्षाला गेली दिली नाहीं. राष्ट्रीय पक्ष २० जूनला सभागृहांत आला, तेव्हां सभागृह बंद केलें होतें. म्हणून ते टेनीस कोर्टांत गेले व तेथें त्यांनीं सभा भरवली. त्यांना राजपक्षाबद्दल शंका आली व त्यांनीं घटना होईपर्यंत आपण सभा मोडावयाची नाहीं अशा शपथा घेतल्या. पुढें २२ तारखेला व नंतर एकत्र बैठका होऊं लागल्या. गांवांत फार खळबळ उडाली. लोकांची गर्दी सभागृहांत जमूं लागली. लोकहि सभासदांत बसूं लागले. रस्त्यांत लष्करी फौजफाटा आणून उभा केला. २३ तारखेला राजानें आपल्या सुधारणा जाहीर केल्या, कोणताहि कर स्टेटस् जनरलला विचारल्याशिवाय लादला जाणार नाहीं. कोणालाहि कर माफ होणार नाहीं. त्यानें कायद्यांत लष्करांत, वृत्तपत्रांत सुधारणा जाहीर केल्या. तीन वर्ग निराळे बसतील; पण सोईप्रमाणें एकत्र बैठकहि होईल असें पुकारून राजेसाहेब निघून गेले. पण लोकप्रतिनिधी तेथून उठेनात. हातघाईवर प्रकरण आलें. पण राजानें त्याना हात लावूं नका असें बजावलें. यावेळीं पॅरीस व व्हर्सायमध्यें बंडें झालीं. तेथील हॉटेलें लुटलीं जाऊं लागलीं. राजाला धोका आहे असें वाटूं लागलें. लोक कायदे मानीनात. पोलीस व लष्कर कुचकामी ठरले. लष्करांत राजाविरुद्ध गुप्त कट उघडकीला आला. त्या लोकांना अॅबे नांवाच्या तुरुंगांत टाकलें. ३० लोकांनीं हा तुरुंग फोडला व शिपायांना बाहेर काढलें. राजानें असेंब्लीच्या सल्ल्यानें बाकीचे कैदीही मुक्त केले व पुढें कांहीं करावयाचें नाहीं असें ठरविलें.

पॅरिसमध्यें १२ जुलैला दंगेधोपे झाले. १४ जुलैला बॅस्टीलचा तुरुंग फोडण्यांत आला. जाळपोळी झाल्या. पण राजानें असेंब्लीच्या सल्ल्यानें पुन: १५ तारखेला सैन्य काढून घेऊन शांतता प्रस्थापित केली. अशा प्रकारें या दोन शहरांत दंगे झाले; पण इतरत्रहि कायद्याविषयीं आदर नव्हता, नॅशनल जनरलची सभा मात्र चालू होती.

त्यांनीं जुलै महिन्यांतच घटनापरिषद भरवली व निरनिराळ्या कमिट्या नेमून कामाला सुरवात केली. ६ जुलै १७८९ रोजीं या परिषदेच्या कार्य-

क्रमाचा आराखडा तयार करण्याकरतां कमिटी नेमली गेली. ह्या परिषदेचें काम दोन वर्षें चाललें होतें. घटनेबद्दल प्रतिनिधी इतके आतुर होते कीं, ते रात्रंदिवस काम करीत होते. जुलै महिन्यांत झालेल्या दंगलीला न जुमानतां ते आपलें कार्य पुढें रेटीत होते. ऑक्टोबर १७८९ मध्यें व्हर्सायहून ही परिषद पॅरिसला गेली. ३ सप्टेंबर १७९१ रोजीं ह्या परिषदेचें काम संपून त्यांनीं घटनेला कायदेशीर स्वरूप दिलें. या घटनापरिषदेचें काम चालू असतां तिला राजपक्षाकडून विरोध होत होता. पण तो निष्फळ ठरला, आणि राजाला अशी भीति वाटली कीं, आपल्याला ही घटना मान्य करावी लागेल एवढेंच नव्हे तर आपण ती तयार होऊं द्यावयाला जबाबदार आहों असें समजण्यांत येईल. ही आपत्ती टाळावी म्हणून राजेसाहेब जून १७९१ मध्यें पॅरिसहून पळून गेले. पण त्यांना शेवटीं त्या घटनेला मान्यता द्यावी लागली. ही मान्यता घटनाकायदा कायदेशीर ठरावा, याकरतां नको होती; पण राजाला आपला अधिकार कायम ठेवण्याकरतां मान्यता देणें भाग होतें. १४ सप्टेंबरला राजानें आपण घटनेशीं इमानानें वागूं अशी शपथ गंभीरपणें नॅशनल कौन्सिलच्या सभेमध्यें घेतली. लोकांना वाटलें आतां क्रांति वगैरे होणार नाहीं व राज्य सुखानें चालेल. अशा प्रकारें घटनेचें काम संपताच ३० सप्टेंबर रोजीं नॅशनल असेंब्ली समाप्त झाली.

त्यानंतर एक वर्षानें तेथें पुनः बंड झालें आणि त्या बंडाच्या शेवटीं कन्व्हेन्शन भरून राजाला दोषी ठरवून त्याचा जानेवारी १७९३ मध्यें वध करण्यांत आला. नंतर लोकांनीं रिपब्लिक जाहीर केलें व राजसत्ता संपविली.

वरील हकीगतीवरून फ्रान्समध्यें राज्यक्रांति झाली, लोकांनीं हातांत सत्ता घेतली आणि नंतर घटना परिषद भरवली, या पैकीं कांहींहि झालें नाहीं. राजानें बसविलेले कर असह्य झाल्यामुळें स्टेट्स जनरलची सभा राजानेंच बोलावली, त्या स्टेट्स जनरलमधून लोकप्रतिनिधींनीं नॅशनल असेंब्ली या नांवाची आपली परिषद भरवली व या परिषदेनें घटना तयार करण्याकरितां एक समिती नेमली. पॅरिस व व्हर्सायचे दंगे हे क्रांती या नांवाला साजेसे नव्हते. फार तर त्यांना बंड म्हणतां येईल. या बंडामुळें घटनापरिषद भरली असें

नाहीं. लोकांनीं राजाला हाकून दिलें नव्हते एवढेंच नव्हे तर त्यांचें राज्य चालू असतांच ही परिषद काम करीत होती. तेव्हां फ्रान्सची १७८९ ची घटनापरिषद ही इतर देशांच्या परिषदेपेक्षा बिलकूल भिन्न नव्हती.

## रशियाचे उदाहरण

रशियामध्यें घटनापरिषद भरली अशी लोकांची समज नाहीं. वास्तविक-पणें क्रांतीनंतर सत्ता काबीज केल्यावर घटनापरिषद भरते असा जर सिद्धांत असता, तर रशियांत घटनापरिषद भरावयास पाहिजे होती. पण तेथें ती भरली नाहीं. त्याचा इतिहास आपण थोडक्यांत पाहूं.

१९१७ च्या मार्चमध्यें केरेन्स्कीनें क्रांति करून आपल्या हातीं सत्ता घेतली. त्यानंतर जून महिन्यांत पेट्रोग्राड येथें सोव्हिएटसची ऑल-रशियन कॉंग्रेस भरली. त्या कॉंग्रेसला ७८१ प्रतिनिधी जमले होते, ही सोशिआलिस्टांची वर्गसंघटना होती. तिला कायदेशीर स्वरूप नव्हतें. १९१७ च्या सप्टेंबर महिन्यांत या कॉंग्रेसनें इतर राजकीय पक्षांच्या बरोबर सहकार्य करून हंगामी सरकारच्या स्थापनेला मान्यता दिली. ही तात्पुरती व्यवस्था घटनापरिषद होईपर्यंत चालू रहावी असे ठरलें. दरम्यानच्या काळांत बोल्शेविक्स अत्यंत प्रबळ झालें व त्यांच्या पक्षानें असें ठरविलें कीं, सबंध राज्याचा ताबा सोव्हि-एट संस्थेनें घ्यावा. या ठरावाप्रमाणें त्यांनीं व्यवस्था केली आणि नोव्हेंबर ६ च्या रात्रीं त्यांना पेट्रोग्राड घेतलें, हंगामी सरकारला गिरफदार केलें आणि त्यांच्या जागीं लष्करी क्रांतिकारक मंडळ स्थापन केलें. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं सोव्हिएटांची दुसरी कॉंग्रेस भरली व त्यांनीं सत्ता बळकावल्यानंतर संबंध राज्याची व्यवस्था आपल्या कल्पनेप्रमाणें करावयाचें ठरवलें. या कॉंग्रेसच्या ४४५ सभासदांपैकीं ३९० बोल्शेविक होते. या कॉंग्रेसनें रशियांत सोव्हिएट रिपब्लिक स्थापन झाल्याची घोषणा केली.

या घडामोडीमुळें घटनापरिषद बाजूला पडत गेली. सोव्हिएटांना वाटलें कीं, घटनापरिषद झाली तर भलताच निकाल होईल. म्हणून त्यांनीं या परिषदे-

वर आपलें भवितव्य ठरविण्याचें नाकारलें. पण नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत म्हणजे बोल्शेविकांनीं सत्ता हातांत घेण्याच्या वेळीं घटनापरिषदेच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुकांत ३ कोटी ६० लक्ष मतदारांनीं मतें दिली. त्यांतील २ कोटी १० लाख मतें बोल्शेविकांच्या विरुद्ध पडलीं. ९० लाख बोल्शेविकांच्या बाजूनें पडलीं. २० लाख मेन्शेविकांना मिळालीं व ४० लाख इतराना पडलीं. आपल्याविरुद्ध हे मतदान झाल्याचें पाहून बोल्शेविकांनीं १८ जानेवारी १९१८ रोजीं घटनापरिषद भरतांक्षणींच ती परिषद उधळून टाकली. त्याच दिवशीं त्यानीं आपली तिसरी काँग्रेस भरवली व तीच घटनापरिषद आहे, असें म्हटलें. त्यांची ५ वी काँग्रेस जुलै १० ला भरून तिनें सध्याची घटना तयार केली.

अशा प्रकारें जगांतील दुसरा क्रांतिकारक देश जो रशिया त्यानें घटनापरिषदेची अशी विटंबना केली. त्या देशात घटनापरिषद भरलीच नाहीं. सोव्हिएट काँग्रेसच्या बैठकीलाच त्यांनीं घटनापरिषद संबोधिलें. तेव्हां क्रांतीनंतरच घटनापरिषद भरते, ह्या सिद्धांताला हा दुसरा धक्का मिळाला.

## इतर कांहीं स्वतंत्र देशांतील घटना-परिषदा

आतां ज्या देशांत क्रांत्या झाल्या नाहींत, पण जेथें घटना मोडकळीस आल्या होत्या त्यांचा थोडासा परामर्ष घेऊं.

### पोलंड

पहिल्या महायुद्धांत हा देश स्वतंत्र झाला. त्या वेळीं त्यांनीं आपली घटनापरिषद भरवलीं; त्यांच्या कायद्याच्या सुरवातीला 'आम्ही दीडशें वर्षांच्या गुलामगिरींतून सुटल्याबद्दल परमेश्वराचें आभार मानून......मे १७९१ च्या घटनेप्रमाणें पोलीश रिपब्लिकची ही घटना, घटनापरिषदेंत मतें देऊन मंजूर करींत आहों' असें म्हटलें आहे. तेथें सरक्त क्रांती झाली नव्हती; निरक्त क्रांतीच होती.

## ऑस्ट्रिया

ऑस्ट्रियामध्यें १७ ऑक्टोबर १९१८ रोजीं बादशहानें जाहीरनामा काढला, २१ ऑक्टोबरला २१० जर्मन प्रतिनिधी जमले व त्यांनीं हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापलें. ११ नोव्हेंबरला कैसरनें ऑस्ट्रियावरील आपला संबंध सोडल्याचें जाहीर केलें. १२ नोव्हेंबर रोजीं जर्मन ऑस्ट्रिया हे डेमोक्रॅटिक रिपब्लिक आहे, असें कायद्यानें जाहीर झालें. याच वेळीं हंगामी सरकारनें घटनापरिषद १९१९ च्या जानेवारींत भरेल असें कायदा करून जाहीर केलें. ह्या कायद्याप्रमाणें घटनापरिषद दोन वर्षें बसावी, तींत २५० प्रतिनिधी असावेत, २० वर्षांच्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला मताचा अधिकार असावा असें ठरलें. त्याचप्रमाणें १५ फेब्रुवारीला निवडणुका झाल्या. ४० लाख लोकांनीं मतें दिलीं व ४ मार्चला घटनापरिषद भरली. त्यांनीं नंतर घटना बनविली व १ ऑक्टोबरला घटनाकायदा मंजूर झाला,

ऑस्ट्रियांतहि क्रांति झाली नव्हती. लोकांनीं नव्या परिस्थितीनुरुप आपली घटना तयार केली.

## झेकोस्लोव्हाकिया

प्रेसिडेंट मेसॅरिकच्या नेतृत्वाखालीं यांनीं स्वातंत्र्य जाहीर केलें. युद्धसमाप्तीनंतर दोस्तांनीं त्याला मान्यता दिली. २८ ऑक्टोबर १९१८ सालीं नॅशनल कौन्सिलनें, आपल्या हातीं सत्ता घेतली व स्थायी सरकार स्थापण्याकरतां घटनापरिषद भरविण्याचें ठरविलें. या परिषदेकरतां निवडणुका करणें कठीण झाल्यामुळें त्यांनीं निरनिराळ्या पक्षांना आपलें प्रतिनिधी नियुक्त करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें १४ नोव्हेंबर १९१८ रोजीं घटनापरिषद भरली. या परिषदेनें आपलें डेमोक्रॅटिक रिपब्लिक जाहीर केलें. नंतर ही परिषद घटना तयार करण्याकरतां बसलीं. २० फेब्रुवारीला ह्या परिषदेचें काम समाप्त झालें. येथेंहि सशस्त्र क्रांतीशिवाय घटनापरिषद भरली व घटना तयार झाली.

## जर्मनी

पूर्वी कैसर हा जर्मनीचा स्वामी होता. पण युद्धसमाप्तीनंतर ३० सप्टेंबर १९१८ रोजीं कैसरनें एक जाहीरनामा काढून आपली सत्ता लोकांच्या स्वाधीन केली. ( from the person of the Kaisar to the people ) नंतर कैसर तेथून निघून गेला. लोकांच्या हातीं सत्ता आल्यावर पुढील काम व्यवस्थीतपणें झालें असतें. पण नोव्हेंबर महिन्यांत छोटेसें बंड झालें. कामकरी व शिपाई यांनीं आपलीं मंडळें स्थापन करून आपल्या हातीं सत्ता आली पाहिजे असा आग्रह धरला. त्यांनीं आपलें एक हंगामी सरकार नेमलें. त्याच वेळीं दुसरें एक अखिल जनतेचें हंगामी सरकार अस्तित्वांत होतें.

दोन हंगामी सरकार एकाच वेळीं कामें करू लागले व त्यांच्यांत खटके उडूं लागले. ६ डिसेंबरला हीं भांडणें संपलीं व असें ठरलें कीं घटनापरिषद बोलावून तिचा निकाल कायम समजावा. १९ जानेवारी १९१९ रोजीं घटनापरिषदेच्या निवडणुका झाल्या. २० वर्षांवरील स्त्री-पुरुषांना मताधिकार मिळाला. ४२१ जागा निवडण्यांत आल्या. त्यांत ३६ बायका होत्या. ६ फेब्रुवारीला घटनापरिषद वायमारच्या नाट्यगृहांत भरली. तिनें कामचलावू घटना बनवली. पूर्वीच्या दोन्ही हंगामी सरकारनीं आपले अधिकार या घटनापरिषदेला दिले. इबर्टला राईशचा अध्यक्ष नेमले व घटनापरिषदेचें काम सुरूं झालें. ह्या परिषदेनें आपल्या घटनेचा मसुदा २१ फेब्रुवारीला तयार केला. जुलै महिन्यांत त्यावर चर्चा झाली. ३१ जुलैला तो पास झाला. ही घटनापरिषद विसर्जन न पावतां ती पहिली राईश्टाग ( कायदेमंडळ ) व्हावें असें कायद्यानें ठरलें. अशा प्रकारें जर्मनीची घटना तयार झाली.

स्वतंत्र राष्ट्रांनीं आपापल्या घटना अशा प्रकारें घटनापरिषदांच्या द्वारां तयार केल्या.

### ब्रि. साम्राज्यांतील वसाहतींच्या घटना-परिषदा

ब्रिटिशांचें साम्राज्य फार मोठें आहे, त्या साम्राज्याची व्याख्या करणेंहि कठीण आहे. अनेक प्रकारच्या राज्यघटना त्यांत चालू आहेत. या साम्राज्यां-

तील अनेक देशांत समान कांहीं असेल, तर राजा. राजाची सत्ता मान्य करण्यापलीकडे या साम्राज्याला एकतंत्री असें स्वरूप नाहीं. एका अर्थानें खुद्द इंग्लंड हीसुद्धां एक वसाहत आहे. ज्या राजानें १०६६ इसवींमध्यें इंग्लंड जिंकले तो नार्मंडीचा ड्यूक मूळचा चॅनल आयलंडचा राजा होता. पण पुढें इंग्लंडांत सत्ता बळावूं लागली आणि मूळ देशाला पार्लमेंटचे कायदे लागू होऊं लागले. चॅनल आयलंडसनीं आम्ही कोणाचेंहि अंकित नाहीं व कोणाची सत्ता मानणार नाहीं असा पुकारा केला. पण त्यांचा हक्क अमान्य करण्यांत आला. तथापि ब्रिटिश साम्राज्याचें मूळ चॅनल आयलंडस आहे हें कोणीहि अमान्य करू शकत नाहीं.

दर्यावर्दीपणाला सुरुवात झाल्यावर इंग्लंडमधील धाडशी खलाशी बाहेरील जगांत मुलुखगिरी करण्याकरतां आपली जहाजें हाकारूं लागलें. त्यांनीं निरनिराळे देश जिंकले. त्यांच्या पाठीमागें इंग्लंडचें सामर्थ्य असल्यामुळें प्रतिस्पर्धी सत्तांना प्रतिकार करणें कठीण जाऊं लागलें. या बाहेर देशांत जाऊन राहिलेल्या इंग्लंडच्या रहिवाशांनीं ज्या वसाहती स्थापन केल्या, त्या वसाहतींत कोणत्या प्रकारचा राज्यकारभार असावा याबद्दल चर्चा होऊं लागली. इंग्लंड म्हणूं लागलें या वसाहतींत राज्य जें चालवयाचें तें आमच्या कायद्यांनीं चाललें पाहिजे. इंग्लंडमध्यें जे कायदे होतील तेच कायदे वसाहतींत लागू झाले पाहिजेत. वसाहती या साम्राज्यसरकारच्या पूर्णपणें अंकित आहेत, त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं; म्हणून स्वयंशासनाचे अधिकार त्यांना बिलकूल नाहींत.*

---

*The said Colonies and Plantations in America have been, are, and of right ought be to, subordinate to and dependent upon, the Imperial Crown and Parliament of Great Britain; and that the king's majesty by and with the consent and advice of the Lords spiritual and temporal, and commons of Great Britain, in Parliament assembled, had, hath and of

इंग्लंडच्या प्रभुत्वाचें अस्तित्व जरी या वसाहती मान्य करीत होत्या, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत इंग्लंडची सत्ता तितकी चालत नसे हें येथें सांगणें जरूर आहे. एक तर वसाहतींत असणारे लोक इंग्लंडचेच असल्यामुळें त्यांच्याबद्दल अविश्वास दाखविण्याचें कारण नसे. दुसरे जे अधिकारी त्या वसाहतींत जात, तेहि साम्राज्यसरकारला विघातक होईल असें कांहीं करीत नसत. लिखित कायद्यापेक्षां अलिखित रूढी ही जास्तजास्त क्षेत्र व्यापूं लागली. अंतर्गत कारभार हा त्यामुळेंच पार्लमेंटांतील मंत्र्यांच्या हुकमांनीं वसाहतींच्या ताब्यांत येऊं लागला. इंग्लंड व वसाहतींचा खटका एका गोष्टींत उडत असे. बाहेर देशाशीं जहाजांतून होणाऱ्या व्यापारावर इंग्लंडचें पूर्ण नियंत्रण असावें याबद्दल इंग्लंड जागरूक असे. तेव्हां वसाहतींना जरी अंतर्गत जबाबदारीचें स्वराज्य मिळणें सोपें होतें, तरी बाह्यसंबंध निश्चित करण्याबद्दल त्यांचे हात बांधलेले असत. वसाहतींत जी स्वराज्याची वाढ झाली, ती रूढींनीं जितकी झाली, तितकी कायद्यांनीं झाली नाहीं. स्वकीयांच्या देशांत ही वाढ व्हावयास हरकत नसते; पण परकीयांच्या देशांत रूढीची वाढ होऊं दिली जात नाहीं. तथापि इंग्लंडसारख्या हट्टी, दुराग्रही देशाबरोबर या वसाहतींना आपल्या हक्कांची शाबिदी करून घेण्याकरतां १५० वर्षें झगडावें लागले. या झगड्यांत प्रथम अमेरिका स्वतंत्र झाली व तेथें इंग्लंडचें स्वामित्व उरलें नाहीं. १९२६ सालीं हा अनेक वर्षांचा झगडा संपला व वसाहती स्वतंत्र झाल्या असें म्हणावयास हरकत नाहीं.

ज्यांना वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा आज फक्त ६ च वसाहती आहेत. १ कानडा, २ ऑस्ट्रेलिया, ३ न्यू-फौंडलंड, ४ न्यूझीलंड,

---

right ought to have full power and authority to make laws and statutes of sufficient force and validity to bind the colonies and people of America, subjects of the Crown of Great Britain in all cases whatsoever!

(Declaratory act. 1766

नगर वाचनालय
ता.

५ युनियन ऑफ साऊथ आफ्रिका आणि ६ आयर्लंड. या सहा वसाहतींपैकीं कानडाचे समानत्वाचे हक्क फार पूर्वी मान्य केले गेले आणि आयर्लंडचे फार उशीरा मान्य केले गेले.

प्रत्येक वसाहतीचा इतिहास या ठिकाणीं द्यावयाचा नाहीं, व त्याचा प्रस्तुत प्रश्नाशीं तितकासा संबंधहि नाहीं. पण या वसाहतींच्या राजकीय घटनेंतील टप्प्यांचा निर्देश करणें उद्बोधक झाल्याशिवाय रहाणार नाही.

## १ कानडा

दोन कानडांच्या इतिहासांतच आधुनिक घटनांचे मूळ सांपडतें. तेव्हां तो इतिहास आपण अवलोकन करूं. १६०८ सालीं फ्रेंचांनीं कानडामध्यें वसाहत स्थापली. त्यांचें व ब्रिटिश वसाहतवाल्यांचें युद्ध होऊन १७६० सालीं ती वसाहत ब्रिटिशांनीं जिंकली. १७६३ सालीं पॅरिसला तह झाला व कानडा ब्रिटिश वसाहत झाली व ती क्वेबेकचा प्रांत म्हणून समजण्यांत आली. तेथें ब्रिटिश गव्हर्नर्स नेमले जाऊं लागले. या गव्हर्नर्सना असें सांगण्यांत आलें होतें कीं, त्यांनीं एक कौन्सिल नेमावें व प्रांतांतील जमीनदारांचें एक मंडळ बोलवावें. तेथें वाढत चाललेलें अल्पसंख्याक ब्रिटिश वसाहतवाले म्हणू लागले कीं, गव्हर्नरला सल्ला देण्याचा अधिकार आमचा आहे आणि तेथील कारभार चालविण्याला आम्हालाच हक्क आहे. फ्रेंच व इंग्लिश अशा दोघांमध्यें तेथें झगडा सुरू झाला व विचित्र परिस्थिती निर्माण झाली. या झगड्याचा अंत १७७४ च्या क्वेबेकचा कायदा करून झाला. या कायद्यानें कॅथॉलिकांना बरेच धार्मिक हक्क मिळाले. गव्हर्नरनें कौन्सिल नेमावें; पण या कौन्सिलच्या वटहुकुमांना इंग्लंडनें मान्यता द्यावी व करवसुली कौन्सिलनें करावी असें ठरलें. कानडाच्या राज्यघटनेचा हा पहिला टप्पा होता.

त्यानंतर अमेरिकेनें स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें व ती इंग्लंडपासून फुटून निघाली. अमेरिकेंतील कांहीं राजनिष्ठ लोकांना तेथें रहाणें मानवलें नाहीं व ते कानडांत आले. त्यांनीं आपलीं घरेंदारें मालमिळकतींवर पाणी सोडलें, पण ते आपले राजकीय हक्क सोडण्यास तयार नव्हते. त्यांना प्रातिनिधीक संस्थांवर व

राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्याची संवय होती. अमेरिकेनें ज्या कराच्या हक्का-करतां युद्ध केलें ते हक्क व राज्यकारभारावरील तो ताबा त्यांना हवा होता. याच्या उलट फ्रेंचांची स्थिति होती. त्यांना अशा प्रातिनिधीक संस्थांची संवय नव्हती. ते म्हणत, या संस्था म्हणजे कर वसूल करणाऱ्या इंग्रज संस्था आहेत. तें खरेंहि होते. कारण इंग्लिश अल्पसंख्याक म्हणत, हा आमचा अधिकार आहे व आम्ही फ्रेंचांना समानत्वानें वागवणार नाहीं. हीं त्यांचीं भांडणें शेवटीं १७८८ सालीं लंडनपर्यंत गेलीं. लंडनमध्यें गेलेल्या ब्रिटिश अल्पसंख्याकांनीं क्वेबेकचा कायदा रद्द करा, प्रातिनिधीक संस्था सुरू करा व त्यांच्या हातीं कराचे अधिकार द्या असें सांगितलें. त्यामुळें नवा घटना कायदा १७९१ सालीं पास झाला. हा कायदा कानडाच्या राज्यघटनेचा दुसरा टप्पा होता.

ह्या कायद्यानें कानडाचे दोन भाग केले. एक वरचा व दुसरा खालचा. प्रत्येक भागांत निवडणुकीनें स्थापन होणारें एकेक कायदेमंडळ निर्माण केलें व त्यांना कायदे करण्याचे अधिकार दिले. एकेक सरकारनियुक्त वरिष्ठ गृहहि त्याच वेळीं निर्माण करण्यांत आलें. या नव्या कायद्यानें कार्यकारी मंडळाच्या हातांत सत्ता गेली. हें कार्यकारी मंडळ गव्हर्नर नेमीत असे व तें मंडळ खालच्या सभागृहाला जबाबदार नसे. खालचे कायदेमंडळ आपल्या हक्काकरतां भांडू लागलें. त्यांनीं आम्ही कायदे करावेत व ते सरकारनीं मान्य करावेत असा हट्ट धरावा. त्यामुळें झगडे होऊं लागले. गव्हर्नरनीं हें कायदेमंडळ अनेक वेळां रद्द केलें. खालच्या व वरच्या कानडांत अशीं भांडणें चालू असत व राज्यकारभार खुंटून जाई. ४६ वर्षेंपर्यंत ही हाणामारी चालू होती. याचा शेवट दोन्ही कानडांनीं बंडें करण्यांत झाला.

या कलहांत तीन दर्यावर्दी प्रांतहि सहभागी होते. हें तीन प्रांत नोव्हास्कोशिया, न्यू ब्रन्सविक व प्रिन्स एडवर्ड बेट होत. त्यांनाहि कार्यकारी मंडळाची सत्ता असह्य झाली होती. अशा परिस्थितींत लॉर्ड डरहॅम यांचीं १८३८ सालीं गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. हे गव्हर्नर जनरलसाहेब सुलतानशाही गाजविण्याकरितांच तेथें गेलें. त्यांच्या सुलतानशाहीमुळें त्यांना नोव्हेंबरमध्यें म्हणजे सात आठ महिन्यांनीं परत बोलावण्यांत आलें. त्यांच्या-

बरोबर लंडनला चर्चा झाली. डरहॅम साहेबांनीं तेथें कांहीं विधायक सूचना केल्या. त्यांतील तीन महत्वाच्या होत्या. कानडा एक करावेत अशी पहिली सूचना, कायदेमंडळाला जबाबदार असें कार्यकारी मंडळ नेमावें ही दुसरी सूचना व गव्हर्नरनीं कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानें चालावें ही तिसरी सूचना. ही शेवटची शिफारस दर्याकांठच्या तीन प्रांतांनाहि लागू करावी असें त्यानें सांगितलें. दर्याकांठच्या प्रांतांनीं स्वेच्छेनें या संयुक्त राज्यांत यावें, असेंहि त्यानें सुचविलें. डरहॅमच्या शिफारसीनीं वसाहतीच्या स्वराज्याचा पाया घातला असें म्हणतां येईल. या सूचनेचा विचार करण्याकरतां दर्याकांठचे तीन प्रांत चार्लटौऊनला १ सप्टेंबर १८६४ रोजीं जमले. या परिषदेकरितां कानडा सरकारनें आपलें शिष्टमंडळ त्या तीन प्रांतांना मोठ्या संघांत येण्यास विनंती करण्याकरतां पाठविलें. त्याचा परिणाम होऊन दोन कानडा व दर्याकांठचे तीन प्रांत यांची घटनापरिषद भरली. या परिषदेला घटनापरिषद असें नांव नसलें तरी ती घटनापरिषदच होती. ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी तेथें आले नव्हतें. या परिषदेनें घटनेचा खर्डा तयार न करतां ७२ ठराव केलें. या ठरावांत फेडरेशन मान्य करण्यांत आलें. दोन कानडांना स्वतंत्र प्रांतिक राज्यें आणि दर्याकाठच्या तीन प्रांतांना तीन प्रांतिक राज्यें असावीं असें ठरलें. या संघराज्यांत इतरांना यावयास दार मोकळें ठेवलें होतें. हे ठराव पुढें प्रत्येक प्रांतानें आपापल्या कायदेमंडळापुढें ठेवले व त्यांत यत्किंचित फरक न करतां पण मोठी भांडणें होऊन पास झाले. नंतर त्यांनीं एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविलें व इंग्लंडच्या पार्लमेंटनें त्या ठरावाला अनुसरून बिल तयार केलें. त्या कायद्याला ब्रिटिश नॉर्थ अमेरिका ॲक्ट असें म्हणतात. या कायद्यानें चार प्रांतांत संयुक्त राज्य झाले. पुढें त्यांत इतर प्रांत येऊन कानडाचें ९ प्रांतांचें फेडरेशन झालें. १९०५ मध्यें हें फेडरेशन पूर्ण झालें. ही घटना करण्यांत ब्रिटिश सरकारचा बिलकूल हात नव्हता. कानडांत ९ प्रांत आले ते:—१ क्वेबेक, २ ऑंटेरिओ, ३ न्यूब्रन्सविक, ४ नोव्हास्कोशिया, ५ एडवर्ड आयलंड, ६ मॅनिटोबा ७ सासकाचेवान, ८ आल्बर्टा, ९ ब्रिटिश कोलंबिया.

१८६७ च्या कायद्याचा उद्देश निरनिराळ्या प्रांतांना जबाबदारीचें स्वराज्य

 / देवगिरीकर त्र्यंबक रघुनाथ

द्यावें व सर्व प्रांतांचें एक संयुक्त राज्य करावें असा होता. फेडरेशनमध्यें येणें न येणें ही ऐच्छिक गोष्ट होती. फेडरेशनमध्यें येण्याशिवाय ह्या भांडखोर प्रांतांना गत्यंतरच नव्हतें. कारण स्वतंत्र झालेला अमेरिका आपल्यावर स्वारी करील, ही भीति त्यांना वाटत होती. तसेंच अमेरिकेनें आपल्या देशांत येणाऱ्या मालावर संरक्षक जकाती बसविल्यामुळें त्यांना आत्मरक्षणाकरतां भांडणें सोडून देणें क्रमप्राप्त झालें १८७० पासून १९०५ पर्यंत म्हणजे ३५ वर्षेपर्यंत निरनिराळ्या प्रांतांना फेडरेशनमध्यें यावयाचा विचार करावयास लागलीं. कानडाच्या राज्यांत अशा प्रकारें ९ प्रांतांचीं नऊ व मध्यवर्ती एक अशीं १० राज्यें आहेत. प्रत्येक प्रांत आपल्या कायदेमंडळाला जबाबदार आहे. मध्यवर्ती व प्रांतिक कारभाराची वाटणी करून टाकण्यांत आली आहे. फेडरेशनचें हें मुख्य तत्त्व तेथें लागू करण्यांत आल्यामुळें कानडाचें फेडरेशन हें आतां चांगलें कार्यक्षम झालें आहे. मध्यवर्ती सत्तेला प्रांताच्या कारभारांत हात घालतां येत नाहीं; कारण प्रांतिक राज्यें हीं मध्यवर्ती सत्तेनें निर्माण केलेलीं नाहींत. कानडाच्या स्वराज्याला अशा प्रकारें १८६७ च्या नॉर्थ अमेरिकन ॲक्टनें जन्म दिला आणि तेथें संपूर्ण स्वायत्तता व जबाबदारीचें राज्य सुरूं झालें.

## २ न्यू फौंडलँड

न्यू फौंडलँडला १८३२ मध्यें प्रातिनिधिक सत्ता दिली गेली आणि १८५५ सालीं तेथें जबाबदारीचें राज्य सुरूं करण्यांत आलें. १९३४ पासून ही घटना त्यांच्याच सांगण्यावरून तात्पुरती तहकूब केली गेली.

## ३ आस्ट्रेलिया

१९०० सालापूर्वी ऑस्ट्रेलियांत कानडा किंवा दक्षिण आफ्रिकेप्रमाणें भिन्न भिन्न वर्णांचा झगडा नव्हता. ऑस्ट्रेलियांतील गोरी लोकवस्ती एकाच वर्णाची होती व ती ब्रिटिश बेटांतून जाऊन राहिलेल्या लोकांची बनली होती. दक्षिण व पश्चिम ऑस्ट्रेलिया, न्यू साऊथ वेल्स, व्हिक्टोरिया, क्विन्सलँड, टास्मानिया, न्यूझिलंड येथील वसाहतींत ब्रिटिश लोकच रहात असत.

पाने १२५
क्र. ८३०९
२०।२४।



त्यांच्यांत आर्थिक प्रश्नाबाबत भिन्नता होती. पण कानडा जसा अमेरिकेच्या आक्रमणाला भिऊन एक झाला, त्याप्रमाणें पॅसिफिक महासागरांत जर्मनी व जपानची वाढती सत्ता पाहून तेथील ब्रिटिश लोक एक झाले. ऑस्ट्रेलेशिया-मधील सर्व वसाहती जर एकवटल्या तर त्या ब्रिटिश साम्राज्यावर पॅसिफिक समुद्रांतील वसाहतींच्या हक्क सवलतीसंबंधीं जितके दडपण आणूं शकतील तितकें एकेकट्या वसाहती आणू शकणार नाहींत, हें त्यांनीं पाहिलें. त्याच-प्रमाणें या निरनिराळ्या वसाहतींनीं आपल्याभोवतीं संरक्षक जकातींचे इतके तट उभे केले होते कीं, त्यामुळें व्यापार करणें कठीण होऊं लागलें होतें. या व इतर कारणामुळें ऑस्ट्रेलेशियांतील वसाहतींनीं इंग्लंडकडे फेडरेशनची मागणी केली. कानडामध्यें प्रांतांना प्रथम स्वराज्य द्यावें लागलें आणि नंतर त्या प्रांतांचें संयुक्त राज्य झालें. ऑस्ट्रेलेशियांतील निरनिराळ्या वसाहती या पूर्णपणें स्वतंत्र होत्याच. त्यांना फक्त एकत्रित करण्याकरितां ब्रिटिश सरकारच्या फेडरेशनची जरूरी होती.

१८९१ सालीं ऑस्ट्रेलेशियाची कन्व्हेंशन भरली व तिने एक घटना तयार करून पार्लमेंटाकडे कायदा करण्याकरतां पाठविली. पण ही घटना मोडली. कारण न्यू सौथ वेल्सनें तिला मान्यता देण्याचें नाकारलें. इतर वसा-हतींनींहि त्याबद्दल उत्साह दाखविला नाहीं. १८९४ सालीं दुसरा प्रयत्न करण्यांत आला. या वेळीं कन्व्हेंशनकरता जे निरनिराळे प्रतिनिधी येतील, त्यांची निवड पार्लमेंटनें न करतां वसाहतींतील लोकांनीं करावी, असें ठरलें. कारण लोकांनीं उत्साह दाखविल्याशिवाय हें काम होणार नाहीं, असें त्यांनीं पाहिलें. क्विन्सलॅंड व न्यूझीलंड, शिवाय सर्व प्रतिनिधी या परिषदेला आले. १८९४ ची ही परिषद म्हणजे घटनापरिषदच होती असें म्हणतां येईल. तेथें पास झालेल्या घटनेला निरनिराळ्या वसाहतींतील लोकांची मान्यता घेतली. १९०० सालीं त्या ठरावावर आधारलेलें बिल ब्रिटिश पार्लमेंटने पास केलें. त्याला कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया कॉन्स्टीटयूशन ॲक्ट म्हणतात.

१८९४ च्या परिषदेंत फेडरेशनचें महत्त्व वर्णन करण्यांत आलें. पण

या परिषदेंतून पुढें आणखी एक, दर वसाहतींतून दहा अशा ६० जणांची दुसरी कन्व्हेंशन भरविण्यांत यावी असें ठरलें. ही कन्व्हेंशन २३ मार्च १८९७ रोजीं भरली. तिनें घटनेचा खर्डा तयार केला. तो प्रत्येक वसाहतीच्या कायदेमंडळांतून चर्चिला गेला व दुरुस्त होऊन आला. या कन्व्हेंशनची शेवटची बैठक २० जानेवारी १८९८ रोजीं झाली व १६ मार्चला त्याला अखेरचें स्वरूप आलें. पुढें वर वर्णन केल्याप्रमाणें १९०० सालीं कायदा पास झाला.

या ऑस्ट्रेलियाच्या घटनेंत सहा प्रांत अंतर्भूत झाले. त्या फेडरेशनमध्यें नवे प्रांत अंतर्भूत करावयास परवानगी आहे. तथापि न्यूझीलंड या कॉमनवेल्थमध्यें आला नाहीं. ऑस्ट्रेलियाचें फेडरेशन हे अमेरिकेच्या धर्तीवर आहे. ऑस्ट्रेलियांतील कॉमनवेल्थला कांहीं ठराविक अधिकार दिले आहेत व त्यांत हस्तक्षेप करतां येत नाहीं. कानडांत प्रांतांना ठराविक अधिकार आहेत व शेषाधिकार डोमिनिअनला आहेत. कानडांत डोमिनिअन सरकार ले. गव्हर्नर्स नेमूं व काढूं शकतें आणि प्रांतांना अमुक कायदे करूं नका असें सांगूं शकतें. ऑस्ट्रेलियांतील घटकांचे गव्हर्नर्स बादशहा नेमतो व त्यांच्या अधिकारांत कॉमनवेल्थ हात घालूं शकत नाहीं. कानडाच्या घटनेचा अर्थ ब्रिटिश प्रीव्हि कौन्सिल करते. पण ऑस्ट्रेलियांत हा अधिकार हायकोर्टाकडे दिला आहे. कानडाच्या घटनेंत दुरुस्ती करावयाची असली तर ब्रिटिश पार्लमेंटाकडे जावें लागतें. पण ऑस्ट्रेलियाच्या घटनेंत तेथील सरकार व लोक दुरुस्ती करूं शकतात.

हे फरक दाखविण्याचें कारण इतकेंच आहे कीं, वसाहतींचें स्वराज्य म्हटलें कीं, चहूंकडे एकच राज्यपद्धत आहे असें मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक वसाहतीनें आपली घटना आपल्या परंपरेप्रमाणें, इतिहासाप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें बनविली आहे. नवे नवे प्रश्न बदलत्या काळांत निर्माण होतात व त्यांचीहि व्यवस्था वेळोवेळीं करावी लागते. त्यासंबंधींचे बारीकसारीक नियम हे साऱ्या वसाहतींत कसे सारखे असूं शकतील ?

## ४ न्यूझीलंड

चवथी वसाहत न्यूझीलंडची. वास्तविक न्यूझीलंडचा समावेश ऑस्ट्रेलियांतील कॉमनवेल्थमध्येंच व्हावयास पाहिजे होता. पण भिन्न आर्थिक हितसंबंधामुळें हा छोटासा विभाग स्वतंत्र राहिला आणि त्यानें फेडरेशनमध्यें आत्मार्पण केलें नाहीं. न्यूझीलंडकरतां ऑस्ट्रेलियानें दार उघडें ठेवलें आहे; पण त्यानें अजूनपर्यंत तशी इच्छा प्रदर्शित केली नाहीं.

ऑस्ट्रेलियांत १९०० च्या कायद्यापूर्वी जी अनेक राज्यें होतीं, त्यांतील न्यूझीलंड हें एक होते. ऑस्टेलियांतील सहा राज्यांत १८२३ पूर्वी सुलतानशाही ( autocratic rule ) च चालू असे. पण १८२३ पासून तेथील एकेक वसाहतींत प्रातिनिधिक स्वरूपाचें व नंतर जबाबदारीचें राज्य सुरू झाले. न्यूझीलंड ही १८४१ सालीं स्वतंत्र वसाहत म्हणून स्थापन झाली. तिला १८५२ सालीं साम्राज्यसरकारनें प्रातिनिधिक राज्य दिलें आणि १८५६ सालीं तेथें पूर्ण जबाबदारीचें राज्य स्थापन झालें.

## ५ दक्षिण आफ्रिकेचा संघ

दक्षिण आफ्रिकेच्या संघांत चार वसाहती समाविष्ट झाल्या आहेत. केप कॉलनी; नाताळ; ट्रान्सवाल; आणि ऑरेंज रिव्हर कॉलनी. यांतील पहिल्या दोन वसाहतींत इंग्रजांचें संख्याधिक्य आहे आणि दुसऱ्या दोनमध्यें बोअर लोकांचें संख्याधिक्य आहे. या भिन्नतेमुळें दोघांमध्यें सलोखा क्वचितच असे. बोअर लोकांवर म्हणजे ट्रान्सवाल व ऑरेंज रिव्हर कॉलनीवर इंग्रजांचें राज्य होतें. १९०२ च्या लढ्यानंतर या दोन्ही वसाहती 'क्रौन कॉलनीज' म्हणून मानल्या जाऊं लागल्या. त्यांना अनुक्रमें १९०६ व १९०७ सालीं जबाबदारीचें राज्य मिळालें. पण तशी स्थिति केपची व नाताळची नव्हती. १८१४ मध्यें केप ऑफ गुडहोप दक्षिण आफ्रिकेंत सामील करून घेण्यांत आलें. त्याला १८५३ सालीं प्रतिनिधीक राज्य व १८७२ सालीं जबाबदारीचे राज्य देण्यांत आलें. खुद्द इंग्लिश लोक आपल्या रक्तामांसाच्या लोकांना जबाबदारीचे राज्य द्यावयास पन्नास साठ वर्षे लावतात हें आश्चर्य नव्हें काय? नाताळ

१८४३ सालीं खालसा केला गेला; १८४५ सालीं ती स्वतंत्र वसाहत झाली. १८५६ मध्यें त्यांना प्रातिनिधिक राज्य दिलें व १८९३ मध्यें जबाबदारीचें राज्य देण्यांत आलें. अशा प्रकारें १८७२, १८९३, १९०६, १९०७ या सालांत तेथील चारहि वसाहती जबाबदारीचें स्वराज्य उपभोगूं लागल्या. भौगोलिक व आर्थिक दृष्ट्या या वसाहती कानडा किंवा ऑस्ट्रेलियापेक्षां अधिक निकटच्या अशा होत्या. ह्या वसाहती व्यापारधंद्याकरतांच स्थापन झाल्या असल्यामुळें अंतर्गत खुला व्यापार आणि रेल्वेच्या वाहतुकीची जरूरी त्यांना भासूं लागली. पण या वसाहती एकत्र येईनात. त्यांच्यांत जातीय भांडणें होतींच. शिवाय हिंदी व आफ्रिकन लोकांचाहि प्रश्न त्यांच्या पुढें होता. तथापि औद्योगिक प्रगती करतां एकत्र येण्यावांचून त्यांना गत्यंतरच नव्हतें. फेडरेशनची कल्पना त्यांना पसंत पडणारी नव्हती. कारण ऑस्ट्रेलिया किंवा कानडांत त्या पद्धतीचें राज्य मोठेसें यशस्वी झालें नव्हतें. 'राजकीय दृष्ट्या जर अधिक निकट येण्याची संघटना अव्यवहार्यच ठरत असेल, तरच फेडरेशनसारखी उधळेपणाची व कार्यक्षमताविहीन अशी पद्धत समर्थनीय ठरते'* असें जेनिंग्स व यंग हे लेखकद्वय म्हणतात.

तेव्हां आफ्रिकेंत फेडरेशनसंबंधीं आतुरता फारशी दिसली नाहीं. त्यांना या चारहि वसाहतींचा एकजिनसी संघ करावयाचा होता. त्यासंबंधींचा पहिला प्रयत्न १८५८ सालीं झाला. १८७७ सालीं 'ॲक्ट ऑफ युनियन' हा पासहि झाला. पण बोअर व इंग्लिश यांच्या भांडणांत हा संघ जीव धरूं शकला नाहीं. बोअर युद्ध होऊन जाईपर्यंत एक संघ बनविण्याचें सारे प्रयत्न वांझ ठरले. १९०७ सालीं लॉर्ड सेलबोर्न या हायकमिशनरनें एक योजना तयार केली व

---

*"Fedearation is an extravagant and inefficiant form to government to be justifed only where a closer form of orgainsation is politically impractica. ble" by jennings and young.

(Constitutional laws of British Empire. p.236

तींत संघाच्या नफ्यातोट्याची वाटाघाट केली. बोअर व इंग्लिश यांची वैरें शमलीं असल्यामुळें दोघेहि संयुक्त राज्याला तयार झाले. १९०८ सालीं त्यांची कन्व्हेंशन भरली व तेथें राज्यपद्धतीचा विचार झाला. कांहींनीं फेडरेशबद्दल अनुकूलता दाखविली; पण बहुमत युनियनच्या बाजूचें होतें. चारहि वसाहतींचें एकच सभागृह असावें व त्यावर एकच सत्तेचें नियंत्रण असावें, असा वाद-विवादाचा सूर वहात होता. काळ्या लोकांचें काय करावें हा प्रश्नहि या चर्चेच्या वेळेला निघाला. त्या प्रश्नानें चांगलेंच भंडावून सोडलें. पण काळ्या लोकांना कोण विचारतो? फेडरेशनमध्यें वर्णीय भाडणें कमी होतात आणि युनियनमध्यें जास्ती होतात असें नसल्याचें अनुभवी सांगूं लागले. शेवटीं 'फेडरेशन' ऐवजीं 'युनियन'च स्थापावी असें ठरलें. वसाहतींची सारी सत्ता हिरावून घेणें चांगलें नाहीं हें तडजोडीनें मान्य होऊन त्यांच्या हवालीं कांहीं कांहीं अधिकार करण्याचें कबूल केलें.

१९०९ च्या फेब्रुआरींत वरील धोरणानुसार झालेली घटना चारहि वसाहतींच्या सरकाराकडे मान्यतेकरतां पाठविण्यांत आली. त्यांत दुरुस्त्या वगैरे केल्या जाऊन मे महिन्यांत चारहि वसाहतींनीं आपली अनुकूलता व्यक्त केली. नाताळमध्यें तर साऱ्याच लोकांचें मत घेतलें गेलें. नंतर चारहि वसाहतींचे प्रतिनिधी लंडनला गेलें, बादशहाना त्यांनीं विनंति केली व या विनंतिनुसार पार्लमेंटनें १९०९ चा दक्षिण आफ्रिकेचा कायदा केला.

दक्षिण आफ्रिका ही 'फेडरेशन' नाहीं 'युनियन' आहे. याचा अर्थ तेथें वरिष्ठपणा कोणाचा असेल तर तो मध्यवर्ती सत्तेचा आहे, घटकांचा नाहीं. फेडरेशनमध्यें ज्याप्रमाणें घटक राज्यांना सत्ता विभागून दिली असतें व त्या सत्तेंत फेडरेशनला हस्तक्षेप करतां येत नाहीं, तसा प्रकार युनियनमध्यें नाहीं. कलम ५९ म्हणते "(Union) Parliament shall have full power to make laws for the peace, order and good Government of the union." तडजोडीनें घटक वसाहतींना जी काय सत्ता मिळेल तीच त्यांना उपभोगतां येते. अशी सत्ता येथें वाटून देण्यांत

२।७०५७ २० / ५१



आलेली आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटला सुद्धां १९३१ च्या वेस्टमिन्स्टर कायद्यानंतर या युनियनकरतां कायदे करण्याचा अधिकार नाहीं.

आफ्रिकेनें ही घटना बनवितांना बाह्यतः कितीहि सभ्यता दाखविली असली, तरी त्या घटनेमध्यें येथील मालकांना म्हणजे आफ्रिकन लोकांना शक्य तितके कमी अधिकार मिळावेत म्हणून मोर्चेबंदी केली आहे. केपकॉलनी ही सर्वांत वस्ताद आहे. तिनें फेडरेशनबद्दल आग्रह धरला होता. कारण काळ्या लोकांचा उपसर्ग फेडरेशनमुळें लागणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. पण ट्रान्सवॉल ही युनियनची मोठी आग्रही असल्यामुळें ट्रान्सवॉलचें म्हणणें मान्य झालें. अर्थात काळ्या लोकांचा शक्य तितका कमी प्रवेश युनियनच्या पार्लमेंटांत व्हावा म्हणून मतदानाची लायकी वगैरे सर्व बाबतींत खबरदारी घेतली आहे. ज्या लोकांचा देश त्यांना मात्र येथें हक्क नाहींत आणि हे परके लोक तेथें जाऊन राज्य करतात आणि घटनाहि बनवतात !

## ६ आयर्लंड

वरील पांचहि वसाहती या खऱ्या वसाहती आहेत. इंग्लंडमधील लोक कानडा, न्यू फौंडलंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिकेंत गेलें; येथें त्यांनीं वसाहती केल्या आणि तेथील मूळच्या रविवाशांची पर्वा न बाळगतां त्यांनीं आपल्या क्षेमस्थैर्य ऐश्वर्याकरतां घटना तयार केल्या, आयर्लंडचें तसें नाहीं. आयर्लंडच्या उत्तरेला म्हणजे अल्स्टरमध्यें इंग्रज वसाहतवाले जाऊन राहिले खरे पण त्यांना सारा आयर्लंड व्यापता आला नाहीं. त्यांनीं फक्त अल्सटर प्रांत आपल्याकडे ठेवला आणि आजहि आयर्लंड स्वतंत्र झाला असला तरी उत्तर आयर्लंड हा स्कॉटवेल्सप्रमाणें ब्रिटिश बेटांचा एक विभाग आहे.

आयर्लंडमध्यें ७०० वर्षेपर्यंत स्वातंत्र्याकरितां झगडा चालू होता. इंग्रजांनीं कोठेंहि केली नाहीं इतकी दडपशाही आयर्लंडमध्यें केली. जित व जेते यांची आघात व प्रत्याघाताची साधनें हिंसाप्रधान असल्यामुळें आयर्लंडच्या

स्वातंत्र्याचा झगडा हा रक्तरंजित झाला. शेवटपर्यंत इंग्रजांनीं आयर्लंडला तरवारीच्या पात्यावर खेळवलें आणि शूर आयरिशांनीं तितक्याच निकरानें इंग्लंडला तोंड दिलें. इंग्रजांनीं जसे आयरिश ठार करावेत तसें आयरिशांनीं इंग्लिश ठार करावेत. इंग्रजांनीं आयर्लंडच्या बाबतींत अत्यंत अन्याय व क्रूरपणा केला. इंग्लंडमधील मुत्सद्यांची बुद्धि एकंदरींत भ्रष्ट झाली होती असें दिसतें. नाहींतर त्यांना या देशांवर आग पाखडण्याचें कांहींच कारण नव्हतें. या प्रकारामुळे जगाचा इतिहास जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत इंग्रजांच्या दुष्कृत्याचा डाग पुसला जाणार नाहीं हें निश्चित आहे. १७८३ सालीं ग्रॅटनच्या नेतृत्वाखालीं आयरिशांनीं प्रचंड चळवळ करून स्वतःच्या देशांत पार्लमेंट स्थापन करून घेतलें. आयर्लंडमध्यें प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक यांचें उभे वैर होतें. इंग्लंड प्रॉटेस्टंटाच्या बाजूचें होतें आणि आयर्लंड हें कॅथॉलिक ( अल्स्टर सोडून ) असल्यामुळें कॅथॉलिकावरील मतदानाचें, प्रतिनिधीत्वाचें हक्क मिळावे म्हणून झगडत राहिलें. १७८३ मध्यें पार्लमेंट स्थापन झालें खरें; पण कॅथॉलिकांना मतदानाचा हक्कहि नसल्यामुळें सत्ता प्रॉटेस्टंटाच्या हातीं गेली. त्यामुळें आयरिश लोक क्रुद्ध झालें. १७९८ सालीं वुल्फटोनचें बंड झालें. या बंडाला फ्रेंचांची मदत होती. इंग्रजांनीं ७०००० आयरिश ठार मारून हें बंड मोडून टाकले आणि त्याबरोबरच आयर्लंडच्या स्वतंत्र पार्लमेंटाचें विसर्जन केलें. स्वार्थी आयरिश लोकांना नादीं लावून, नोकऱ्यांचें वचन देऊन, अधिकाराची लालूच दाखवून त्यांच्याकडूनच आपल्याला स्वतंत्र पार्लमेंट नको असा कायदा करून घेतला. १८०१ मध्यें ॲक्ट ऑफ युनियन पास झाला आणि आयर्लंडचें १०० प्रतिनिधी इंग्लंडच्या पार्लमेंटांत घेण्याचें ठरलें. पार्लमेंटांतील ६०० सभासदांत आयर्लंडचे १०० सभासद अडवणूकीशिवाय कांहींहि करूं शकत नव्हतें. तेव्हां त्यांनीं 'होमरूल'ची म्हणजे आम्हांला स्वतंत्र 'गृहराज्य' पाहिजे अशी चळवळ सुरूं केली. ती चळवळ १०० वर्षांपेक्षां जास्त काळ चालवावी लागली. कधीं कधीं होमरूल बिल पास होण्याच्या बेतांत येई पण पुनः कांहीं तरी संकट येऊन तें लोटलें जाई. एकदां तर कॉमन्स सभेनें तें बिल पासहि केलें; पण लॉर्डसनीं तें फेटाळलें. अशा प्रकारें आयर्लंडच्या स्वातं-

ध्याची वावडी हवेंत गिरक्या खातखात महायुद्धापूर्वी स्थिरावली. १९१२ सालीं होमरूल बिल पार्लमेंटांत आलें. त्या बिलामध्यें परराष्ट्रीय राजकारण, जकाती, संरक्षण, जमीनखरेदी व ६ वर्षेपर्यंत पोलीस इतकीं खातीं सोडून आयर्लंडला स्वराज्य द्यावयाचें बिलानें ठरविलें. पण अल्स्टरचे रहिवाशी म्हणू लागले, हें बिल पास झालें तर आपण बंड करूं. त्यांनीं प्रतिकाराकरतां एक लाख स्वयंसेवक तयार केले. या स्वयंसेवकांना तोंड देण्याकरतां आयर्लंडनेंहि लाख स्वयंसेवकांची सेना तयार केली. अशा प्रकारें उभय सैन्यें उभी असतां महायुद्ध पुकारलें गेलें. इंग्लंड अडचणींत सांपडलें. आतां आयर्लंड काय करणार असा प्रश्न उत्पन्न झाला. पण आयर्लंडतर्फे रेडमंडनें ता. ३ ऑगस्ट १९१४ रोजीं इंग्लंडला मदत देण्याची पार्लमेंटांत घोषणा केली. या घोषणेमुळें व युद्धाच्या संकटामुळें इंग्लंडचा दृष्टिकोण बदलला आणि १९ सप्टेंबर १९१४ रोजीं फार वर्षे भिजत पडलेलें होमरूल बिल पास झालें. पण युद्धसंपेपर्यंत या बिलाचा अंमल करूं नये अशी मेख त्यांत मारून ठेवली. आयर्लंडमधील लोक रेडमंडच्या वचनामुळें व इंग्लंडच्या कावेबाजपणामुळें खवळले. देशांत प्रतिकाराकरतां तयारी होऊं लागली. १९१६ ईस्टरचें अयशस्वी बंडहि झालें. त्यांनीं सैन्यभरती-विरुद्ध प्रचार केला.

युद्धसमाप्तीनंतर असल्या बिलाची आयर्लंडला यत्किंचित पर्वा वाटेनाशी झाली. त्यांना ‘ रिपब्लिक ’ पाहिजे होतें. सिनफेन पक्ष त्याकरतां निर्माण झाला. इंग्लंडची स्थिती १९१८ सालीं फारच केविलवाणी झाली होती. महा-युद्धांत पराभव पावण्याची पाळी त्यांच्यावर आली होती. तेव्हां आयर्लंडचा प्रश्न सोडविण्याकरतां एक परिषद भरविण्याचें त्यांनीं ठरविलें. ह्या परिषदेंत सिनफेनर्स पुढील अटीवर भाग घेण्यास तयार होते. १ पूर्ण स्वातंत्र्याचा विचार, २ बहुमतानें ठरलेल्या गोष्टी मान्य करूं अशी इंग्लंडनें अमेरिकेला व युरपला खात्री देणें, ३ प्रतिनिधींची निवड सर्व वयांत आलेल्या आयरिशांनीं करणें. पण या अटी मान्य झाल्या नाहींत. आयरिशांनीं त्यानंतर डेल एरीनची स्थापना केली. पार्लमेंटवर बहिष्कार घातला. १९१९ ते १९२१ पर्यंत अंगावर रोमांच उभे राहतील अशी भयंकर चळवळ तेथें झाली. शेवटीं त्यांच्या

अनेक शतकांच्या त्यागाला व कष्टाला फळ येऊन २१ जून १९२१ रोजीं बादशहानें तहाकरतां आयर्लंडकडे विनंति केली. अशाप्रकारें आयर्लंडचा स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वीचा थोडक्यांत इतिहास आहे.

आयर्लंडमध्यें घडत गेलेल्या घटना ह्या हिंदुस्थानला बऱ्याच प्रमाणांत लागू असल्यामुळें त्याचा विस्तारशः विचार करावयास हवा. आयर्लंडची घटना ही इतर वसाहतींच्याप्रमाणें नाहीं. तींत बरेंच वैशिष्टय व नाविन्य आहे. आयर्लंडच्या लढ्याची परिसमाप्ति तहानें झाली ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. तह हा समानतेच्या भूमिकेवरूनच होऊं शकतो; विषमतेच्या भूमिकेवरून होऊं शकत नाहीं. याचा अर्थ असा कीं, इंग्लंड व आयर्लंड यांचें जेते व जित असें जें नातें होतें तें संपलें आणि उभय राष्ट्रें बरोबरीचीं झालीं. ही समानता मान्य झाल्यानंतर मग दोघांचे संबंध काय असावेत हें तहान्वयें ठरविण्यांत आलें. हा तह शब्द उगाच गौरवार्थ वापरला नसून तो पार्लमेंटनें मान्य केला आहे.

बादशहांच्या घोषणेनंतर त्यावेळचे मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांनीं डी. व्हॅलेराला आपले प्रतिनिधी लंडनमध्यें पाठविण्याबद्दल पत्र पाठविलें. डी. व्हॅलेरानें या पत्राप्रमाणें ग्रिफिथ, कॉलीन्स प्रभृतींना वाटाघाटीकरतां लंडनला पाठविलें. तेथें तह झाला; पण आयर्लंडच्या डेल एरीनमध्यें ह्या तहाला मान्यता घेणें जरूर होते. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ज्या डी. व्हॅलेरानें ग्रीफीथ कॉलीन्सला तहाच्या वाटाघाटीकरता लंडनला पाठविलें, तो डी. व्हॅलेरा तह करून आलेल्या पुढाऱ्यावर उलटला. आपल्याला तह मान्य नाहीं, आयर्लंडमध्यें रिपब्लिक स्थापन केलें पाहिजे असें तो म्हणूं लागला. रिपब्लिकच स्थापावयाचें होतें तर लंडनला प्रतिनिधी पाठविण्याचा मूर्खपणा डी. व्हॉलेराला करण्याचें कारण नव्हतें. पण डेलनें डी. व्हॅलेराविरुद्ध कॉलीन्स ग्रीफीथना पाठिंबा दिला व हा तह ६४ विरुद्ध ५७ मतानीं पास झाला.

आयर्लंडची मान्यता मिळाल्यानंतर इंग्लंडच्या पार्लमेंटांत ह्या तहाला मान्यता घेणें जरूर होतें. इंग्लंडच्या पार्लमेंटांत ह्या तहाला कायदेशीर

स्वरूप देण्याकरतां एक कायदा ता. ३१ मार्च १९२२ रोजीं पास झाला. कायदा झाल्यानंतर आयर्लंडांत तात्पुरती सत्ता निर्माण करणें जरूर होतें. नाहीं तर ह्या तहाच्या अटी अंमलांत कोण आणणार ?

तहाच्या १७ व्या कलमांत बारा महिने अस्तित्वांत रहाणाऱ्या तात्पुरत्या सरकारची योजना केली होती. हें तात्पुरतें सरकार कोणाचें बनवावयाचें ? इंग्लंडच्या पार्लमेंटांत पाठविण्याकरितां जे सभासद निवडून आले असतील त्यांचें पार्लमेंट बनावयाचें होतें. या पार्लमेंटाचीं सभा ताबडतोब बोलावून त्यांतून एक तात्पुरतें सरकार स्थापन करावयाचें, हें तात्पुरतें सरकार आयरिश पार्लमेंटला जबाबदार रहावयाचे व त्या सरकारचे हातांत ब्रिटिशांनीं सत्ता द्यावयाची असें ठरविण्यांत आले. संक्रमणावस्थेंतील तरतूदी ह्या अशा प्रकारें करण्यांत आल्या. त्याचा पाया इंग्लिश पार्लमेंटांत निवडून जाणारे सभासद समजण्यांत आला. आयरिशांचें या वरील भाष्य स्वतंत्र होतें.

यानंतरचा प्रश्न आयर्लंडची घटना बनविण्याचा होता. आयर्लंडची घटना आयरिश लोकांनींच बनविली पाहिजे असें सिनफेन पक्षांचे फारा दिवसांचें म्हणणें होतें १ नोव्हेंबर १९१७ रोजीं सिनफेन पक्षानें आपल्या सभेंत ही गोष्ट स्पष्ट केली. ' सिनफेनचें ध्येय स्वतंत्र आयरिश रिपब्लिकला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविणें हें आहे. हा दर्जा मिळाल्यावर आयरिश लोक रेफरेंडमनें आपली राज्यघटना ठरवतील. हा हेतु साध्य करण्याकरतां आयरिश लोक ब्रिटिश किंवा कोणत्याहि परक्या सत्तेला आपल्याकरतां कायदे करण्याचा हक देणार नाहींत...आयरिशांच्या हिताच्या दृष्टीनें राज्यघटना तयार करावी म्हणून सिनफेनच्या कार्यक्रमाप्रमाणें घटना परिषद ( Constituant assembly ) बोलावली जाईल.

आयर्लंड व इंग्लंड यांच्यामध्यें जो तह झाला, त्यांत आयरिश पार्लमेंटनें घटनापरिषद बोलवावी व आपली घटना तयार करावी असें कलम नाहीं. पण आयर्लंडचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आल्यानंतर घटना कशी बनवावी हें

स्वतंत्र कलमानें निर्दिष्ट करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. पण जी घटना आयरिशांनीं केली तिला इंग्लिश पार्लमेंटानें कानामात्रेचा फरक न करतां मान्यता दिली. ह्या घटनेंत तहाच्या अटींशी विसंगत अगर विरोधी कांहीं असेल तर तें आपोआप रद्द होईल, असें म्हटलें होतें. तेव्हां घटना बनविण्याचा हक्क हा सर्वस्वी आयरिशांचा असल्यामुळें व तो ब्रिटिश पार्लमेंटनें मान्य केल्यामुळें त्याचा निराळा उल्लेख अनवश्यक होता. ब्रिटिश पार्लमेंटानें ती घटना मान्य करावयाची होती व ती त्यांनीं केलीहि.

आयरिशांचे जुन्या कायद्याप्रमाणें नवें पार्लमेंट निवडणुकीनंतर स्थापन झालें व तेंच पार्लमेंट घटनापरिषद या नात्यानें बसलें. ९ सप्टेंबर १९२२ रोजीं घटनापरिषद भरली व तिनें आयर्लंडची घटना तयार केली. ह्या घटनेला परिशिष्टांत स्थान मिळालें व या परिशिष्टासह पार्लमेंटनें १९२२ चा 'आयरिश फ्री स्टेट कॉन्स्टीटयुशनचा' कायदा केला. बादशहानें त्या कायद्याला ५ डिसेंबर १९२२ रोजीं मान्यता दिली.

अशा प्रकारें आपण कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू फौंडलंड, न्यूझिलंड दक्षिण आफ्रिका व आयर्लंड यांच्या राजकीय विकासांचा इतिहास थोडक्यांत अवलोकन केला. या इतिहासावरून त्या त्या वसाहती अंतर्गत कारभाराच्या बाबतींत पूर्णपणें स्वतंत्र झाल्या असें आपणास कळून आलें. त्यांच्या घटना त्यांनींच तयार केल्या. या घटना घटना परिषदेसारख्या परिषदांच्यामार्फत तयार केल्या गेल्या. वसाहतीच्या वाढीचा हा इतिहास हिंदुस्थानला पुष्कळच उद्बोधक होईल. ह्या इतिहासावरून आपणास असेंहि दिसून येतें कीं, मुख्य मुख्य वसाहतीमध्यें एकच प्रकारची राज्यपद्धत नाहीं. भिन्न भिन्न प्रकारची योजना त्यांत दिसते. कानडांत फेडरेशन आहे, तर ऑस्ट्रेलियांत कॉमनवेल्थ आहे, आफ्रिकेंत युनियन आहे तर आयर्लंडात फ्री स्टेट आहे. शेवटच्या दोन राष्ट्रांत फेडरेशन्स नाहींत. आयर्लंड लहान देश असल्यामुळें तेथें फेडरेशनची जरूरी नाहीं. उत्तर आयर्लंड अगर अल्स्टर प्रांत त्यांत समाविष्ट झाला तर फेडरेशन त्यांना करावें लागेल. आफ्रिकेंत फेडरेशन करणें अवश्य आसतांहि त्यांनीं

फेडरेशन केलें नाहीं. कानडामध्यें व ऑस्ट्रेलियांत फेडरेशन्स आहेत. पण कानडांचे फेडरेशन हें ऑस्ट्रेलियापेक्षां निराळें आहे. बाकीच्या ज्या दोन वसाहती आहेत त्यांचा विचार करण्याची अवश्यकता नाहीं. अशाप्रकारें चार वसाहतींत चार प्रकार आपणास आढळून येतात.

★

नगर वाचनालय
ता.
सातारा

# काँग्रेस व घटना-परिषद : : २

" **मा**मुली पद्धतीनें जर एखाद्या कायदेमंडळाला कांहीं कायदे करतां येत नसले तर तें विशिष्ठ कायदेमंडळ वरिष्ठ नाहीं असें ठरतें. विशिष्ठ बाबतींत जे कायदे असतात ते घटनेचे कायदे असतात. ते कायदे बदलत्या घटनेप्रमाणें करतां येत नाहींत. या दोन कायद्यांतील फरक ओळखण्याची साधी रीत म्हणजे हे न बदलणारे कायदे कसें अस्तित्वांत आले तें पहाणें होय. पुष्कळ बाबतींत हे घटना कायदे विचार-विनिमय करून खास लोकांच्या मंडळाकडून केले जातात. त्या मंडळाला घटना-परिषद असें म्हणतात. या घटना परिषदेचें काम सामान्य कायदे करण्याचें नसते. "

सी. एफ्. स्टॉंग,

मॉडर्न पोलिटिकल कॉन्स्टीटयूशन्स.

घटनापरिषदही सामान्य कायदे बनविण्याकरतां कधींच कोणी बोलावीत नाहीं. सामान्य कायद्याकरतां प्रत्येक देशांत कायदे मंडळे असतात व तीं कायदेमंडळें असें कायदे करीत असतातच. पण जेव्हां देशांतील भूलभूत

कायदे बदलावयाचे असतात व नवीं राज्यघटना बनवावयाची असतें त्याच वेळीं घटनापरिषद बोलावली जाते. जगांतील अनेक देशानीं आपल्या घटना बनविण्याकरतां घटना परिषदा बोलावल्या व नवे कायदे केले.

हिंदुस्थानचा प्रश्न हा फार निराळा आहे. हिंदुस्थान हा स्वतंत्र देश नाहीं. हिंदुस्थानचें सार्वभौमत्व हें हिंदी कायदे मंडळाकडे नसून ते इंग्लंडच्या बादशहाकडे आहे. हें सार्वभौमत्व इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा आपल्या प्रतिनिधीमार्फत—व्हाईसरॉयमार्फत—वहिवाटतात. त्यामुळें अगदीं साधे कायदे असले तरी आमच्या कायदे मंडळाना व्हाईसरॉयच्या संमती-शिवाय त्या कायद्यांची अंमलबजावणी करतां येत नाहीं. आमच्या कायदे मंडळाना जर वरिष्ठ अधिकार असते तर आम्ही आमचे कायदे केले असते व त्यांची अंमलबजावणीहि केली असती.

सामान्य कायद्याबद्दल जर आमचे इतकें परावलंबन आहे, तर नव्या घटनेच्या कायद्याबद्दल आमचें परावलंबन किती असेल हें सांगण्याचीच जरुरी नाहीं. ज्या देशांत सामान्य कायदे व विशिष्ठ कायदे करण्याची सत्ता जनतेला असते त्याच देशाला स्वतंत्र देश असें म्हणतात. कांहीं देशांना सामान्य कायदे करतां येतात पण घटनेंत समूळ बदल करण्याचें कायदे करतां येत नाहींत. त्याकरतां अशा देशांत जनता आपल्याच हातांत सत्ता घेते व असें कायदे जनतेकरतां असल्यामुळें जनतेची परिषद बोलावते. त्या परिषदेला घटना परिषद म्हणतात.

इंग्लंडसारख्या मागासलेल्या देशांत जे कायदे झाले ते सर्व मामुली होते. राजाची सत्ता ते अद्याप मानतात. क्रांतीकारक घटना करण्याची जरुरी त्या देशाला अद्याप भासली नाहीं. अशा क्रांतीकारक कायद्यांची जरुरी जेव्हां इंग्लंडला भासू लागेल तेव्हां इंग्लंड घटना-परिषद अवश्य बोलावील. आज इंग्लंडचे कायदे हे पुष्कळ अलिखितच आहेत. इंग्लंडचा मुख्य भर रूढीनें प्राप्त होणाऱ्या हक्कावर आहे. रूढीनेंच इंग्लंडमध्यें पुष्कळ गोष्टी घडत असतात. त्यामुळें इंग्लंड आपल्या अंकित देशाना तोच सल्ला देत असते.

इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें घटनापरिषद भरली नाहीं तशी अमेरिकेंतहि भरली नाहीं. अमेरिकेनें स्वातंत्र्ययुद्ध जिंकल्यानंतर जी परिषद बोलावली त्या परिषदेला आपण पाहिजे तर घटना परिषद म्हणू शकूं. पण अमेरिकेंतील जनतेला त्यानंतर आपल्या घटनेंत बदल करण्याकरतां घटना परिषद बोलावण्याची अवश्यकता भासली नाहीं हें खरें आहे. पण हे दोन प्रमुख देश सोडले तर बाकीच्या देशांत घटनापरिषदा भरल्या व त्या परिषदांनींच आपापल्या घटना तयार केल्या.

सामान्य कायदे व क्रांतीकारक बदल यांत खूपच फरक असल्यामुळें कांहींजण असें म्हणतात कीं, घटना परिषद ही क्रांतीशिवाय अस्तित्वांतच येऊ शकत नाहीं. आपल्या स्वामित्वावर घाव घालणारी घटना तयार करण्याकरतां कोणता राजा अगर राजसत्ता घटनापरिषद बोलावील असें ते विचारतात. तुम्ही राजाला किंवा जुन्या अधिकारारूढ पक्षाला उखडून टाकण्याकरतां जर घटनापरिषद बोलवा असें त्याना त्याना सांगितलेत तर ते कसें मान्य करतील ? तेव्हां अधिकारारूढ सत्तेचें समूळ उच्चाटन केल्याशिवाय नव्या घटनेचें मूळ तेथें रुजवतां येणारच नाहीं. असें या विचारसरणीच्या लोकांचें म्हणणें आहे. हें त्यांचें म्हणणें चूक आहे असें कसें म्हणतां येईल ? तुम्ही सशस्त्र क्रांती केलीत, रक्तपात केलात, जुने अधिकारी किंवा राजे यांचा नायनाट केलांत म्हणजे जुनी सत्ता अस्तित्वांतच रहात नाहीं. पण घटनेशिवाय जुन्याना काय किंवा नव्याना काय राज्यकारभार चालवितां येत नाहीं. तेव्हां हे क्रांतीकारक नवी घटना करण्याकरतां जनतेला बोलावतात व जनता ती घटना तयार करते. ते क्रांतीकारक जुन्या राजाना अगर त्यांच्या वंशजाना घटना तयार करण्याकरतां खास बोलावणार नाहींत. तेव्हां क्रांतीनंतर जी घटनापरिषद बोलावतात ती अशा परिस्थितींत.

पण यावरून हे क्रांतीकारक जर असा सिद्धांत मांडू लागले कीं, क्रांती नाहीं म्हणजे घटनापरिषद नाहीं; क्रांतीमुळेंच जी घटनापरिषद भरेल तीच खरी घटनापरिषद तर तो सिद्धांत बरोबर ठरणार नाहीं. झारसारखे राजे किंवा मजुरांचे रक्त शोषणारे भांडवलवाले हे आतां जगांत सांपडणार नाहींत.

राजांची किंवा भांडवलवाल्यांची धुंदी फ्रान्सच्या किंवा रशियाच्या क्रांतीनंतर उतरली आहे. तुटेपर्यंत ताणण्याचे दिवस आतां उरले नाहींत. स्वतःच्या नाशाला प्रवृत्ती देणारा अंमल कोणताहि शहाणा माणूस यापुढें गाजवणार नाहीं. त्याखेरीज जगांत कांहीं प्रगतीपर तत्वें जन्माला आली आहेत व त्या तत्वांचा अवलंब केल्याशिवाय चार शिष्ठ लोकांत बसणेंहि अशक्य झालें आहे. त्याला अपवाद नाहींत असें नाहीं; पण ते अपवादहि झपाट्यानें नष्ट होत आहेत. हिंदुस्थानांतले संस्थानिक ब्रिटिशानींच आजवर पोसले व त्यांच्या अरेरावी राज्यकारभाराला त्यांनींच प्रोत्साहन दिलें. पण हिंदुस्थानांत यापुढें आपली सत्ता टिकणें अशक्य आहे असें ब्रिटिशानीं पाहिल्यानंतर या संस्थानामागें असलेली आपली शक्ती त्यांनीं इतक्या झपाट्यासरशीं काढून घेतलीं कीं, संस्थानिकांनीं त्यांना विश्वासघातकी किंवा मित्रद्रोही म्हटले असते तर ते क्षम्य ठरले असते. मनांत चाललेलें विचार समजण्याचें एखादें यंत्र निघाले तर संस्थानिकांच्या मनांत हेच विचार चालू आहेत असेंच तें यंत्र सांगेल. संस्थानिकांत जर स्वयंभू रग असती तर त्यांनीं आम्हीं प्रजेच्या स्वाधीन राज्यकारभार करीत नाहीं असेंच म्हटले असते. याचा अर्थ हिंदुस्थानांत जी काय पांच सातशे संस्थानें आहे त्या साऱ्या संस्थानांत राजाविरुद्ध बंडें झाली असती. या संस्थानिकानीं हा काळाचा ओघ बघितला व आपल्या प्रजेला हक्क देण्याची तयारी दर्शविली. त्यांतली कांहीं संस्थानें गणंगासारखी खिळविळ करतील; पण त्यांनाहि सत्तात्याग करावा लागेल.

कांहीं राज्यकर्ते निकरावर गोष्टी न येऊ देण्याइतके सूज्ञ असतात. ते परिस्थितीप्रमाणें ताबडतोब बदलतात. हिंदुस्थानला जी घटनापरिषद देऊ केली आहे ती या बदललेल्या परिस्थितीची द्योतक नाहीं काय? आयर्लंडमध्यें काय झाले? तेथें तर लॉईड जॉर्जनीं तारेनें डी. व्हॅलेराला कळविले कीं, घटनापरिषदेसंबंधीं प्रश्नच विचारण्याचें कारण नाहीं, तो तुमचाच हक्क आहे.

तेव्हां क्रांतीशिवाय घटना परिषद भरू शकते असें अनेक देशांच्या इतिहासावरून आपल्याला दिसून येते. राज्य क्रांतीकरतां रक्तपातच करावा लागतो हाहि सिद्धांत जुना झाला आहे. झारच्या आणि फ्रान्समधील लुईच्या

बरोबर हे सिद्धांत लुप्त झाले. प्रजा आपल्याला जुमानत नाहीं, आपल्या कायद्याची प्रतिष्ठा ठेवीत नाहीं, आणि प्रतिकार करून देहदंड सोसतें असें पाहिल्यानंतर जे राजे अगर राजसंस्था आपले अधिकार सोडावयास तयार होत नाहींत, त्यांचें अस्तित्व अल्पकालीनच ठरते. राज्यकर्त्यांच्या मनामध्यें प्रजेच्या निष्ठेविषयीं शंका निर्माण करण्यास आणि आपली सत्ता संपली असें त्यांच्या प्रचितीस आणून देण्यास अहिंसात्मक प्रतिकार हा एक प्रभावी व सुधारलेला उपाय आहे.

तेव्हां भूतकालीन इतिहासांत रक्तपातामुळें घटनापरिषदा भरल्या असा दाखला असेल तर वर्तमान काळांत रक्तपाताशिवाय घटनापरिषदा भरू शकतात असा नवा दाखला उपलब्ध झाला आहे व तो हिंदुस्थाननें निर्माण केला आहे. याबद्दल हिंदुस्थानला भावी इतिहासकार धन्यवाद देतील.

घटना परिषद भरविण्याचा अधिकार हा कोणाला प्राप्त होतो ? जे राष्ट्र पारतंत्र्यांत आहे अगर ठेवावयाचे आहे त्या राष्ट्राला हा अधिकार प्राप्त होत नाहीं. ज्या राष्ट्राची सत्ता सार्वभौम आहे असें मान्य केलें जातें त्याच राष्ट्राला घटना परिषद भरविण्याचा अधिकार प्राप्त होत असतो. हिंदुस्थानला घटना परिषद भरविण्याचा अधिकार दिला याचाच अर्थ हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य केले असा होतें. रक्तरंजित क्रांतींत प्रथम स्वातंत्र्य आणि नंतर घटना परिषद असा दंडक असतो असें क्रांतीकारक म्हणतील. तसें स्वातंत्र्य हिंदुस्थानला मिळालें नाहीं हेंहि खरें आहे. कारण हिंदुस्थाननें ब्रिटिशाना येथून हाकून दिले नाहीं. पण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा हक्क घटना परिषदेमुळें मान्य झाला आहे व आमच्या स्वातंत्र्याची घटना करावयास आम्हाला मोकळीक आहे हेंहि खरे आहे. जितक्या लवकर आम्ही आमची घटना तयार करूं तितक्या लवकर आम्ही प्रत्यक्ष स्वातंत्र्य संपादन करूं हेंहि विसरतां कामा नये. कोणी जर असें म्हणाले कीं, तुमची ही घटना परिषद गौण स्वरुपाची आहे तर तें आपण कबूल केले पाहिजे. आम्ही सत्ता काबीज केली नाहीं, इंग्रजांच्या हातून ती हिसकावून घेतली नाहीं, आम्हीं फक्त सत्तेचें संक्रमण करण्यास सरकारला भाग

पाडले आहे. मग आपण आपल्या शक्तीकडे पाहतो आणि असें म्हणतो कीं, आमच्या विद्यमान शक्तीच्या भांडवलावर जितकें जास्तींत जास्त साधणें शक्य आहे तितकेंच आम्ही साधले. याचा अर्थ स्वातंत्र्याच्या शुद्धतेबद्दल तशीच तडजोडीची वृत्ती आहे असें बिलकूल समजण्याचें कारण नाहीं. तडजोडीनें जर स्वातंत्र्य मिळालें नाहीं तर प्रतिकार करण्याचें आम्ही सोडून दिले आहे असें कोणी समजू नये. क्रांती करण्याची वृत्ती विशिष्ट पक्षांत आहे व इतरांत नाहीं ही भाषा फोल आहे.

एका दृष्टीनें हंगामी सरकार ताब्यांत येण्यापेक्षां घटना परिषदेचा हक्क मान्य केला जाणें हें अधिक महत्त्वाचे आहे. कारण हंगामी सरकार हें प्रत्यक्ष व्यवहारांत जरी स्वतंत्र सरकारसारखें नांदविले जाणार असले तरी तें स्वतंत्र सरकार नाहीं. घटना परिषदेचें तसें नाहीं. घटना परिषद ही स्वातंत्र्याची खरीखुरी द्योतक आहे. या दृष्टीनें काँग्रेसनें घटना परिषद मान्य केली हें उत्तमच झाले.

या घटना परिषदेची कल्पना हिंदुस्थानांत केव्हां व कशी आली ? १९३० सालीं काँग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव केला आणि काँग्रेस स्वातंत्र्य संपादनाचा मार्ग शोधू लागली. जोपर्यंत काँग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव केला नव्हता, तोपर्यंत काँग्रेसमध्यें घटनापरिषदेची कल्पना नव्हती, ह्या स्वातंत्र्याकरतां काँग्रेसनें १९३० सालीं मिठाच्या सत्याग्रहाच्या स्वरूपानें लढा केला. त्या लढ्याचें पूर्वी सर जॉन सायमन यांचे अपयशी कमिशन येथें येऊन गेले व हिंदुस्थानांतील सर्व पक्षानीं त्या कमिशनवर कडकडीत बहिष्कारहि घातला. १९३० च्या लढ्यांत काँग्रेस तुरुंगांत असतांना सायमन कमिशनचा रिपोर्ट तयार झाला. त्या रिपोर्टांतील शिफारसी काँग्रेसला मान्य होण्यासारख्या नव्हत्याच. त्याच वेळीं सप्रू जयकर हे शांतीदूताचें काम करीत होते. पण त्यांचीहि शिष्टाई व्यर्थ गेली. पुढें राऊंड टेबल परिषद भरणार होती व त्या परिषदेला काँग्रेसनें यावे अशी ब्रिटिश सरकारची इच्छा होती. सायमन कमिशनच्या बहिष्कारावर तो उतारा होता. पण काँग्रेसचे पुढारी सुटले नाहींत, तडजोड झाली नाहीं व काँग्रेस शिवायच पहिली गोलमेज परिषद भरली. त्याचवेळीं कुणाकुणाच्या डोक्यांत

स्वतंत्र हिंदुस्थानची घटना आपण तयार करावी असे विचार येत चालले होते.

घटना तयार करण्याचे कांहीं प्रयत्न हिंदुस्थानांत १९३० सालापूर्वी झाले. नेहरू कमिटीनें त्यापूर्वी एक प्रयत्न केला होता आणि त्याच्यापूर्वी मिसेस बेझंट यांनीं कॉमनवेल्थची योजना तयार केली होती. पण ह्या दोन्ही योजनांत ब्रिटिशापासून अलग व्हावे अशी कल्पना नव्हती. मिसेस बेझंट यांच्या योजनेंत तर हिंदुस्थान हा ब्रिटिश कॉमनवेल्थचा एक घटक व्हावा अशीच अपेक्षा होती. नेहरु रिपोर्टांत वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य आपल्याला हवे अशी मागणी होती. त्या त्या योजना त्या त्या काळाला अनुरुप अशाच होत्या. पण त्या योजनांचा पुरस्कार फारसा केला गेला नाहीं. अशा प्रकारें सायमन कमिटीची योजना, नेहरू योजना व बेझंट योजना ह्या अल्पायु ठरल्या. त्याला कारण एकच होते. या योजनांच्या मागें जनतेची शक्ती नव्हती. सायमन योजना ही तर शुद्ध विलायतीच होती व ती जनतेवर लादली जाणार होती. बेझंट योजनेचें असेंच झाले. नेहरु योजनेला काँग्रेसचा थोडा फार पाठिंबा होता, पण मुसलमानानीं त्या योजनेला विरोध केल्यामुळें तीहि योजना काँग्रेसपुढें मंजुरी करता आली नाहीं एवढेंच नव्हे तर नामंजुरी करतां आली.

## घटना-परिषदेचें मूळ

सायमन कमिशन, राऊंडटेबल परिषद, नेहरु कमिटीचा अहवाल हें अशा प्रकारें समाप्त झाल्यावर स्वातंत्र्याची घटना कोणी तयार करावयाची हा प्रश्न काँग्रेस पुढाऱ्यापुढें आला. त्या वेळीं मिठाचा सत्याग्रह हा गांधी आयर्विन करार होऊन संपला होता व कराचीला काँग्रेसचें अधिवेशन भरलें होते. भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्याबद्दल तेव्हां बरेच कुतुहल वाटत होते. ते तेव्हां गुप्तवेषानें रहात असत. रशिया, चीन वगैरे देशांत क्रांतिकारक कालांत राहिलेल्या भाई रॉयबद्दल बऱ्याच सुशिक्षितांना तेव्हां आकर्षण वाटत होते. त्यांच्या कांहीं अनुयायानीं काँग्रेसचें अधिवेशन चालू असतां ‘ हिंदुस्थानला घटना परिषद ’ पाहिजे अशीं वाक्यें लिहिलेले तांबड्या कापडाचे फलक चहूकडे फडकवले. या

आकस्मिक घटनेमुळें पुष्कळाचें लक्ष घटना परिषदेकडे खेचले गेले. भाई रॉय यांची घटना परिषदेची मागणी तीन गोष्टीवर आधारलेली होती. एक हिंदुस्थानांत राज्यक्रांति झाली पाहिजे; ही राज्यक्रांति राष्ट्रीय लोकशाही स्वरुपाची झाली पाहिजे आणि ही क्रांती जनताच करणार असल्यामुळें जनतेचे प्रतिनिधी एकत्र जमून त्यांनीं हिंदी घटना तयार केली पाहिजे. या त्यांच्या कल्पनेंत सत्ता काबीज करणें हीच गोष्ट गृहीत धरली होती. कम्युनिस्ट पक्षानें भाई रॉय यांच्यापूर्वी घटना परिषदेची कल्पना मांडली होती.

भाई रॉय यांचा पक्ष, कम्युनिस्टपक्ष व समाजवादी पक्ष हे पुढें मतभेदामुळें एकत्र होऊ शकले नाहींत. पण कांहीं काळ ( लेफ्ट कन्सॉलिडेशन ) जहाल मतवाल्यांचीं अभेद्य फळी करण्यांत गेला. पुढें पुढें या डाव्या गटांत भांडणें झाली आणि आज तिघे तीन वाटेला लागले आहेत. रॉय यांचा पक्ष गेल्या महायुद्धांत विलीनच झाला. कम्युनिस्टपक्ष हाहि रशियाच्या तालावर नाचूं लागल्यामुळे जनतेच्या मनातून उतरला. समाजवादीपक्ष हा मात्र ४२ च्या लढ्यांत सामील झाल्यामुळें व त्या पक्षानें बरींच धाडसाचीं कृत्यें केल्यामुळें आपणच खरें क्रांतीकारक आहों असें म्हणूं लागला आहे. ह्या पक्षाला अर्थातच कॉंग्रेसचें सत्तासंक्रमणाचें धोरण पसंत नाहीं.

भाई रॉय यांनीं राज्यक्रांतीकरतां उपयोजिलेली घटना परिषदेची घोषणा कॉंग्रेसला दुसऱ्या कारणाकरतां पसंत पडली. कराची कॉंग्रेसनंतर म. गांधी दुसऱ्या राऊंड टेबल परिषदेला जाऊन आले. विलायतेंत हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न जो निकालांत निघाला, तो राजकारणाच्या खडकावर फुटल्यामुळें निघाला नाहीं, जातीयतेच्या खडकावर फुटल्यामुळें निघाला. कॉंग्रेस ही अखिल हिंदुस्थानची प्रतिनिधी आहे असा जो हक्क कॉंग्रेस सांगत असे, तो हक्क मुसलमान व इतर अल्पसंख्यांक मानिनात. त्यामुळें म. गांधींना त्या परिषदेंत असें दुःखानें व नाइलाजानें सांगावें लागले कीं, मी जातीयतेचा प्रश्न सोडवू शकत नाहीं. जातीयतेचा प्रश्न हा दिवसेंदिवस तीव्र होत चालला. हिंदुसभाहि असलेली भांडणें अधिक वाढविण्याकरतां आपली शक्ती खर्चूं लागली. त्यामुळें

जें पुढें आमच्यावर लादले गेले तें आम्ही होऊन मान्य केले असतें तर कदाचित् जातीयतेचा प्रश्न मागेंच मिटला असता.

दुसऱ्या गोलमेज परिषदेहून आलेले गांधीजी लागलीच तुरुंगांत गेले व कायदेभंगाची चळवळ जोरानें सुरु झाली. त्या काळांत कॉंग्रेसची अधिवेशनें कोठली भरतात? दोन अडीच वर्षानंतर चळवळ ओसरली व एक एक पुढारी तुरुंगांतून सुटून आले. १९३४ च्या १७ जूनला वर्किंग कमिटीची सभा मुंबईस भरली होती. त्या वेळीं मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणूका लढविण्याचें कॉंग्रेसनें ठरविले. पण मॅक्डोनल्ड साहेबानीं दिलेल्या जातीय निवाड्याच्या प्रश्नावर कॉंग्रेसमध्यें भिन्न भिन्न मतें झालीं. श्री. मालवीय व श्री. अणे हे कॉंग्रेसमधून निघाले व त्यांनीं स्वतंत्र पक्ष काढला. कॉंग्रेस हा निवाडा मान्यहि करु नये व अमान्यहि करू नये ह्या मताची, तर अणे मालवीय तो निवाडा फेटाळून लावावा अशा दुसऱ्या मताचीं. कॉंग्रेसनें पुढें पं. जवाहरलाल आल्यावर जातीय निवाड्याच्या बाबतींतलें आपलें धोरण बदलले. पण फुटलेली फळी सांधली गेली नाहीं हें खरे. या मुंबईच्या सभेंत जातीय प्रश्न सोडवावयास घटना परिषद उपयोगी पडेल असा विचार झाला. त्या सभेला पंडीत जवाहरलाल हे अटकेंत असल्यामुळें हजर नव्हते. कॉंग्रेसनें तेव्हां असा युक्तिवाद केला कीं, हिंदी सुधारणांची श्वेतपत्रिकाच मुळीं आम्ही मान्य करीत नाहीं आणि जातीय निवाडा हा श्वेतपत्रिकेचा भाग असल्यामुळें श्वेतपत्रिकेचा धिःकार म्हणजे जातीय निवाडयाचाही धिःकार आहे. झाडच तोडले म्हणजे फांद्या तोडण्याची जरुरी नाहीं असें त्यांचें म्हणणें होते.

जातीय प्रश्न हा आपणच आपसांत सोडविला पाहिजे असें कॉंग्रेसचे तेव्हां प्रतिपादन होते, हा प्रश्न सोडविण्यास घटना परिषदच उपयोगी पडेल असें तेव्हां त्यांना वाटत होते. मुंबईच्या वर्किंग कमिटींत जो ठराव झाला व ज्यांत घटना परिषदेचा पहिल्या प्रथम उल्लेख केला गेला तो ठराव असा— "श्वेतपत्रिकेला दुसरा समाधानकारक विकल्प म्हणजे प्रौढाना मताचा अधिकार देऊन अगर शक्य तितके जास्त त्याच्या जवळचे मताधिकार देऊन घटना परिषदेच्या मार्फत घटना तयार करणें हा आहे. ह्या घटना परिषदेला मुख्य

मुख्य अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधी त्यांच्याच मतदारसंघानें जरूर तर सर्वस्वी निवडावे. "*

ह्या वर्किंग कमिटीला जसे जवाहरलाल उपस्थित नव्हते, तसें वल्लभभाई व खान अबदुल गफारखान हेहि बंदिवासामुळें उपस्थित नव्हते. तेव्हां घटना परिषदेचा हा ठराव वरील पुढाऱ्यांच्यामुळें झाला असें नाहीं. घटना परिषदेची कल्पना मात्र जातीय प्रश्नामुळेंच मान्य झाली असावी असें वाटते.

पं. जवाहरलालना घटना परिषदेचा हा ठराव पास झाल्याचे तुरुंगांत कळले व त्याना आनंदहि झाला. ते आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात 'कधीं ना कधीं ही परिषद भरलीच पाहिजे अशी माझी खात्री आहे. ब्रिटिश सरकारच्या संमतीशिवाय ती भरणार नाहीं हें उघड आहे; किंवा स्वतंत्र परिषद भरण्याकरितां राज्यक्रांति तरी झाली पाहिजे. या परिषदेला सरकारची संमति मिळणार नाहीं. निमसरकारीरीत्या या परिषदेला सरकारची हरकत नाहीं असें जाहिर झाले आहे. सरकारला वाटते कीं, सर्वपक्षीय परिषदेप्रमाणें हीहि परिषद अयशस्वी होईल. पण नंतर त्यांना त्यांतील धोके व त्या कल्पनेंतील शक्यता कळून आली व त्या परिषदेला ते विरोध करू लागले.' सरकारची पहिली अनुकूलता व मागाहूनची प्रतिकूलता ह्या दोहोंचा विचार करतां सरकारला हिंदी घटना परिषद ही जातीय प्रश्नाकरतांच भरत आहे असें वाटले असावे.

---

* The only satisfactory alternative to the white paper is a constitution drawn up by constituent assembly elected on the basis of adult suffrage or as near it as possible with the power if necessary to the minorities to have their separate represen-tatvies elected exclusively by the electors belonging to such minorities."

## जातीय प्रश्नाकरतां घटना-परिषद

कॉंग्रेस वर्किंग कमिटीला ही घटना परिषद जरी जातीय प्रश्न सोडविण्याकरतां हवी असली तरी घटना परिषद असल्या प्रश्ना करतां भरू शकत नाहीं, त्यांत इतर प्रश्नहि येतात. घटना परिषदेंत जर जातीय प्रश्नावर एकमत झाले असते आणि स्वातंत्र्याकरतां सत्याग्रह करण्याचे साऱ्या देशानें ठरविले असते तर तें सरकाला अनिष्टच झालें असते. म्हणून त्यांचा विरोध सुरु झाला.

पं. जवाहरलाल याना मात्र घटनापरिषद स्वातंत्र्याच्या प्रश्नाकरतांच पाहिजे होती. १९३३ सालीं त्यानीं विलायतेंतील आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत या परिषदेची योजना मांडली होती. तेव्हां वर्किंग कमिटीला पंडीतजींची मतें ठाऊक नव्हती असें नाहीं.

मुंबईच्या कॉंग्रेसमध्यें घटनापारिषदेचा अंतर्भाव करणारा ठराव डॉ. अन्सारी यानीं मांडला. त्याच कॉंग्रेसमध्यें जातीय निवाड्याच्या ठरावावर उपसूचना मांडतांना पं. मालवीय यांनीं पं. जवाहरलाल यांच्या घटना परिषदेच्या उपायाचा उल्लेख केला. म. गांधीनाहि तो मार्ग मान्य असल्याचे मालवीयजी म्हणाले. यावरून घटना परिषद ही प्रामुख्यानें जातीय प्रश्न सोडविण्याकरतांच असावी असा तेव्हांच्या विचाराचा सूर होता.

मुंबई कॉंग्रेस नंतर महिन्यानें पाटणा येथें वर्किंग कमिटीची सभा झाली. जॉईंट पार्लमेंटरी कमिटीच्या रिपोर्टावर मत प्रदर्शित करतांना वर्किंग कमिटीनें असेंच म्हटले कीं, घटना तयार होणें हिंदुस्थानला समाधानकारक वाटणार नाहीं. त्याच वर्षी मध्यवर्ती कायदे मंडळाच्या निवडणूकाचा जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला त्यांत व्हाईटपेपर रद्द करावा व घटना परिषदेमार्फत हिंदी घटना बनवावी असें म्हटले आहे.

घटना परिषदेला राजकीय दृष्टि यावयास १९३६ साल उजाडावे लागले. त्या सालीं पं. जवाहरलाल हे कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. लखनौला कॉंग्रेस

भरली होती. त्यानीं आपल्या भाषणांत घटनापरिषदेवर जोर दिला. ते म्हणाले, ' आपले राजकीय व जातीय प्रश्न हे घटनापरिषदेशिवाय सुटणार नाहींत. प्रौढ मतदान देऊन ही परिषद बोलवावी. ही परिषद समक्रांतीची परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय भरणार नाहीं. —ती केव्हां होईल हें मला सांगवत नाहीं. —या घटनापरिषदेचे प्रतिनिधी ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींबरोबर तह करतील ' पंडीतजींचें हे उद्गार भविष्यसूचक नव्हते असें कोण म्हणेल ? ही परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

लखनौ कॉंग्रेसच्या ठरावांत घटना परिषदेचा उल्लेख करण्यांत आला होता. त्या वेळीं प्रांतिक कायदे मंडळांच्या निवडणूका कॉंग्रेसनें लढवाव्या असें ठरले. निवडणूकांत कॉंग्रेस यशस्वी होणार हें निश्चितच होते. १९३५ च्या कायद्या-प्रमाणें प्रांताना स्वायत्तता मिळणार होती. तेव्हां कॉंग्रेसच्या मंत्र्यानीं आपापल्या प्रांतांत घटना परिषदेच्या मागणीचे ठराव आणावेत व ते पास करावेत असा आदेश त्या ठरावांत दिला गेला. त्यानंतर त्याचवर्षीं फैजपूरला कॉंग्रेस झाली व पंडीतजीच त्या कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. याहि कॉंग्रेसमध्यें घटना परिषदेचा पुरस्कार केला गेला.

आज जसें क्रांतीनें सत्ता संपादन व संक्रमणानें सत्ता संपादन असें दोन विचार प्रवाह आहेत, तसेंच फैजपूर कॉंग्रेसचे वेळींहि होतें. एक पक्ष म्हणत होता कीं, सत्ता काबीज केल्याशिवाय घटना परिषद भरू शकत नाहीं आणि दुसरा पक्ष म्हणत होता कीं, सत्तेचें संक्रमण करण्याची जर राज्यकर्त्यांची खरीखुरी इच्छा असेल तर घटना परिषद भरू शकेल. फैजपुरच्या ठरावांत ही दुसरी विचारसरणीच प्रभावी ठरली. आज जे घटनापरिषदेला विरोध करीत आहेत त्यांनीं फैजपूर कॉंग्रेसचा ठराव एकदां दृष्टी खालून घालावा. तो ठराव म्हणतो,

कॉंग्रेसला खरेंखुरें लोकशाही प्रधान राज्य हवें आहे. त्या राज्यांत साऱ्या जनतेच्या हातीं सत्ता सोंपविण्यांत ( ट्रान्सफर ) आलेली असावी आणि त्या राज्यावर जनतेचा परिणामकारक ताबा असावा. अशा प्रकारची राज्यघटना

हिंदी स्वातंत्र्यावरच आधारलेली असली पाहिजे, कारण अशी घटना फक्त घटनापरिषदच तयार करू शकेल.*

तेव्हां आज १९४२ च्या लढ्यानंतरहि कॉंग्रेस कांहीं नवें करीत आहे असें नाहीं. कोणी याला सत्तेचें राजकारण म्हणत असतील. तें तसें जर असतें तर तें आजचें नाहीं. पूर्वीपासून जें ध्येय, धोरण व विचारसरणी कॉंग्रेस मांडीत आली, त्याशीं कॉंग्रेस विसंगतीनें वागत नाहीं.

फैजपूर कॉंग्रेसनंतर जीं जीं कॉंग्रेसचीं अधिवेशनें झालीं, त्या त्या अधिवेशनांत कॉंग्रेस घटनापरिषदेच्या मार्गाचा पुरस्कार करीत आली. हरिपुरा कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबू सुभाषचंद्र बोस हे होते. त्यांनीं आपल्या भाषणांत कॉंग्रेस-वर्किंग-कमिटीच्या घटनापरिषदेच्या ठरावाचा पुरस्कार केला. त्यावरून सुभाषबाबू हे तेव्हां क्रांतीनंतर घटनापरिषद ह्या विचारसरणीचा पुरस्कार करीत नव्हते असें दिसतें. आज पुरोगामी गट जर हा विरोध करीत असला तर त्याला सुभाषबाबूंची विचारसरणी कारणीभूत आहे असें समजण्याचें प्रयोजन नाहीं. पुरोगामी गटाची ती स्वतंत्र विचारसरणी आहे. हरिपुरा कॉंग्रेसमध्येंहि पुन: घटनापरिषदेचा ठराव पास झाला.

त्रिपुरी कॉंग्रेसमध्यें जो राष्ट्रीय मागणीचा ठराव पास झाला त्या ठरावांत घटनापरिषदेची मागणी करण्यांत आली. त्रिपुरी कॉंग्रेसनंतर अलाहाबादला

---

* The Congress stands for a genuine democratic state in India where political power has been transferred to the people as a whole and the Government is under their effective control.

Such a constitution, in its opinion must be based on the independence of India as it can only be framed by a constituent assembly.



नगर वाचनालय ता.

२३ नोव्हेंबर १९३९ रोजीं वर्किंग कमिटीची सभा भरली असतां तिनेंहि घटना परिषदेवर जोर दिला होता. त्या वेळीं महायुद्ध सुरू झालें होतें. कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या व व्हॉईसरॉयच्या मुलाखती होत होत्या. त्या वेळच्या ठरावांत वर्किंग कमिटी म्हणते, 'ब्रिटिश धोरणावरील साम्राज्यशाहीचा डाग नष्ट होण्याकरितां आणि कॉंग्रेसला युद्धांत सहकार्याचा विचार करण्यास संधि देण्याकरितां हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता देऊन घटनापरिषदेच्या मार्गानें आपली राज्यघटना तयार करण्याचा जनतेचा हक्क सरकारनें प्रथम मान्य केला पाहिजे. स्वातंत्र्य व लोकशाहीचीं तत्त्वें मान्य करणारी कोणतीहि व्यक्ती घटनापरिषदेला विरोध करू शकणार नाहीं. जातीय व इतर अडचणी सोडविण्याचा घटनापरिषद हाच एक मार्ग आहे."

ह्या ठरावांतहि जातीय प्रश्न सोडविण्यास घटनापरिषद उपयोगी पडेल असें म्हटलें आहे.

कॉंग्रेस जरी जातीय प्रश्न सोडविण्याकरितां घटनापरिषदेची मागणी करीत होती, तरी सरकारनें ह्या मागणीला आतांपर्यंत मान्यता दिली नव्हती. ते असेंच म्हणत होते कीं, दोन्ही जमातींनीं हे प्रश्न जरी आपसांत सोडविले पाहिजेत तरी आम्ही बाजूस राहूं असें नाहीं. आम्हीहि तो प्रश्न सोडविण्यास मदत करूं. मुस्लीमलीगनें अशक्य मागण्या करण्यास सुरवात केल्यामुळें जातीय प्रश्न हा विकटच होत चालला. १९४० च्या मार्च महिन्यांत पाकिस्थानच्या मागणीचा ठराव पास झाला. त्यापूर्वी लीगनें पाकिस्थान मागितलें नव्हतें. त्यांचें त्यापूर्वी म्हणणें होतें तें असें:—

(१) १९३५ चा कायदा रद्द करावा. (२) आम्हाला लोकशाहीप्रधान राज्य नको. (३) मुस्लीमलीग हीच मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी संस्था मानावी. (४) कॉंग्रेसशासीत प्रांतांत मुसलमानांचे धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक जीवनावर हल्ले होत आहेत. (५) पुढील कोणतीहि घटना लीगच्या संमतीशिवाय केली जाऊ नये.

ब्रिटिशांनीं या तेढीचा भरपूर फायदा घेतला व जातीय तडजोड झाल्याशिवाय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविणें शक्य नाहीं अशी वृत्ती धारण केली. जातीय प्रश्न सुटला नाहीं तर स्वातंत्र्य नाहीं असा राजकारणांत पेंचप्रसंग निर्माण झाला.

त्यामुळें कॉंग्रेस घटनापरिषदेचा जास्त जास्त पुरस्कार करू लागली. दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली, पुढाऱ्यांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या गांठी भेटी होऊं लागल्या तरी जातीय वादाचा प्रश्न पहिल्यांदा निर्माण केला जाई.

लॉर्ड झेटलंड यांनीं १४ डिसेंबर १९३९ रोजीं हौस ऑफ लॉर्डसमध्यें एक निवेदन केलें. त्यांत साळसूदपणाची भाषा होती. त्याला उत्तर देतांना जवाहरलाल नेहरू व म. गांधी वगैरे पुढाऱ्यांनीं हिंदी प्रश्न सोडविण्यास घटनापरिषदेचा उपाय सुचविला. ता. १८ ते २२ डिसेंबरपर्यंत वर्ध्याला वर्किंग कमिटीची सभा भरली असतां तेथें एक ठराव झाला. त्यांत म्हटले आहे कीं, 'कॉंग्रेसनें सुचविलेली घटनापरिषद हीच जातीय प्रश्न कायमचा सोडविण्याचा मार्ग आहे.* ''

व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं १० जानेवारी १९४० रोजीं मुंबईच्या ओरिएंट क्लबमध्यें जें प्रसिद्ध भाषण केलें व ज्यांत हिंदुस्थानला वेस्टमिन्स्टरच्या धर्तीचें वसाहतीचें स्वराज्य देऊं असें म्हटलें, त्या भाषणांत त्यांनीं घटनापरिषदेचा उल्लेख केला नव्हता. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें जातीय प्रश्न हे तडजोडीनें सोडवावे लागतात असाच सल्ला त्यांनीं दिला. जिना हे घटनापरिषदेच्या विरुद्ध असल्यामुळें आणि सरकारलाहि घटनापरिषद नको असल्यामुळें व्हाईसरॉयनीं घटनापरिषद मान्य केली नाहीं. सरकार व लीग

---

* The constituent assembly as proposed by the congress is the only way to attain a final settlement of communal questions.

हे जितके जितके घटनापरिषदेच्या विरुद्ध बोलत, तितके तितके कॉंग्रेसला घटनापरिषदेचें महत्त्व व जरूरी वाटूं लागे. म. गांधी हे प्रथम घटनापरिषदेला फारसे अनुकूल नव्हते; पण पुढें त्यांनाहि घटनापरिषदेबद्दल आकर्षण वाटूं लागलें. अशाप्रकारें निवेदनें, खुलासे, मुलाखती चर्चा वगैरे चालू होत्या. सरकारला कसेंहि करून कॉंग्रेसला महायुद्धांत खेंचावयाचें होतें; पण हातून सत्ता सोडावयाची नव्हती. लीगला आपल्याशिवाय स्वातंत्र्याचा प्रश्न सुटत नाहीं हें ठाऊक होतें म्हणून ते आधीं पाकिस्थान व मग स्वातंत्र्य आणि घटनापरिषद असें बोलत होते. आणि कॉंग्रेस तीन गोष्टी धरून बसली होती. १ स्वातंत्र्य. २ लोकशाही प्रधान राष्ट्रीय सरकार. ३ घटनापरिषद. दिवसेंदिवस सरकार व कॉंग्रेसमधील तेढ अधिकच वाढू लागली. युद्धाच्या संकटांतसुद्धां ब्रिटिशांचें अंतःकरण बदलत नाहीं हें त्यांच्या नजरेस आलें. इकडे देशांत प्रतिकाराची चळवळ सुरू करा असें सारखें दडपण येतच होतें. अशा परिस्थितींत रामगडची कॉंग्रेस झाली. या कॉंग्रेसमध्यें कॉंग्रेसनें आपली भूमिका पुनः स्पष्ट केली.

त्या ठरावांत जातीय प्रश्न सोडविण्याचा मार्ग घटनापरिषदच आहे असें म्हटले आहे. 'हा जातीय प्रश्न घटनापरिषदेशिवाय कायमचा सुटणार नाहीं.'* याच ठरावामध्यें असेंहि म्हटले होतें कीं, अल्पसंख्याकांचे हक्क हे करारानें संरक्षिले जातील. त्याकरतां बहुसंख्य व अल्पसंख्य गटाचे निवडलेले प्रतिनिधी एकत्र येतील व हा करार करतील. तसा करार जर होऊं शकला नाहीं तर लवादाकडे हा प्रश्न सोपविला जाईल. वर सूचित केलेल्या मार्गाशिवाय जातीय प्रश्न सोडविण्याचा अन्य मार्ग नाहीं असेंहिं त्या ठरावांत म्हटलें होते.

पण जीनांना हा ठराव अर्थातच मान्य नव्हता. जातीय प्रश्नाला दिवसें-दिवस प्राधान्य येत चालल्यामुळें राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा दुय्यम स्वरुपाचा होत चालला. हिंदुस्थानचें हें दुर्दैव अद्याप संपले नाहीं. दुसऱ्या

---

* No permanent solution is possible except through a constituent assembly.

महायुद्धाची सहा वर्षे लोटली पण हिंदुस्थान अद्याप जातीय प्रश्नाच्या भोवऱ्यांतून बाहेर पडला नाहीं.

रामगड काँग्रेसच्या वेळीं पाकिस्थानचा सुप्रसिद्ध लाहोर ठराव नुकताच पास झाला होता ( २३ मार्च १९४० ) त्या ठरावाला आणि काँग्रेस ठरावाला सरकारतर्फे लॉर्ड झेटलंड यांनीं पार्लमेंटांत उत्तर दिले. त्या उत्तरांत ते म्हणाले,

But we have also said that we cannot wholly disassociate ourselves from the shaping of the future constitution of the country ........that does not mean that the future constitution of India is to be a constitution dictated by the Government and the Parliament of this country: against the wishes of the Indian people.

हिंदुस्थानवर जरी लोकांच्या इच्छेविरुद्ध आम्ही घटना लादणार नसलो तरी भावी घटना तयार होत असतां आम्ही तीपासून अगदीं अलिप्त राहूं असेंहि नाहीं, असें ते म्हणाले. त्यांनीं आपल्या भाषणाचे शेवटीं काँग्रेसलाच प्रश्न केला कीं, ऐक्याचे दरवाजे बंद करणार का ? याचा अर्थ एकी करा व एकी केल्याशिवाय स्वातंत्र्याकरतां आमचेकडे येऊ नका असा होतो. तेव्हां राजकारणाला हें घाण्याच्या बैलासारखें स्वरूप येत चालले होते. कितीहि घाणा फिरवला तरी तो ठराविक वर्तुळाबाहेर जाऊ शकत नाहीं तशी आमची स्थिति ब्रिटिशांनीं करून टाकली. आजसुद्धां आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, घटनापरिषदेनें कांहींहि बहुमतानें ठरविले तरी, अल्पसंख्याकांना पुरेसे संरक्षण दिले आहे किंवा नाहीं हें ब्रिटिश पार्लमेंट ठरविणार आहे आणि नंतरच घटनापरिषदेच्या घटनेला मान्यता देणार आहे. तेव्हां वरवर जरी घटनापरिषदेची मागणी सरकारनें मान्य केली असली तरी त्या परिषदेच्या निर्णयाला पार्लमेंट मान्यता देईलच असें नाहीं. लॉर्ड झेटलंडच्या वेळचें धोरण

हें शब्दांत जरी बदलले आहे असें दिसत असले तरी वृत्तींत बदलले नाहीं हें लक्षांत ठेवले पाहिजे.

रामगड कॉंग्रेसनंतर तडजोडीची वाट बंद झाली. कॉंग्रेस कमिट्यांचे सत्याग्रह कमिट्यांत रुपांतर झाले व चहूकडे प्रतिकाराचे पडसाद उठूं लागले. मे १९४० मध्यें ॲमरी हे भारतमंत्री झाले. त्यांनीं कॉमन्स सभेंत भाषण करतांना हिंदुस्थानची घटना हिंदी लोकांनींच प्रामुख्यानें बनवली पाहिजे असें म्हटले. जातीय प्रश्नाच्या बाबतींत ते म्हणाले कीं, आपसांतील तेढ ही मिटवता येणें अशक्य आहे असें नाहीं. आम्हीहि त्याकरतां मदत करावयास तयार आहों. त्यांना मध्यवर्ती सरकारांत जनतेचे प्रतिनिधी यावयास पाहिजे होते, त्याकरतां त्यांची धडपड सुरु होती. कारण त्याशिवाय युद्धाला भरपूर मदत मिळणें व ब्रिटिशांचा नैतिक दर्जा वाढणें शक्यच नव्हते.

या भाषणाचा कॉंग्रेसवर कांहींच परिणाम झाला नाहीं. जुलै महिन्यांत फ्रान्स पडले होते व ब्रिटिशांचे धाबें दणाणले होते. पण पुढें हिटलर ब्रिटनवर स्वारी करीत नाहीं असें दिसून आले. त्यामुळें कॉंग्रेसच्या मागण्याकडे सरकार दुर्लक्ष करू लागले. व्हाईसरॉयनीं त्या महिन्यांत पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. पण त्यांतून फारसें कांहीं निष्पन्न झाले नाहीं. वर्किंग कमिटीच्या ठरावांत तावडतोब हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य करावे आणि मध्यवर्ति हंगामी सरकार स्थापन करावें एवढेंच विचार व्यक्त झाले होते. घटनापरिषद वगैरे दूरगामी गोष्टींवरील सरकार व कॉंग्रेस या दोघांचें लक्ष उडाले होते. पुढें पुण्याला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचें अधिवेशन झाले व त्यांत म. गांधी आणि सरदार पटेल व राजाजी यांच्यांत मतभेद झाले. म. गांधी हे आपण राष्ट्रीय सरकार घेऊ नये व युद्धांत हिंसा करू नये अशा मताचे होते व त्याच मुद्यावर मतभेद झाले. पण राजाजी व वल्लभभाई यांनीं कॉंग्रेसमध्यें आपलें बहुमत केलें.

पण पुढें व्हाईसरॉय व ॲमरी यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याचे नाकबूल केले. युद्धानंतर मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या आशेनें कॉंग्रेस

युद्धांत मदत करण्यास तयार नव्हती. त्यामुळें वल्लभभाई व राजाजी हे पुनः गांधींच्या मार्गावर आले. पुढें म. गांधींच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसनें वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला. त्या सत्याग्रहांत युद्धविरोधी घोषणाच फक्त होत्या. म. गांधी ज्यांना मान्यता देतील त्यांनींच सत्याग्रह करून तुरुंगांत जावयाचे असें ठरले होते. या सत्याग्रहाइतका शुद्ध सत्याग्रह आजपर्यंत कॉंग्रेसच्या इतिहासांत झाला नाहीं.

सरकारनें २१ जुलै १९४१ रोजीं अणे, मोदी, सरकार वगैरे मंत्री घेऊन कार्यकारी मंडळ बनविले पण त्यांत कॉंग्रेस नसल्यामुळें ते कार्यकारी मंडळ जनतेच्या विश्वासाला पात्र झाले नाहीं व युद्धसहकार्य हे प्रभावी झाले नाहीं.

१९४१ साल हे सारे सत्याग्रहांतच गेले. त्या सालांत दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या. रशियानें जर्मनीची बाजू सोडली व जपाननें दोस्ताविरुद्ध युद्ध पुकारलें. रशियासारखा दोस्त ब्रिटिशाना मिळाल्यामुळें आणि युद्धाची आघाडी जर्मनीनें रशियाविरुद्ध उघडल्यामुळें ब्रिटिशांना हिंदुस्थानच्या पेचप्रसंगाबद्दल फारशी फिकीर वाटेनाशी झाली. त्यामुळें १९४१ सालीं ब्रिटिश मुत्सद्यानीं हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्याबद्दल फारशी हालचाल केली नाहीं. या काळांत अपक्ष परिषदेचें राजकारण थोडेसें सुरू झाले. सर तेज बहादूर सप्रूनीं ही परिषद मार्च १९४१ मध्यें बोलावली. ह्या परिषदेच्या मागण्यांत घटना परिषदेचा उल्लेख नव्हता. त्यांना व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळांत सारे हिंदी लोक हवे होते. स्वातंत्र्याचा प्रश्न युद्धोत्तर कालीं सोडवावा अशीहि इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली.

या सालीं दुसरी एक महत्वाची गोष्ट घडली. १४ ऑगस्ट १९४१ रोजीं चर्चिल व रूझवेल्ट यांची एक बैठक झाली. त्या बैठकींत आटलांटिक चार्टरचा जन्म झाला. जगांतील लोकांना आपल्याला कोणत्या प्रकारचें राज्य हवे आहे हें ठरविण्याचा अधिकार त्या चार्टरमध्यें घोषीत करण्यात आला. ज्यांचें सार्वभौमत्व व स्वराज्य सक्तीनें हिसकून घेतले आहे त्यांना ते परत देण्यांत येईल असेंहि या घोषणेंन म्हटले होते.

या घोषणेमुळे हिंदी लोकांची अर्थात कांहींची अंतःकरणें पल्लवित झाली. त्याना वाटले आतां आपण खात्रीनें स्वतंत्र होऊं व आपल्या कल्पनेप्रमाणें घटना बनवूं. पण हिंदुस्थानला हा चार्टर लागू करण्यांत येणार नाहीं हें सत्य बाहेर पडण्यास फारसा काळ लोटावा लागला नाहीं.

चर्चिलसाहेबानीं ९ सप्टेंबर १९४१ रोजीं पार्लमेंटांत भाषण करून १९४० च्या ऑगस्ट महिन्यांत आम्ही हिंदुस्थानविषयक जें धोरण ठरविलें त्याला बाध येणार नाहीं असें म्हटले. त्यामुळें जगाला जरी आटलांटिक सनद लागू करण्यात आली तरी हिंदुस्थानला ऑगस्टची घोषणा ग्रासून रहाणार हें स्पष्ट झाले.

अशाप्रकारें हिंदी राजकारणाचा गाडा मार्गे मार्गेच चालला असतांना एके दिवशीं साऱ्या सत्याग्रह्यांची मुक्तता झाली व त्यानंतर थोड्याच दिवसांत जपाननें ब्रिटिशाविरूद्ध युद्ध पुकारलें. कॉंग्रेसच्या राजबंद्याना सोडण्यात कांहीं विशिष्ट धोरण असावे असें वाटत नाहीं. सरकारला बाहेर देशांत आपल्या विरुद्ध अप्रीती निर्माण व्हायावला नको होती हें जसें खरें, तसेंच नव्या कार्यकारी मंडळांत गेलेल्या हिंदीं सभासदाना आपण कांहीं केले हेंहि दाखवावयाचे होते.

त्यावेळीं कॉंग्रेसमध्यें एक अनिष्ट गोष्ट घडली. म. गांधी व इतर सभासद यांच्यांत हिंसेअहिंसेच्या प्रश्नाबाबद भिन्न मत पडलें. बार्डोलीला तें व्यक्त झाले. पण हे मतभेद पुढें फारसें वाढलें नाहींत.

## क्रिप्स योजना

त्यानंतर हिंदी राजकारणांत प्रामुख्य प्राप्त झालेली गोष्ट घडली ती क्रिप्स योजनेची. रशियांत पराक्रम गाजवून आलेले व रशियाला जर्मनीविरुद्ध लढावयास लावणारे सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स हे हिंदुस्थानचा प्रश्नहि आपण सोडवूं शकूं या आत्मविश्वासानें हिंदुस्थानांत आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स हे आपल्याबरोबर जी योजना घेऊन आले त्याला कारण हिंदुस्थानविषयीं प्रेम, औदार्य, अन्यायाची

टोचणी, वचनांची पूर्ति, वगैरेपैकीं एकहि नव्हते. जपाननें गरुडझेपेंत सिंगापूर मलाया घेऊन ब्रम्हदेश जिंकला होता. बंगालवर त्याची विमानें घिरट्या घालू लागलीं होतीं. जपान जर आपल्या उसळत्या वेगांत हिंदुस्थानांत घुसला तर त्याचा प्रतिकार कोण करणार? त्याला कोण थोपवणार? आणि हिंदी लोकच जर जपानला सामील झाले तर! या साऱ्या भितीच्या कल्पनांनीं ब्रिटिशांना घेरलें व त्यांनीं हिंदुस्थानचें सख्य संपादनाकरितां तडजोडीचा मसुदा हातीं देऊन क्रिप्सना इकडे पाठविलें.

चर्चिल साहेबानीं जुलै १९४६ मध्यें पार्लमेंटांत जें भाषण केलें त्यांत ही गोष्ट निवेदन केली.

क्रिप्स योजनेंत घटनापरिषदेला मान्यता देण्यांत आली. 'युद्ध संपतां-क्षणींच हिंदी घटना बनविण्याकरितां निवडणुका करून प्रतिनिधींचें मंडळ स्थापन करण्यांत येईल' असें या योजनेंत सुरुवातीलाच म्हटलें आहे. 'हिंदी संस्थानानाहि त्यांत भाग घेतां यावा म्हणून तरतूद करण्यांत येईल. या परिषदेकडून जी घटना तयार होईल तिला बादशहाचें सरकार ताबडतोब संमती देईल.' त्याला कांहीं अपवादहि त्या योजनेंत होते. 'एकाद्या प्रांताला जर नवी घटना पसंत नसली तर तो प्रांत सध्याचा आपला घटनात्मक दर्जा कायम ठेवूं शकेल. पण त्या प्रांताला पुढें ही नवी घटना मान्य झाली व त्या प्रांताला जर या घटनेंत यावेसें वाटलें तर तशी तरतूद करण्यांत येईल. या सामील न होणाऱ्या प्रांतांना हिंदी संयुक्त-संघासारखाच दर्जा देण्यांत येईल.' असेंहि क्रिप्स योजनेंत म्हटलें होतें.

या घटनापरिषदेचे सभासद कोण असणार? नव्या प्रांतिकच्या निवड-णुका झाल्यावर त्यांच्यांतले एकदशांश सभासद प्रमाणशीर मतदान पद्धतीनें निवडले जावेत असें त्यांत सूचित केलें होतें. संस्थानांनींहि ब्रिटिश हिंदुस्थानां-तील लोकसंख्येच्या प्रमाणांत आपले प्रतिनिधी नेमावेत असें संस्थानी प्रतिनिधींबाबत म्हटलें होतें.

क्रिप्स योजनेंतील स्वातंत्र्य व घटनापरिषद या दोन बाबतींत कॉंग्रेसला आक्षेप घेण्यासारखें फारसें कांहीं नव्हतें. पण कॉंग्रेसला त्यांत पाकिस्तानचीं

बीजें दिसलीं. क्रिप्ससाहेबांनीं नंतर जो खुलासा केला त्यांत असें म्हटलें कीं, जर एखाद्या प्रांताला हिंदी संघांत सामील व्हावयाचें नसलें तर तसा ठराव त्यांनीं आपल्या कायदेमंडळांत आणावा. त्या ठरावाला ६० टक्के मतें मिळालीं तर तो प्रांत आपोआप अलग राहील. पण जर त्या ठरावाला ५० व ६० टक्क्यांच्या दरम्यान मतें मिळालीं तर त्या प्रांतांतलि सर्व प्रौढांचीं मतें घ्यावींत व बहुमतानें होणारा निर्णय मान्य करावा.

काँग्रेसला ही दुरुस्ती अर्थातच मान्य नव्हती; पण काँग्रेस स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानें बांधली गेली असल्यामुळें तिला ह्या योजनेविरुद्ध फारसे आक्षेप घेता आले नाहींत. जिनांनीं मात्र एक नवाच हट्ट आरंभिला. ते म्हणाले, सध्याची प्रांताची रचना ही स्वैरपणें करण्यांत आली आहे. तेव्हां प्रांताच्या कायदेमंडळांत पाकिस्तानला ६० टक्के मिळणें कठीण आहे. एवढेंच नव्हे तर प्रौढांचीं मतें घेतलीं तरी तें कठीण जाणार आहे. तेव्हां मतेंच जर घ्यावयाचीं असतील तर ज्या मुसलमानांना तुम्ही स्वयंनिर्णयाचा हक्क देता त्यांचींच घ्यावींत. इतरांचीं घेऊ नयेत.

काँग्रेसनें विभागणीशिवाय संस्थानें, संरक्षण व व्हॉईसरॉयच्या हंगामी सरकारांत व्हेटो या कारणाकरतांहि क्रिप्स योजना फेंटाळली. लीगनें काँग्रेसचें अनुकरण केलें. क्रिप्ससाहेब पराभूत होऊन परत गेले. जातांना त्यांनीं कराचीला जी मुलाखत दिली तींत लीगचा पक्ष घेऊन काँग्रेसला लत्ताप्रहार केला.

क्रिप्स योजना परत घेण्याचें कारण जपानची वाटणारी भीती कमी झाली हें असू शकेल. कदाचित् त्यांना काँग्रेस मोहक शब्दांनीं आपल्या जाळ्यांत सांपडेल असेंहि वाटलें असेल. ही योजना फेंटाळल्यामुळें काँग्रेसमध्यें असा एक अल्पसंख्यवर्ग निर्माण झाला कीं, ज्यांना झालें हें बरें झालें नाहीं असें वाटलें.

क्रिप्स निघून गेल्यानंतर काँग्रेसपुढें प्रत्यक्ष प्रतिकाराचा विचार करण्याशिवाय दुसरा पर्यायच राहिला नाहीं. काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक वर्धा येथें १४ जुलैला भरली व तिनें लढा अटळच झाला तर तो करावा असा

निर्णय घेतला. त्या ठरावांत घटना परिषदेचा जो उल्लेख आहे तो महत्त्वाचा व सशास्त्र आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतून निघून गेल्यावरहि जबाबदार हिंदी प्रतिनिधी एकत्र येतील. ते हंगामी सरकार बनवतील व हें हंगामी सरकार घटना परिषद बोलावील असें त्या ठरावांत म्हटले आहे. "या घटना परिषदेनें केलेली घटना फेडरल स्वरुपाची असेल. फेडरेशनमध्यें सामील होणाऱ्या घटकाना जास्तींत जास्त स्वायत्तता देण्यांत येईल व शेषाधिकार हे त्यांच्याचकडे रहातील" हा शेवटचा मजकूर वर्ध्याच्या ठरावांत नव्हता; पण मुंबईच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या ठरावांत घालण्यांत आला. मुस्लीम लीगला जास्तीत जास्त काँग्रेस काय देऊ शकेल हें ह्या ठरावांत सांगितले आहे. प्रांताना शेषाधिकारासह स्वायत्तता द्यावयास काँग्रेस तयार आहे असें काँग्रेसनें म्हटले व त्यापासून अद्याप काँग्रेस परावृत्त झाली नाहीं.

८ ऑगस्टचा ठराव ज्याला 'चलेजाव'चा ठराव म्हणतात तो झाल्यानंतर साऱ्या हिंदुस्थानांत प्रचंड भडका उडाला. तो इतिहास प्रसिद्धच आहे. काँग्रेस तुरुंगांत असतांना तडजोडीची बोलणीं होणें अशक्यच होते. म. गांधी १९४४ च्या मे महिन्यांत मुक्त झाल्यानंतर त्यांनीं व राजाजींनीं पुनः तडजोडीचे प्रयत्न केले. लॉर्ड लिनलिथगोंच्या जागीं वेव्हेल हे व्हाईसरॉय म्हणून आले होते. वेव्हेल हे युद्धांकरतां हिंदुस्थानचे सहकार्य संपादन करावे व त्या भूमिकेवरून तडजोड करावी अशा वृत्तीचे दिसत होते.

म. गांधी हे आजारीपणामुळेंच सुटले. ते डॉक्टरांच्या सल्ल्यावरून पांचगणीला हवा बदलण्याकरतां गेले. तेथें त्यांनीं इंग्लंडच्या 'न्यूज क्रॉनिकलचे' वार्ताहर मि. गेल्डर याना एक मुलाखत दिली व आपण कोणत्या मुद्यावर सरकारशीं तडजोडीला तयार आहोंत हें कळविले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची ताबडतोब घोषणा; राष्ट्रीय सरकारची स्थापना या दोन गोष्टी झाल्यावर आपण वर्किंग कमिटीला कायदेभंग थांबविण्यास व युद्धाशीं संपूर्ण सहकार्य करण्यास सांगू असें गांधींनीं म्हटले. युद्ध खर्चाची जबाबदारी मात्र हिंदुस्थानवर पडतां कामा नये; व युद्ध चालू असेंपर्यंत त्यांत हस्तक्षेप आम्ही करूं नये अशा दोन गोष्टी गांधींनीं निवेदन केल्या.

ह्या पत्राला व्हाईसरॉयनीं अनुकूल उत्तर पाठविले नाहीं. पार्लमेंटनें याबद्दल पूर्वीच जो निर्णय घेतला आहे, तो तुमच्या या नव्या सूचनानीं बदलावा लागेल व तसें करावयास सरकार तयार नाहीं असें उत्तर व्हाईसरॉयनीं पाठविल्यामुळें तडजोडीची पत्रापत्रीं थांबली.

या नंतर जर दार ठोठवायचेच असले तर लीगचे ठोठावलें पाहिजे असें दिवसेंदिवस स्पष्ट होऊं लागले. पण जिनाकडे कसें जायचें? त्याना लीगचें संपूर्ण प्रतिनिधीत्व मान्य व्हावयास पाहिजे होतें; पाकिस्थान तत्त्वाला मान्यता हवी होती व या दोन गोष्टी झाल्यानंतर ते स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे बघणार होते. एकीकडे ब्रिटिश सरकार स्वातंत्र्य मान्य करावयास तयार नाहींत आणि दुसरीकडे जिना पाकिस्थानला मान्यता मिळाल्याशियाय पुढें पाऊल टाकावयास राजी नाहींत अशा अडचणींत देश सांपडला.

त्यावेळीं विचाराकरतां ज्याला राजाजी योजना म्हणतात ती योजना सिद्ध होती. यावेळीं घटना परिषदेचें राजकारण मागें पडलें व आपसांत तडजोड होते कां हें पहाण्याकडे बाहेर असलेले पुढारी लागले.

राजाजी योजनेंत लीगनें ( १ ) कॉंग्रेसच्या स्वातंत्र्याच्या मागणीला संमती द्यावी ( २ ) राष्ट्रीय सरकारमध्यें सहकार्य करावें अशा दोन प्रारंभीच्या अटी होत्या. त्या मान्य झाल्यावर कॉंग्रेसनें काय करावें हें सांगितलें होतें. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानच्या वायव्य व ईशान्येच्या निखालस मुसलमान बहुसंख्य असलेल्या जिल्ह्याच्या सरहद्दी आखाव्यात. या जिल्ह्यांतील सर्व प्रौढांचीं किंवा तत्सम मतदारांची मतें घ्यावीत व त्यांचा हिंदुस्थानांतून फुटून जाण्याचा निर्णय मान्य करावा. जर बहुमतानें स्वतंत्र सार्वभौम राज्य बनविण्याचा निर्णय घेतला गेला तर त्याची अंमलबजावणी करावी. मात्र जे जिल्हे सरहद्दीवर असतील त्यांना नव्या राज्यांत जायचे कां हिंदुस्थानांत रहायचें हें ठरविण्याची मुभा असावी. अशा प्रकारचीं दोन राष्ट्रें निर्माण झाल्यावर त्यांनीं संरक्षण, वहातुक, व्यापार व इतर जरुरीच्या प्रश्नाबाबत आपसांत करार करावेत. ह्या अटी ब्रिटिशांनीं हिंदुस्थानला संपूर्ण सत्ता दिली व जबाबदारी टाकली तरच बंधनकारक मानाव्यात.

ह्या योजनेच्या आधारावरच गांधीजींनीं १७ जुलै १९४४ रोजीं जिनाना गुजराथींत अत्यंत जिव्हाळ्याचें पत्र लिहिलें व दोघांची मुलाखत सुरू झाली. ९ सप्टेंबर पासून २७ सप्टेंबर पर्यंत ही बोलणीं सुरु होती. शेवटीं ती बोलणीं फिसकटली. राजाजी योजनेंत स्वयंनिर्णयानें जर पाकिस्तान येणारच असेल तर तें येऊं द्यावें अशी तरतूद होती. कॉंग्रेसनें मागें एकदां दिल्लीला स्वयंनिर्णयाचा ठराव पास केला होता. तो ठराव नंतर झालेल्या जगतनारायणच्या ठरावानें बाधित होत नाहीं असें पं. जवाहरलाल, मौ. आझाद वगैरेनीं पत्रकें काढून स्पष्ट केलें होतें. तथापि राजाजींच्या ठरावाबद्दल कॉंग्रेस गोटांत पुष्कळच नापसंती होती.

म. गांधी व जिना यांच्या मुलाखतींत गांधीजींनीं, पाकिस्तान म्हणजे स्वतंत्र सार्वभौम राज्य, बिलकुल मान्य केलें नाहीं. गांधींच्या तडजोडींत संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वहातुक, जकात, व्यापार वगैरे खातीं मध्यवर्ती सत्तेच्या ताब्यांत ठेवावींत अशी अट होती. "त्यानंतर ज्या जिल्ह्यांत मुसलमानांचें निखालस बहुमत असेल त्या जिल्ह्यांना सार्वभौमत्वाचें हक्क मतमोजणी करून द्यावेत; पण हा विभाग व इतर विभाग यांच्यामध्यें मित्रत्वाचें तहनामे व्हावेत" या आपल्या योजनेमुळें लीगला हवे असलेलें पाकिस्तानचें सार प्राप्त होईल असें गांधींचें म्हणणें होतं. जिनाना अर्थातच हे पसंत नव्हते. त्यांनीं पहिला हल्ला जो केला तो गांधींच्या प्रतिनिधीत्वावरच केला. तुम्ही कोणाचें प्रतिनिधी हा प्रश्न तें इतक्या कुत्सितपणें विचारीत राहिलें कीं, कोणालाहि त्याबद्दल चीड यावी. अशा प्रकारें हाहि प्रयत्न फसला. सरकारशीं तडजोड नाहीं आणि जिनांशीहि तडजोड नाहीं अशा पेंचप्रसंगांतून देश मुक्त होण्याची चिन्हें दिसेनात.

राजाजी व गांधी यांचें दोन प्रयत्न फसल्यावर कॉंग्रेस व लीगचे उपनेते भुलाभाई व लिआकतअल्ली या मध्यवर्ती कायदेमंडळांतील सदस्यांनीं मध्यवर्ती कायदेमंडळापुरती एक नवी योजना तयार केली. लिआकतअल्लींनीं जरी या योजनेचें सहपितृत्व नाकारलें असलें अगर अर्धवट कबूल केलें असले तरी कोणाचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. म. गांधींनीं मात्र भुलाभाईंच्या या

करारालां मान्यता दिली होती. त्या करारांत मध्यवर्ती कायदेमंडळाच्या कार्यकारी मंडळांत लीग व काँग्रेसचे सारखे सारखे प्रतिनिधी घ्यावेत, तसेंच शिख, हरिजन वगैरे अल्पसंख्याकांचें प्रतिनिधी घ्यावेत, वर्किंग कमिटीची मुक्तता करावी, व्हाईसरॉयनें व्हेटो वापरू नये, प्रांतामध्यें संमिश्र मंत्रीमंडळें बनवावी वगैरे अटी होत्या. तो खर्डा भुलाभाईनीं गांधींना जानेवारीं १९४५ मध्यें दाखविला व नंतर ते दिल्लीला व्हाईसरॉयकडे गेलें. हा खर्डा घेऊन पुढें व्हाईसरॉय २१ मार्च १९४५ रोजीं विलायतेला गेले व तेथें अडीच महिने राहिलें. ४ जूनला ते परत आले आणि १४ जून रोजीं त्यांनीं रेडिओवर एक वक्तव्य केलें. लिआकतअल्ली व भुलाभाईंच्या कराराचा शेवट झालाच होता; पण व्हाईसरॉयनीं त्या जळलेल्या करार.च्या राखेंतून समप्रतिनिधीत्वाचें सूत्र तेवढें हस्तगत केलें. ह्या साऱ्या घडामोडी होत असतांना घटनापरिषदेचें राजकारण मागेंच पडत चाललें होते. पुढाऱ्यांची श्रद्धा आपसांतील तडजोडीवर होती. मॉरिस ग्वायर यांनींहि घटनापरिषदेऐवजी थोड्याफार पुढाऱ्यांच्या वाटाघाटींतून ऐक्य निर्माण होईल असें म्हटलें होतें. पण ही तडजोड होईना.

लॉर्ड वेव्हेलच्या योजनेंत ( १ ) दिल्लीच्या कार्यकारी मंडळांत सवर्ण हिंदु व मुसलमान यांचे सारखे प्रतिनिधी असतील. ( २ ) व्हॉईसरॉय व सरसेनापतीशिवाय इतर युरोपिअन अधिकारी त्यांत नसतील. ( ३ ) व्हॉईसरॉय व्हेटोचा उपयोग असंमजसपणें करणार नाहींत. ( ४ ) या योजनेचे कायमच्या योजनेवर कांहींहि बंधन नाहीं. ( ५ ) प्रांतांतहि संमिश्र मंत्रीमंडळें बनवलीं जावीत. या त्यांच्या भाषणांत वर्किंग कमिटीच्या सभासदांची सुटका करण्याचा हुकूम होता.

प्रांताचे मुख्य प्रधान, काँग्रेसचे मध्यवर्ती असेंब्लीतील नेते, लीगचे उपनेते, कौन्सिलमधील काँग्रेस व लीगचे नेते, राष्ट्रीय पक्ष व युरोपिअन पक्ष यांचे नेते, म. गांधी, जीना, शिवराज व तारासिंग यांची त्यांनीं सिमल्याला २५ जूनला परिषद बोलावली. मौ. अझादना त्यांनीं काँग्रेसचे अध्यक्ष असूनहि जिनांच्या भीतीनें बोलाविलें नाहीं. पण गांधींनीं ही गोष्ट नापसंत करतांच मौलानांनाहि बोलावण्यांत आलें. सिमल्यास २५ जून पासून १४

जुलैपर्यंत बोलणीं सुरूं होतीं. अखेरीस १४ जुलैला तीं बोलणीं फिसकटल्याचें व्हॉईसरॉयनीं जाहिर केलें. हीं बोलणीं फिसकटण्याचें एकच कारण झालें. तें म्हणजे जिना मुस्लीम प्रतिनिधीमध्यें कॉंग्रेसचाच काय पण युनिॲनिस्ट पक्षाचाहि मुस्लीम सभासद घेण्यास तयार नव्हते हें होय. लॉर्ड वेव्हेल यांनीं कॉंग्रेस मुसलमानाला वगळण्याचें मान्य केलें असें जिनांच्या निवेदना-वरून दिसते, पण त्यांनीं मलिक खिजर हयातखान ( युनिअनिस्ट ) यांच्या-बद्दल हट्ट धरला व त्यामुळें हा प्रयत्न फसला. कॉंग्रेसच्या यादींत हयातखान नव्हते पण मौलाना आझादांचें नांव होतें. एकंदरींत एका सभासदाकरतां ही परिषद अपयशी ठरली व त्याला जिनाच कारणीभूत झाले हें निःसंशय.

त्यानंतर बाराच दिवसांनीं इंग्लंडमध्यें निवडणूका झाल्या. त्यांत भारतमंत्री ॲमरी हे पराभूत झाले आणि चर्चीलसाहेबांचा कॉन्झर्वेटिव्ह पक्ष स्थानभ्रष्ट होऊन मजूर मंत्री मंडळ अस्तित्वांत आलें.

त्यामुळें व जपानच्या शरणागतीमुळें हिंदी राजकारणाला नवीन जीवन प्राप्त झालें. लॉर्ड वेव्हेलसाहेब २१ ऑगस्टला पुनः विलायतेस गेले व १५. सप्टेंबरला परतले. ते परत आल्यावर निवडणुकांचे वारे वाहू लागलें. सर्वच निवडणुका जाहीर झाल्या. कॉंग्रेस सिमल्याहून जी परतली ती तडजोडीकरतां जिनांचें परत तोंड पहावयाचें नाहीं या निश्चयानें परतली. त्यांना घटना-परिषदेचें स्मरण झालें व तो भाग ठरावांत व निवडणूक जाहिरनाम्यांत पुनः मांडण्यांत आला.

निवडणुकींत एकीकडे कॉंग्रेसचा व दुसरीकडे लीगचा अभूतपूर्व असा विजय झाला. हें निवडणूकीचें राजकारण सुमारें ६।७ महिने चालले होते. साऱ्या निवडणूका संपल्यावर मार्च महिन्याच्या २४ तारखेला ब्रिटिश मंत्रीमंडळाचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत आले.

अशाप्रकारें हिंदुस्थानचा प्रश्न राजकीय क्षितीजावर कसकसा परिणत होत गेला याचें थोडक्यांत निरीक्षण येथें केलें आहे. सर्व प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर जातीय प्रश्न सोडविण्यास घटनापरिषदच भरविली पाहिजे असें

जिनाविरहित सर्व पुढाऱ्यांचें मत बनत चालले. या घटनापरिषदेचें तारू कसकसें वहावत चाललें व त्याला स्थिरावण्यास किती अडचणी आल्या हें वरील वर्णनावरून दिसून येतें.

काँग्रेस जर पहिल्यापासून घटना परिषदेच्याच धोरणानें चालली असती तर जातीय प्रश्नाला इतके हेलकावे बसले नसते. काँग्रेसला स्वयंनिर्णयाचें तत्व सोडता येईना. स्वयंनिर्णय याला काँग्रेस मर्यादा घालू लागली. सार्वभौमत्वा-विरहित स्वयंनिर्णय हा सिद्धांत मान्य करणें जिनाना अशक्यच होते. स्वयंनिर्णय मान्य सार्वभौमत्व अमान्य ही गोष्टच अशक्य आहे असें त्यांचें म्हणणें. पण काँग्रेसला हिंदुस्थान अखंड ठेऊन जुन्या प्रांताना अगर पुनर्घटित प्रांताना स्वयंनिर्णय द्यावयाचा होता. तें शक्य झाले नाहीं आणि यापुढेंहि ज्या अडचणी निर्माण होणार आहेत, त्या स्वयंनिर्णयाच्या तत्वामुळेंच होणार आहेत.

★

नगर वाचनालय
ता.
सातारा

# त्रिमंत्र्यांची शिष्टाई : : ३

इंग्लंडच्या निवडणुका झाल्या, मजूरपक्ष यशस्वी झाला, पेथिक लॉरेन्स हे भारतमंत्री झाले, लॉर्ड वेव्हेल विलायतला जाऊन आले आणि हिंदुस्थानांतहि चहूकडे निवडणुका होऊन गेल्या. मजूरपक्षाचे सभासद हिंदुस्थानकरतां कांहीं तरी भरीव कामगिरी करू इच्छित होते. हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्याकरतां इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. ॲटली यांनीं पार्लमेंटमध्यें १५ मार्च १९४६ रोजीं एक भाषण केले व त्या भाषणांत 'हिंदुस्थानला शक्य तितक्या लवकर स्वातंत्र्य प्राप्त व्हावें म्हणून' हिंदुस्थानला मदत करण्याकरतां (१) भारतमंत्री (२) सरस्टॅफर्ड क्रिप्स व (३) मि. ए. व्ही. ॲलेक्झांडर हिंदुस्थानांत जात आहेत असें प्रसिद्ध झाले. हिंदुस्थांनात आल्यानंतर लवकरच या मंत्र्यांनीं कॉंग्रेस, लीग वगैरे संस्थांच्या पुढाऱ्यांच्या मुलाखती घेण्यास सुरवात केली. पण या मुलाखतींतून उभयपक्षाला संमत होईल अशी योजना बाहेर पडेना. हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न हा त्यानीं मतभेदाचा विषयच ठेवला नाहीं. तें आम्हीं मान्य केलेच आहे, अशा अभिनिवेशांत त्रिमंत्री बोलत होते. पण हें स्वातंत्र्य

तुम्हाला निर्वेधपणें भोगतां यावें याकरतां जातीय प्रश्न आपण सोडविला पाहिजे असें ते म्हणू लागले,

त्यानंतर काँग्रेसनें आमच्या समजुतीप्रमाणें ब्रिटन व हिंदुस्थान यांच्यांत तह करूं या अशी मागणी करावयास पाहिजे होती. जोपर्यंत तिसरी सत्ता हिंदुस्थानांत आहे तोपर्यंत जातीय प्रश्न सुटणार नाहीं ही जर काँग्रेसची पहिल्यापासून वृत्ती अगर भावना होती, तर मग त्यांनीं तहाची बोलणीं प्रारंभीच सुरू कां केली नाहींत ? सरकारतर्फे तह कोणाबरोबर करायचा हा प्रश्न आला असतां तर त्याला उत्तर देणें फारसें कठीण नव्हते. अर्थात त्याला ब्रिटिशांची तयारी असावयास पाहिजे होती. संस्थानिकांचें नरेंद्रमंडळ होतें, संस्थानी प्रजापरिषद होती, काँग्रेस होती, लीग होती, हरिजनांची शिखांची सर्वांची प्रातिनिधिक मंडळें होती, तीहि जर अपुरी वाटली असती तर नुकत्याच झालेल्या मध्यवर्ती कायदेमंडळाचें प्रतिनिधी होते, त्यांच्या जोडीला जर संस्थानिक व संस्थानी प्रजामंडळें घेतली असती तर असा तह करणें अशक्य झालें नसतें.

आयर्लंडमध्यें सत्ता संक्रमण कोणत्या पद्धतीनें झाले ? प्रथम तह झाला, नंतर हंगामी सरकार आले व त्या सरकारनीं घटनापरिषद बोलावून घटना तयार केली. हिंदुस्थानांत असें कां होऊ शकलें नसतें ? तह झाला असता तर स्वातंत्र्य तरी हमखास पदरांत पडलें असतें. म. गांधींनीं ब्रिटिशांच्या सचोटीची परिक्षा पाहिली, त्यांत त्यांना अर्धवट यश आलें. आय. एन्. ए. चें लोक सुटले पण मिठावरचा कर रद्द केला गेला नाहीं. म. गांधींच्या किंवा वर्किंग कमिटीच्या लक्षांत ही सत्ता संक्रमणाची प्रणाली आली नाहीं असें आम्ही कसें म्हणावे ? कदाचित् सर्वजण जीनाना भीत असतील. त्यामुळेंच तहाची बोलणीं झाली नाहींत आणि जातीय प्रश्नाची गाठ सोडण्यालाच स्वातंत्र्यापेक्षांहि अधिक महत्त्व प्राप्त झालें.

आज त्रिमंत्री योजनेंत संपूर्ण स्वातंत्र्य आहे; पण तें संकल्पित स्वातंत्र्य आहे, प्रत्यक्ष नाहीं. हिंदुस्थानचें भवितव्य घटनापरिषदेच्या यशापयशावर

टांगलेलें आहे. हिंदुस्थानच्या पदरांत स्वातंत्र्याचा तह जर पडला असता तर गेल्या १५०।२०० वर्षांचा प्रश्न निकालांत निघाला म्हणून आपण सुस्कारा टाकला असता. पण हिंदुस्थानांत स्वातंत्र्याच्या प्रश्नापेक्षांहि जातीय प्रश्न हा प्रबल व सर्वव्यापी प्रश्न झाला आहे. अजूनहि हा प्रश्न किती दिवस छळणार हें कोणालाच सांगतां येणार नाहीं.

त्रिमंत्र्यांनीं प्राथमिक चर्चा व मुलाखती घेतल्या. पण राजकीय ऐक्य होण्याची शक्यता त्यांना दिसली नाहीं. त्यांनीं एकदां सिमल्याला कॉंग्रेस, लीग व ब्रिटिश प्रतिनिधी यांची एकत्र बैठहि बोलावली. त्या बैठकींत मतैक्य झालें नाहीं. जिनांच्या दृष्टीला सिमल्याच्या एकत्र बैठकींत कॉंग्रेसचे आझाद व खान अबदुल गफार खान कसे दिसले असतील याचें काल्पनिक चित्र रेखाटणेंच अधिक उद्‌बोधक ठरेल.

शेवटीं आपसांत कांहीं जमत नाहीं असें पाहून या त्रिमंत्र्यांनीं आपली एक योजना १६ मेला प्रसिद्ध केली. त्या योजनेला त्यांनीं ब्रिटिश सरकारची मंजुरी मिळवून ठेवली होती. त्या योजनेकडे वळण्यापूर्वी आपण चर्चेचे मुद्दे कोणते तें पाहूं. चर्चेचे मुद्दे सहा होते. (१) स्वातंत्र्य. (२) पाकिस्थान. (३) हंगामी सरकार. (४) घटनापरिषद. (५) संस्थानिक. (६) ब्रिटन व हिंदुस्थानचा तह. या सहा विवाद्य प्रश्नांपैकीं, पहिला, चवथा, पांचवा व सहावा हे प्रश्न बिलकुल त्रासदायक नव्हते. स्वातंत्र्य काय द्यावयाचेंच आहे. घटनापरिषद तर भरविलीच पाहिजे, संस्थानिक हे तुमच्या स्वातंत्र्याआड येणार नाहींत आणि ब्रिटिशांच्या बरोबरीचे करारमदार, तहनामे यालाहि येणाऱ्या अडचणी या भविष्य काळांतील आहेत. तेव्हां चारहि प्रश्नांपैकीं एकेक जरी अनर्थकारक असला तरी त्याबाबत गुळमुळींत उत्तरें देऊन परिषद, शिष्टाई, चर्चा चालल्या.

फक्त वर म्हटल्याप्रमाणें पाकिस्थानचा प्रश्न हा प्रथम विचाराकरतां घेतला. आणि ह्या विचारांतच बोलणीं संपलीं. पण ह्या बोलण्यांत एक गोष्ट सिद्ध झाली. पाकिस्थान असें नांव धारण करणारे स्वतंत्र व सार्वभौम राज्य

हिंदुस्थानांत स्थापन होणार नाहीं असें ठरलें. ही सामान्य गोष्ट नव्हे. १९४० सालापासून १९४६ सालपर्यंत जर कोणत्या एका व्याधीनें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ग्रस्त झालें असलें तर याच व्याधीनें होय. एकेकाळीं अशी भीती वाटत होती कीं, सारा हिंदुस्थान गुलामगिरींत ठेवण्याऐवजीं पाकिस्थान आलें तरी परवडलें पण ही गुलामगिरी नको.

हिंदुस्थान पाकिस्थानच्या इतका विरुद्ध कां होता याचा आपण खोलवर विचार केला पाहिजे. मुसलमानांच्या ताब्यांत जर हिंदुस्थानचे सहा प्रांत गेले तर तेथील हिंदु जनतेचा छळ होईल वगैरे गोष्टी विरोधाला कारणीभूत होत्याच. पण जर या पाकिस्थाननें पुढें मागें आपलें बळ एकवटलें व हिंदुस्थानवर स्वारी केली आणि या स्वारींत जर हिंदुस्थान पराभूत झाला तर इस्लामी चांद साऱ्या हिंदुस्थानवर फडकूं लागेल व पुन: अकबर व औरंगजेब यांच्या काळांत आपण जाऊं अशी एक भीति त्यांत दडलेली होती. ही भीति उघडपणें बोलून दाखविणेंहि कठिण होतें, कारण त्यांत हिंदुस्थानच्या पराक्रमाला लांछनच होतें. आता हिंदुस्थानचें संरक्षण हें मध्यवर्ती सत्तेच्या स्वाधीन झाल्यामुळें तसली भीती उरली नाहीं. आपल्या संमतीनें आपण शत्रू निर्माण करणें हें केव्हांहि शहाणपणाचें नव्हतें.

याच्या उलट जिनांची स्थिती होती. निदान ते तशी भासवीत होते. आम्ही मुसलमान अल्पसंख्य आहोंत व आमच्या संस्कृतीचें, धर्माचें, सामाजिक चालीरीतींचें संरक्षण हें हिंदूंच्या राज्यांत होणार नाहीं अशी भीति ते व्यक्त करीत. ह्या संरक्षणाकरतां त्यांना लष्कर म्हणजेच सार्वभौमसत्ता हवी होती. मुसलमान समाज हा चढाऊ वृत्तीचा असल्यामुळें त्यांच्या हक्कांना कोणत्याहि प्रकारचा बाध येईल ही शक्यताच नाहीं. आजपर्यंत कोणत्या अल्पसंख्याक वर्गाची गळचेपी कॉंग्रेसनें केली आहे? अस्पृश्य समाज, शिख, मुसलमान वगैरे जातीय वृत्तींचा डांगोरा पिटणाऱ्यांना सरकारनें दडपलें नाहीं व कॉंग्रेसनेंहि दडपलें नाहीं. त्या वर्गातल्या कांहीं कांहीं व्यक्तींना गुणाकडे न पहातां जातीकडे पाहूनच महत्त्वाच्या जागा व सवलती मिळाल्या आहेत. त्याकरतां

अन्य समाजांतल्या लायक माणसांवर अन्याय होत आहे हें उघड्या डोळ्यांनीं दिसत असतां आपण तें सहन करीत आहों.

ब्रिटिश सरकारनें कदाचित् या वर्गांना राजकीय कारणाकरितां हाताशीं धरलें असेल पण काँग्रेसचें काय ? काँग्रेसहि आपण सर्व वर्गांचे प्रतिनिधी आहोंत हें सिद्ध करण्याकरतां व आपली न्याय्य व उदार बुद्धी प्रकट करण्याकरतां जातीय वादाची पुरस्कर्ती बनत चालली आहे. आजच्या काँग्रेसला हिंदु मनुष्य हा ख्रिश्चनांचा, किंवा अँग्लो इंडियनांचा, किंवा हरिजनांचा किंवा पारशांचा किंवा मुसलमानांचा प्रतिनिधी किंवा हितरक्षक आहे असें वाटत नाहीं. त्या त्या जातीचे लोकच आपले हितरक्षण करण्यास समर्थ आहेत असें काँग्रेसला वाटतें. हा एक ब्रिटिशांच्या दीर्घकालीन सहवासामुळें मनांत निर्माण झालेला न्यूनगंड आहे. शेवटीं शेवटीं तर काँग्रेसला अँग्लो इंडीयन्सबद्दल प्रेम वाटू लागले व त्यांच्याच जातीचा प्रतिनिधी कार्यकारी मंडळांत घ्यावा असें त्यांचें मत बनलें होतें.

प्रातिनिधित्व हें कशाकरतां असतें ? जातीय हितरक्षणाकरतां, त्या व्यक्तीला किंवा संस्थेला मान्यता देण्याकरितां किंवा आपलें औदार्य अथवा दावा सिद्ध करण्याकरतां ? या वृत्तीमुळेंच लोकशाही दुर्बळ होत जाते. ज्या ठिकाणीं लायकी ही लोकशाहीची कसोटी संपते व जातीय दृष्टी हीच प्रभावी होते, तेथें लोकशाहीला ग्रहण लागते. हिंदुस्थानांतील सर्वच पक्ष कमी अधिक प्रमाणांत जातीय वृत्तीचे पुरस्कर्ते आहेत. त्याला राष्ट्रीयत्वावर हक्क सांगणारी काँग्रेस अपवाद नाहीं. काँग्रेसच्या बाबतींत एवढेच म्हणतां येईल कीं, हा पुरस्कार सद्धेतूनें, न्याय बुद्धिनें करण्यांत येतो. पण त्यामुळें राष्ट्रीयत्व हें पांगळे बनतें आणि लोकशाही दुर्बळ ठरते.

इतर समाजांना भिऊन वागणारी काँग्रेस ही मुसलमानासारख्या जातीय दृष्ट्या जागृत झालेल्या धर्माला दडपून टाकील ही जिनांची भीति अस्थानी होती. जिनांची जर ही समजूत खरी असेल तर ते भित्रे आहेत आणि खोटी असेल तर ते ढोंगी आहेत असें म्हणावे लागते.

त्रिमंत्री योजनेंत पाकिस्थानची मागणी अमान्य करण्यांत आली. त्याला जीं कारणें देण्यांत आली तीं कारणें पूर्वी कोणी दिली नव्हती असें नाहीं. पण युक्तीवाद खरा असला तरी तो पटावयास मागें शक्ती लागते. लीगला पाकिस्तान जें हवें आहे ते हक्क म्हणून हवे आहे. मुस्लीम बहुसंख्याकांना आपल्याला कोणत्या प्रकारचें राज्य पाहिजे हें ठरविण्याचा हक्क आहे. पण तो बजावण्याकरतां त्यांना हिंदूंचा मुलूख हवा आहे! हें पाकिस्तान राज्यकारभाराच्या आणि पैशाच्या दृष्टीनें कार्यक्षम करण्याकरतां मुसलमान जेथें अल्पसंख्य आहेत तेथलाहि भरपूर टापू पाकिस्तानमध्यें अंतर्भूत करण्याची जरुरी आहे असें लीगचें म्हणणें.

वायव्येकडील ( पंजाब ) भागांत मुसलमानांची लोकसंख्या २,२६,५३,२९४ आहे व हिंदूची १,३८,४०,२३१ आहे. म्हणजे शेकडा ६२ मुसलमान व ३८ हिंदु आहेत. ईशान्य ( बंगाल ) विभागांत, ३ कोटी ६४ लक्ष मुसलमान व ३ कोटी, ४० लक्ष हिंदु आहेत. आसाममध्यें हिंदूंची संख्या जास्त आहे पण पाकिस्थान यशस्वी करण्याकरतां तो आमच्या ताब्यांत द्या असें लीगचें म्हणणें. पंजाब सरहद्द बंगाल वगैरे प्रांतांत मुसलमानांची वस्ती जास्त असल्यामुळें त्यांच्या स्वतंत्र राज्याची मागणी एकवेळ समजू शकते. पण आसाममध्यें हिंदु बहुसंख्य असले तरी तो प्रांत आमचें पाकिस्थान यशस्वी करण्याकरतां आम्हाला द्या ही मागणी भयंकर धाडसाची आहे. हें धाडस लीगच करू शकली. पण लीगची ही स्वतंत्र सार्वभौम पाकिस्थानची मागणी त्रिमंत्र्यांनीं अमान्य केली. त्याला कारणें दिली ती अशी—

लीगच्या मागणीप्रमाणें पाकिस्थान स्थापन केल्यानें जातीय प्रश्न सुटणार नाहीं. तसेंच ज्या पंजाबच्या, बंगालच्या आणि आसामच्या भागांत, मुसलमानेतर बहुसंख्य आहेत, ते जिल्हे पाकिस्थानमध्यें समाविष्ट कां करावेत याला कांहीं न्याय्य कारणें आम्हाला दिसत नाहींत असें या योजनेंत म्हटलें आहे. शिखांनीं पाकिस्थानमध्यें जाण्यास कां तयार व्हावें याला आम्हाला कांहीं कारण दिसत नाहीं असें त्रिमंत्री म्हणाले.

तेव्हां लीगचा जो दुसरा मुद्दा कीं, मुसलमानेतर विभागांचाहि समावेश पाकिस्थानात करावा, तो बाजूला सारला गेला. मग फक्त ज्या विभागांत मुसलमान बहुसंख्य आहेत त्यांचें स्वतंत्र राज्य करावें कीं काय हा प्रश्न उरतो. त्या मुद्यावर तडजोड होते कां हें पहाण्याचा प्रयत्न त्रिमंत्र्यांनीं केला. पण त्यांना हीहि गोष्ट अशक्य वाटली. त्रिमंत्र्यांनीं पाकिस्थानचें तत्त्व मान्य केलें कां अमान्य केलें हें स्पष्ट केलें नसले तरी व्यावहारिक दृष्ट्या त्यांनीं ही मागणी फेटाळली.

हें छोटें पाकिस्थान मुसलमानांना अव्यवहार्य वाटते असें याच मंत्र्यांनीं म्हटले आहे. कारण तसें झाल्यास पंजाबमधील अंबाला व जालंदर हे विभाग पाकिस्थानमधून काढून टाकावे लागतात. या दोन विभागांत २९ जिल्ह्यापैकीं १२ जिल्हे आहेत. त्यांच्या लोकसंख्येचें शेंकडा प्रमाण कसें आहे तें पहा.

**पंजाब**

| जिल्हे | मुस्लीम | शिख | इतर |
|---|---|---|---|
| १ हिस्सार | २८ | ६ | ६४ |
| २ रोहटक | १७ | १ | ८१ |
| ३ गुरगांव | ३३ | ... | ६६ |
| ४ कर्नाल | ३० | २ | ६७ |
| ५ अंबाला | ३२ | १८ | ४९ |
| ६ सिमला | १८ | २.७ | ७८ |
| ७ कांगरा | ५ | ६ | ९४ |
| ८ हुशिआरपुर | ३२.५ | १७० | ५० |
| ९ जालंदर | ४५ | २६ | २७ |
| १० लुधिआना | ३७ | ४१.७ | २१.४ |
| ११ फेरोजपुर | ४५ | ३३ | २० |
| १२ अमृतसर | ३६.५ | ३६ | १५ |

याशिवाय पंजाबांत जीं पांच संस्थानें आहेत, त्यापैकीं फक्त कपुर्थळा संस्थानांत मुसलमानांची बहुसंख्या आहे. फरिदकोट, पतियाळा, झिंद, नाभा येथें शिख व हिंदु मिळून मुसलमानापेक्षां जास्त आहेत. पण सध्यां संस्थानांचा प्रश्न पाकिस्थानच्या बाबतींत लीगनें काढला नसल्यामुळें आपण तो बाजूला टेऊं.

हे बारा जिल्हे पाकिस्थानमध्यें समाविष्ट करण्यास त्रिमंत्री तयार झालें नाहींत. या बारा जिल्ह्यापैकीं शेवटच्या चारच जिल्ह्यांत शिखांची २५ टक्यावर वस्ती आहे. बाकीच्या पंजाबमध्यें ते फारच थोडे आहेत. हे पंजाबबद्दल झाले. आतां ईशान्य विभागाचा विचार केला तर त्यांतल्या आसाम प्रांतावर किती जुलूम करावयाचा याला तरी मर्यादा पाहिजे. आसाममध्यें एकंदर १२ जिल्हे आहेत. त्यांत सिल्हेट हाच एक असा जिल्हा आहे कीं, जेथें मुसलमान ६० टक्के व मुसलमानेतर ४० टक्के आहेत. बाकी सर्व जिल्ह्यांत हिंदूंची वस्ती खूपच अधिक आहे. तेव्हां जिनांचें पाकिस्थानचें स्वप्न खरें करण्याकरतां इतक्या जिल्ह्याना बळी देणें हें कोठल्या राजनीतींत बसते ? अर्थात ही गोष्ट त्रिमंत्र्यांनीं अमान्य केली.

आतां राहिला बंगाल. बंगालमध्यें एकूण २८ जिल्हे आहेत. त्यांतल्या पश्चिमेकडील ११ जिल्ह्यांत हिंदुची संख्या जास्त आहे. दिनाजपूर जिल्ह्यांत हिंदु व मुसलमान हे जवळ जवळ समप्रमाणांत आहेत. चितगांव टेकड्यांचा विभाग हा डोंगराळ असल्यामुळें तो सोडून दिला पाहिजे. अशाप्रकारें २७ पैकीं १२ जिल्हे असें आहेत कीं, जेथें हिंदुवर सक्ती करणें व त्यांना पाकिस्थानांत लोटणें हें अन्यायाचे होईल.

खुद्द कलकत्ता शहर हेहि जिनाना पाकिस्थानमध्यें हवे आहे. तेथें तर मुसलमान फक्त २३ टक्के व हिंदु ७७ टक्के आहेत. तेव्हां ईशान्येकडील सिल्हेट शिवायचा आसाम आणि १५ जिल्ह्यांशिवायचा बंगाल हा पाकिस्थानांत देणें केव्हांहि न्याय्य नाहीं. वायव्य व ईशान्य या दोन्ही विभागांत एकुण जिल्हे बलुचिस्थान वगळून ८२ आहेत. ( बंगाल २८, आसाम १२, सिंध ८, सरहद्द

५, व पंजाब २९ ) या ८२ जिल्ह्यांपैकीं, ३५ जिल्ह्यांत मुसलमानेतर बहुसंख्य आहेत व ४७ जिल्ह्यांत मुसलमानांची वस्ती जास्त आहे. तेव्हां या ४७ जिल्ह्यांकरतां हिंदुस्थानचें तुकडे पाडणें हें केव्हांहि इष्ट नाहीं असेंच त्रिमंत्र्यांना वाटले. शिवाय हे तुकडे पाडून जातीय प्रश्न सुटतो असेंहि नाहीं. कारण पाकिस्थान-विभागांत निवळ मुसलमान रहाणार आहेत आणि इतरत्र मुसलमान रहाणार नाहींत असेंहि नाहीं. साऱ्या हिंदुस्थानांत हिंदु मुसलमान, शिख वगैरे जाती इतक्या पसरलेल्या आहेत कीं, जातवारीवर सार्वभौम राज्यें निर्माण करणें हें चुकीचेंच आहे.

पाकिस्थान नाकारण्यास दुसरें कारण जें त्रिमंत्र्यांनीं सांगितलें तें राज्यकारभारविषयक. हिंदुस्थानच्या रेल्वे, पोस्ट, तारखातें यांची जी रचना व आंखणी केली आहे ती सारा हिंदुस्थान एक आहे असें समजून केली आहे. ईस्ट इंडिया रेल्वे, नॉर्थ वेस्ट रेल्वे व इतर रेल्वे यांची, स्वतंत्र राज्यें झाली म्हणजे वाटणीच करावयाला पाहिजे. ही वाटणी झाली म्हणजे दोन्ही राज्यावर आपत्तीच येणार.

तिसरें कारण संरक्षणासंबंधीचे. हिंदुस्थानची जी सैन्य रचना केली आहे ती सारा हिंदुस्थान एक आहे असें समजून केली आहे. त्या सैन्याचें, आरमाराचे व वैमानिक दलाचे आतां तुकडे पाडलें तर सारें संरक्षण खातें खिळखिळे होऊन जाईल. वायव्य व ईशान्येकडील पाकिस्थानच्या सरहद्दी या स्वसंरक्षणास पुरेशा समर्थ नाहींत. हिंदुस्थानवर पूर्वी ज्या स्वाऱ्या झाल्या त्या त्याच बाजूनीं झाल्या. पाकिस्थानचें संरक्षण करण्यास बचावाकरतां आंत पसरलेला मुलुख खोल असला पाहिजे. पण पाकिस्थानची खोली पाहिली तर ती तशी नाहीं.

चवथें कारण हिंदी संस्थानांचे. या संस्थानानीं कोणत्या राज्यांत जायचे? पाकिस्थानांत कां हिंदुस्थानांत? तेव्हां तीहि अडचण विभागणीला येते.

पांचवें कारण, हें पाकिस्थान सलगहि नाहीं. वायव्य व ईशान्येकडील पाकिस्थानचे तुकडे जोडणारें जें अंतर आहे तें ७०० मैलाचें आहे. या ७०० मैलाच्या टापूंतून मुसलमानांचा वापर होऊं देणें न देणें हें सर्वस्वी हिंदुस्थानवर

अवलंबून रहाणार. शांततेच्या काळांत असो किंवा युद्धाच्या काळांत असो मुसलमानांचें पाकिस्थान हें हिंदुस्थानच्या कृपेवर आधारलेलें असणार. आणि शेवटीं या ७०० मैलाच्या टापूवरून भांडणें होऊन एक पाकिस्थान तरी संपले जाणार किंवा हिंदुस्थान तरी संपणार. हिंदुस्थानांत जर्मनी व फ्रान्स किंवा बाल्कन स्टेट्स निर्माण होणें यामुळें शक्य होईल.

या पांच कारणांचा विचार करून हिंदुस्थानांत पाकिस्थान निर्माण करणें शक्य नाहीं असा निर्णय त्रिमंध्यांनीं दिला याबद्दल हिंदु संतुष्ट झाले पण लीगहि मोठीशी नाखूष झाली आहे असें दिसत नाहीं. कारण लीगनें पाकिस्थानवर आपलें सर्वस्व पणाला लावले होते. त्याकरतां वाटेल तो त्याग करावयास त्यांची तयारी होती. २८ जुलैचा लीगचा ठराव भागयाचा आहे.

स्वातंघ्याचा व पाकिस्थानचा प्रश्न हा अशा प्रकारें निकालांत काढल्यानंतर मुसलमानांच्या भीतीचे व भावनांचे काय करावयाचे हा प्रश्न मंत्र्यांच्या पुढें आला. अखंड हिंदुस्थानांत हिंदु हे बहुसंख्य असणारच. हिंदु बहुसंख्येच्या दडपणाखालीं इस्लामी संस्कृती व इस्लाम धर्म ह्यांचा गुदमरा होऊ नये म्हणून आम्हाला त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं असें मंघ्यांचें म्हणणें. इस्लामी संस्कृती व धर्म हा सुरक्षित रहावा म्हणून कॉंग्रेसच्या योजनेचाच आधार मंघ्यांनीं घेतला. कॉंग्रेसनें ८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईस केलेल्या ठरावांत प्रांतांना शेषाधिकारासह स्वायत्तता द्यावी असें म्हटलें होते. मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत कमीत कमी खातीं ठेवली व प्रांतांना भरपूर सत्ता दिली म्हणजे मुसलमानांचें समाधान होईल असें या मंघ्यांना वाटले. म्हणून त्यांनीं परराष्ट्रीय कारभार, संरक्षण व वहातुक एवढी तीनच खातीं मध्यवर्ती म्हणून ठरविली.

पण जर प्रांतांना आर्थिक व व्यापारविषयक बाबतींत मोठ्या प्रमाणावर प्रांतांची रचना करावयाची असेल तर त्यांनीं स्वतःच्या इच्छेनें त्या त्या बाबी मध्यवर्ती सत्तेकडे सोपवाव्या अशीहि सूचना करण्यांत आली. वास्तविकपणें

पाने १२८

धर्माच्या व संस्कृतीच्या रक्षणाकरतां प्रांताकडे नाणीं, बँका, व्यापार-धंदे कशाला हवेत हेंच समजत नाहीं. पण काँग्रेसनें आणि म. गांधींनीं हे तीन व तशीच दुसरीं खातीं मध्यवर्ती सत्तेकडे सोपवलीं म्हणजे मानेल असें म्हटलें होतें. त्याचा फायदा मंत्र्यांनीं घेतला. जिनांनाहि संतुष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तेव्हां धार्मिक व सांस्कृतिक संरक्षणाच्या नांवाखालीं त्यांनीं आर्थिक व औद्योगिक बाबीहि प्रांताकडे सोपविल्या. मूलभूत हक्कांचीहि अशीच वासलात लावण्यात आली.

कांहीं प्रांतांनीं जर स्वेच्छेनें आर्थिक व औद्योगिक प्रश्नासारखे प्रश्न मध्यवर्ती सत्तेकडे सोपविले तर राज्यकारभाराच्या दृष्टीनें फार गैरसोई होतील असें ते म्हणाले. ते त्यांचें म्हणणें बरोबरहि आहे. मध्यवर्ती सत्तेंत कांहीं खातीं आवश्यक व कांहीं ऐच्छिक ठेवली तर मोठा गोंधळ होईल. कांहीं मंत्री साऱ्या हिंदुस्थानला जबाबदार रहाणार आणि ऐच्छिक बाबी सोपविलेले मंत्री कांहीं प्रांतांना जबाबदार रहाणार. तशीच आपत्ती कायदे मंडळाच्या सभासदावरहि येणार. ऐच्छिक विषयाची चर्चा सुरू झाली म्हणजे जे प्रांत त्यांत नाहींत, त्या प्रांतांतील सभासदांना गप्प तरी बसावें लागणार किंवा उठून तरी जावे लागणार. हिंदुस्थानांत सोपीव व राखीव खात्यांची कारकीर्द कांहीं वर्षें चालू होती. तिचे कटु अनुभव प्रांताना आले आहेत. त्याहिपेक्षां जास्त कटुता या कटु अनुभव विभागणीनें येणार. तेव्हां आज तरी मुसलमान मध्यवर्ती सत्तेकडे अधिक खातीं द्यावयास तयार होतील असें दिसत नाहीं.

## संस्थानें

स्वातंत्र्य व पाकिस्थानइतकाच महत्त्वाचा प्रश्न संस्थानांचा. संस्थानें ही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला खिळ घालू शकली असती. पण तें संकट टळले आहे. मंत्र्यानीं संस्थानांचा प्रश्न सोडविला नाहीं हें खरे आहे. पण त्यांनीं कांहीं गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर तो ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें राहो अगर न राहो; पण या वेळेपर्यंत संस्थानिकांचे व इंग्लंडच्या बादशहाचे जे संबंध होते ते मात्र यापुढें रहाणार नाहींत असें

मंत्र्यांनीं स्वच्छपणें बजावलें. ब्रिटनच्या राजाकडे आतां अधिराज्याचे अधिकार रहाणार नाहींत, तसेच ते हिंदुस्थानच्या नव्या स्वतंत्र राज्याकडेहि सोपविले जाणार नाहींत. मग ह्या अधिराज्याचे काय होणार? वास्तविकपणें हे अधिराज्याचे अधिकार म्हणजे काय याची कोठेहि व्याख्या केली नाहीं. संस्थानिकांनीं पुष्कळ वर्षेपर्यंत ही व्याख्या केली जावी म्हणून धडपड केली. पण त्यांचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. संस्थानाबाबत बादशहाचे अधिकार व तेहि अनिर्बंध असत. तेव्हां हिंदी स्वातंत्र्याबरोबर त्या अलिखित अधिकारांची इतिश्री व्हावयास पाहिजे होती. आणि हिंदुस्थानचें सार्वभौमत्व हे जसे हिंदी जनतेकडे देण्यांत आले तसें संस्थानांचें सार्वभौमत्व हें संस्थानी प्रजेकडे द्यावयास पाहिजे होते. त्याहिपेक्षां हिंदुस्थान हा जर एक व अविभाज्य म्हणून राखला जाणार आहे तर संस्थानांचेहि सार्वभौमत्व हे हिंदुस्थानकडेच यावयास पाहिजे होते. जर संरक्षण, वहातुक व परराष्ट्रीय कारभार हा ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचा एकच रहाणार आहे तर सार्वभौमत्व एक रहाण्यांत अडचण कोणती? कदाचित् संस्थानिक या धक्क्यानें कासावीस होतील व नवीच अडचण निर्माण होईल म्हणून हा प्रश्न अधांत्री ठेवण्यांत आला असेल. पण स्वतंत्र हिंदुस्थानला, संस्थानिकाकडून हें सार्वभौमत्व—अधिराज्य संपलेंच—एक आपल्याकडे तरी घेतले पाहिजे किंवा संस्थानी प्रजेकडे तरी दिले पाहिजे. त्याशिवाय हा प्रश्न संपला असें म्हणतां येत नाहीं.

## शिफारशी

मंत्र्यांच्या योजनेंत १५ वे कलम फार महत्त्वाचे आहे असें समजले जातें. त्या कलमान्वयें त्यांनीं हिंदुस्थानचें राज्य कसें सुस्थीर व व्यवहार्य होईल आणि सर्व पक्षांना आपल्याला न्याय मिळाला असें वाटेल याकरतां ६ शिफारसी केल्या आहेत.

( १ ) हिंदुस्थानचें एक संयुक्त राज्य असावे. संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांचा त्यांत समावेश व्हावा. या संयुक्त राज्यानें परराष्ट्रीय कारभार, संरक्षण व वहातूक या खात्यांचा कारभार करावा. या खात्याकरतां लागणारा पैसा उभारण्याची सत्ता या संयुक्त राज्याला असावी.

( २ ) संयुक्त राज्यांत एक कार्यकारी व एक कायदे मंडळ असावे. त्यांत ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी प्रतिनिधी असावेत. कायदे मंडळांत जर एखादा मोठा जातीय प्रश्न उपस्थित झाला तर निकालाकरतां त्यावर हजर असलेल्या व मतें देणाऱ्या उभय जमातींच्या प्रतिनिधींची स्वतंत्र मतें घ्यावींत, तशीच सर्व हजर असलेल्या व मतें देणाऱ्या सभासदांची एकत्र मतें घ्यावींत.

( ३ ) संयुक्त सरकारच्या कक्षेंत न येणारे शेषाधिकारासह सर्व विषय प्रांताकडे असावेत.

( ४ ) संयुक्त सरकारकडे न सोपविलेले सर्व विषय संस्थानाकडे रहावेत.

( ५ ) प्रांताना कार्यकारी व कायदेमंडळ असलेले गट निर्माण करण्याची मोकळीक आहे. त्या गटानीं प्रांताकडे कोणते समाईक विषय असावेत हे ठरवावे.

( ६ ) संयुक्त सरकारच्या व गटांच्या घटनेंत असें एक कलम असावें कीं, जर एखाद्या प्रांताला आपल्या घटनेचा पुनर्विचार करावयाचा असेल तर तसा विचार त्यांच्या कायदे मंडळाला पहिल्या दहा वर्षांनंतर आणि नंतर प्रत्येक दहा वर्षांनीं करतां यावा.

हिंदुस्थानची घटना उभयपक्षांनीं एकत्र येऊन बनवावी या हेतूनें वरील शिफारसी त्रिमंत्र्यांनीं केल्या. या शिफारसी जाहीर झाल्यावर खुलासे, प्रति खुलासे, मुलाखती, पत्रें वगैरे पुष्कळच प्रकार झालें. त्या शिफारसी मान्य करणें अगर न करणें हे उभय पक्षावर अवलंबून होते. जर दोन्ही पक्षांनीं ह्या योजनेचा स्वीकार केला नसतां तर तिघेहि मंत्री पराभूत होऊन परत गेलें असते. पण एकाच पक्षानें जर त्याला मान्यता दिली असती तर त्या पक्षाला त्यांनीं घटना परिषद भरवा व घटना तयार करा असा आदेश दिला असता.

त्रिमंत्र्यांच्या योजनेंत सर्वच प्रश्न शिफारसीवजा नाहींत. कांहीं गोष्टी बंधनकारक आहेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आणि हिंदुस्थानचें अखंडत्व

हें शिफारसवजा नाहीं. बाकीच्या बाबतींत उभयपक्ष एक झाले व त्यांनीं निराळ्या धर्तीवर आपली घटना बनवली तर त्याला ब्रिटिश सरकार हरकत घेणार नाहीं. उभय पक्षांत एकी होऊच शकत नाहीं असें पाहिल्यामुळें त्यांनीं आपल्या सूचना जाहीर केल्या. त्या शिफारशींतील कोणतें मुद्दे जिनांना कबूल नव्हते व नाहींत हें आपण स्थूल मानानें पाहूं.

जिनांना पाकिस्थान निर्माण होत नाहीं हें समजल्यानंतर मध्यवर्ती सत्ता ही जितकी दुर्बळ असेल तितकी हवी होती. त्याकरतां त्यांनीं असें सांगितलें कीं, मध्यवर्ती सत्तेचा खर्च भागवण्याकरतां त्या सत्तेला कर बसवण्याचा अधिकार देऊ नये. प्रांतांनीं मध्यवर्ती सत्तेला खंडणी द्यावी. मध्यवर्ती कायदे व कार्यकारी मंडळांत हिंदु व मुसलमानांचें प्रतिनिधी सारख्या प्रमाणांत असावेत असें त्यांचें दुसरें म्हणणें. गट बनविण्याची योजना जीनांच्या समाधाना करतांच केली होती. पण त्यांतहि त्यांना अशी दुरुस्ती हवी होती कीं, प्रांताना हिंदुस्थानच्या संयुक्त राज्यांत रहावयाचे का स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापावयाचें हेंहि ठरविण्याचा अधिकार असावा. जरी त्याना या योजनेंत पाकिस्थान मिळालें नाहीं तरी पुढें दहा वर्षांनीं पाकिस्थान मिळावे याकरतां घटनेंत तशी व्यवस्था हवी होती.

कॉंग्रेसला तर या शिफारसी फारच असमाधानकारक वाटल्या. कारण जिनांना ऐनजिनशी नाकारलेलं पाकिस्थान, अन्य रुपानें दिलें आहे अशी कॉंग्रेसची धारणा.

त्यांना युनियनच्या सत्तेत आणखी खातीं जावयास पाहिजे होती. उद्योगधंदे, व्यापार, चलन, बँका, जकात वगैरे खातीं मध्यवर्ती सत्तेत असावींत अशी कॉंग्रेसची मागणी होती. त्याचप्रमाणें मूलभूत हक्कांचा समावेश हाहि मध्यवर्ती सत्तेच्या अधिकारांत करावा असें कॉंग्रेसचें म्हणणें.

कॉंग्रेस युनियनच्या कायदेमंडळांत अगर हंगामी कार्यकारी मंडळांत समप्रतिनिधींचे तत्त्व मान्य करावयास तयार नाहीं. हंगामी सरकारांत सुद्धां जी कॉंग्रेस समप्रतिनिधीत्व मान्य करावयास तयार नाहीं ती कायम योजनेंत असला हट्ट चालू देईल हें शक्यच नाहीं.

पण सर्वांत कॉंग्रेसचा विरोध प्रांतांचें गट बनाविण्याला आहे. हिंदुस्थानांत एक प्रांताचें राज्य, दुसरें प्रांतिक गटांचें राज्य व तिसरें युनियनचे राज्य अशी तीन तीन राज्यें चालू देण्यास कॉंग्रेसचा तीव्र विरोध होता. पाकिस्थान स्थापन करण्याविरुद्ध मंत्र्यांनीं एक कारण असें दिले आहे कीं, ज्या प्रांतांत अगर जिल्ह्यांत हिंदूंचें किंवा शिखांचें बहुमत आहे ते प्रांत पाकिस्थानांत समाविष्ट करणें अन्यायाचें आहे. हें जर खरें असेल तर आसाम प्रांत हा बंगाल बरोबर कां जोडला जावा ? पश्चिम बंगाल व कलकत्ता शहर हे 'क' गटांत कां खेचले जावे ? आणि पंजाबचें १२ मुसलमानेतर जिल्हे हे पंजाबमध्यें कां अंतर्भूत केले जावेत ? गटामध्यें मुसलमानेतर बहुसंख्यांक विभाग समाविष्ट करण्यांत अन्याय होत नाहीं काय ? खरी घटना अशी बनावयास पाहिजे कीं, ज्या विभागांत हिंदु, शिख हे बहुसंख्य आहेत त्या विभागांना आपला स्वतंत्र प्रांत बनविण्यास परवानगी द्यावयास हवी. तशी परवानगी दिल्यानंतर ज्या प्रांतांना आपलें प्रांत मोठे करावयाचें असतील त्यांनीं ते मोठे करावेत असें ठरवावयास पाहिजे. पूर्व बंगाल व सिल्हेट यांचा एक प्रांत, पश्चिम बंगालचा दुसरा प्रांत, पंजाबच्या १२ जिल्ह्यांचा स्वतंत्र प्रांत, अशी प्रांतांची पुनर्घटना करणें जरुर आहे. भाषावार प्रांत रचना जशी करावयाची आहे, तशी जातीवार प्रांतरचना जिनांना हवी असेल तर होऊ द्यावी. तशी प्रांतरचना घटना परिषदेला करतां येणार नाहीं असें नाहीं. पण त्रिमंत्री योजनेप्रमाणें 'ब' व 'क' गटांच्या संयुक्त सभेपुढें हा प्रश्न येईल तेव्हां नव्या प्रांतरचनेला कितपत मान मिळेल हा प्रश्नच आहे.

आज असें ठरलें आहे. 'अ', 'ब' व 'क' गटांचें प्रतिनिधी आपापल्या गटांत बसतील. तेथें गटाची एक घटना असावी कां नाहीं हे ठरवतील. एक घटना नको असें ठरले तर प्रांत स्वतंत्र होतील. पण जर गटांची एक घटना करावी असें बहुमतानें ठरलें तर कोणत्याहि वैयक्तिक प्रांताला आपण त्या गटापासून अलग होऊ इच्छितो असें सांगावयाचा अधिकार नाहीं. घटना परिषदेनें घटना तयार केली, पार्लमेंटनें ती मान्य केली आणि नव्या घटने-प्रमाणें निवडणुका झाल्या म्हणजे कोणताहि प्रांत आपल्या कायदेमंडळापुढें

गटांतून फुटण्याचा ठराव आणू शकेल व तो पास झाल्यास गटाबाहेर पडू शकेल. पण एका गटांतून बाहेर पडलेल्या प्रांताला दुसऱ्या गटांत जावयास काय केलें पाहिजे याची मात्र तरतूद या योजनेंत नाहीं.

आसाम हा जसा बहुसंख्य हिंदूंचा प्रांत आहे, तसाच सरहद्द प्रांत हा कॉंग्रेसचा आहे. सरहद्द प्रांताला आपल्या इच्छेविरुद्ध व गटांत कोंबून घ्यावे लागेल. त्यांची सुटका नवा कायदा पास होईपर्यंत होणार नाहीं.

आसाम प्रांत, सरहद्द प्रांत व शिख यांच्यावर या गटाच्या राज्यानें अत्यंत अन्याय झाला आहे. मंत्र्यांना हा अन्याय कळत नाहीं असें नाहीं. त्यांनीं तो अन्याय जाणूनबुजून जिनांना खुष करण्याकरतां केला आहे. पाकिस्थान नाहीं तर नाहीं; पण निदान मुस्लीम प्राधान्याचें दोन गट जिनांना देऊन ते संतुष्ट होतात कां नाहीं हें पहाण्याचा प्रयत्न मंत्र्यांनीं केला व त्यांत ते तेव्हां तरी यशस्वी झालें.

कॉंग्रेसनें याबाबतींत जरी नापसंती दर्शवली असली तरी त्या गटाच्या बाबतींतला मंत्र्यांचा अर्थ मान्य केला. ( ता. १६ जून १९४६ चे मौ. आझादांचें व्हाइसरॉयना पत्र पहा ) व्हाइसरॉय व त्रिमंत्री यांचें म्हणणें अर्थात् एकच आहे. प्रथम प्रांतांनीं एकेका गटांत बसावें, गटांची घटना करावयाची का नाहीं हें ठरवावें, घटना ठरली, ती मंजुर झाली व त्या घटनेप्रमाणें निवडणूका झाल्या म्हणजे प्रत्येक प्रांत आपआपल्या कायदे मंडळाच्या बहुमतानें गटांत रहावयाचें कां नाहीं हा निर्णय घेऊ शकेल. कॉंग्रेसला गटांतील प्रत्येक प्रांताला गटाची एक घटना असावी कां नाहीं हें ठरविण्याचा अधिकार प्रारंभीच असावयास हवा होता. आपण अशी कल्पना करूं कीं, गटानें आपल्या गटांत येणाऱ्या प्रांताकरतां एक घटना ठरविली व पुढें नव्या निवडणूका झाल्यावर प्रांत त्यांतून बाहेर पडले तर मग हा सारा गटांच्या

I note what you say about grouping. We abide by your interpretation of it—Azad.

घटनांचा खटाटोप व्यर्थच गेला असें होईल. जातीय प्रश्नाच्या बाबतींत ज्याप्रमाणें हिंदूंचें स्वतंत्र मत, मुसलमानांचें स्वतंत्र मत आणि हिंदु-मुसलमानांचें एकत्र मत घेण्याची व्यवस्था मंत्री योजनेंत केली आहे तशी व्यवस्था ह्या गटाच्या बाबतींत केली असती तर न्याय्य झालें असतें. मुसलमानांच्या बाबतींत जी ही संरक्षणपर योजना केली आहे, तशीच प्रांतांच्या बाबतींत केली असती तर मुसलमानेतरावर अन्याय झाला नसता. तथापि काँग्रेसनें हा अन्याय सहन करण्याचें कबूल केलें आहे.

या गटाना तितकेसें भिण्याचेहि कारण नाहीं. नवी घटना तयार होऊन प्रांताना गटांतून फुटण्याचा अधिकार प्राप्त होईपर्यंत ब्रिटिश मंत्र्यांच्या सद्धेतूचें पण अन्यायाचें प्रदर्शन जगाला पहावयास मिळेल. बॅ. जिनासारख्या बुद्धिमान गृहस्थानें ही उघडउघड निष्फल होणारी सवलत कां पत्करावी हेंच समजत नाहीं. पण ब्रिटिश जसे जिनांना खुष करूं इच्छितात, तसे जिना आपल्या अनुयायांना 'मी बिजरुपाचें पाकिस्थान मिळविलें' असें दाखवू इच्छित असावेंत.

सर स्टॅफर्ड क्रिप्स म्हणतात कीं, प्रांतांना गटांतून फुटण्याचा अधिकार प्रारंभींच दिला असता तर तें न्यायाचें झालें नसतें. कारण हल्लींच्या प्रांतांच्या निवडणूका ह्या प्रौढ मतदानानें झालेल्या नाहींत. शिवाय कांहीं प्रांतांना जातीय निवाड्यानें लोकसंख्येपेक्षां अधिक जागा मिळालेल्या आहेत. तेव्हां आम्ही प्रारंभींच ही सवलत दिली असती तर आमच्यावर टीका झाली असती. नव्या घटनेप्रमाणें भविष्यकाळांत ज्या प्रांताच्या निवडणूका होतील त्यांत प्रौढ मतदान येईल व त्या मतदानानें निवडून आलेले प्रतिनिधी जो निर्णय घेतील तो जास्त प्रातिनिधीक समजला जाईल. या करतां आम्ही पुढें फुटून निघण्याची सवलत ठेवली. ही सबब मार्मिक आहे पण बरोबर नाहीं.

काँग्रेसनें या गटांना स्वतःच विरोध लावले पाहिजे. त्यांनीं 'अ' गटाची घटना तयारच करतां कामा नये. प्रत्येक प्रांताला स्वतःची स्वतंत्र घटना तयार करून देणें हेच 'ब' व 'क' गटांच्या प्रतिनिधींना आपली संयुक्त घटना तयार करूं न देण्यास योग्य उत्तर होईल. पण जर 'अ' गटानें आपली

घटना केली तर 'ब' व 'क' गटाला हंसण्याचें कारण नाहीं. तशी चूक कॉंग्रेस करणार नाहीं. प्रत्यक्ष काय होईल हें आपण पाहूं. कॉंग्रेसनें युरोपियनांना मताचा किंवा प्रतिनिधी म्हणून उभें राहण्याचा हक्क नाहीं असें कायदेशीर-रीत्या पटविल्यामुळें व युरोपिअनांनीं घटनापरिषदेपासून पूर्णपणें अलिप्त राहण्याचें ठरविल्यामुळें 'क' गटाचें भवितव्य अनिश्चित आहे. बंगालमध्यें मुसलमानेतरांना २७ जागा घटनापरिषदेंत आहेत. एकूण मुसलमानेतर सभासद तेथील कायदे मंडळांत १३१ आहेत. १३१ सभासदांनीं २७ जागा भरावयाच्या म्हणजे ५ सभासदांमागें एक जागा होते. या १३१ सभासदांत २५ युरोपिअन्स आहेत. त्यांनीं जर मतदान केलें असतें अगर ते उभे राहिले असते तर पांच जागा त्यांना किंवा त्यांच्या हस्तकांना मिळाल्या असत्या. पण आतां २७ पैकीं २५ जागा कॉंग्रेसला मिळाल्या. आसामध्यें ९ युरोपिअन्स कायदे मंडळांत आहेत. त्यांनींहि एक जागा मिळवली असती. कारण आसाममध्यें ८ जागांना घटनापरिषदेकरितां एक प्रतिनिधी पडतो. अशा प्रकारें म. गांधी व कॉंग्रेस यांनीं युरोपिअनांना मताधिकार बजावण्या-पासून परावृत्त केल्यामुळें ६ जागा हस्तगत केल्या. या ६ युरोपिअन्सनीं त्रिमंत्री योजनेला उचलून धरण्याकरितां गटांची संयुक्त घटना असावी असेंच म्हटलें असतें.

या बंगाल-आसाम गटांत हिंदु व मुसलमानांचे ३४ व ३६ प्रतिनिधी निवडून यावयाचे आहेत. त्या निवडणूकांचे जे निकाल लागले आहेत त्या-वरून गट बनवावा या पक्षाचे व गट बनवूं नये या पक्षाचे जवळजवळ सारखे प्रतिनिधी निवडून आले आहेत. तेथें गट बनणें न बनणें हें आतां कोणत्या पक्षाचा अध्यक्ष होतो यावर अवलंबून आहे. लीगचा अध्यक्ष झाला तर लीगचे ३४ प्रतिनिधी होतील व कॉंग्रेसचे ३५ होतील. कॉंग्रेसचा झाला तर लीग विजयी होईल. याशिवाय डॉ. आंबेडकर कोणतें धोरण ठरविणार हें निश्चित नाहीं, कारण ते तेथें निवडून आले आहेत. पण कॉंग्रेसनें युरोपिअन्सच्या बाबतींत योग्य आक्षेप घेऊन गट न बनविण्याची शक्यता निर्माण केली आहे एवढें खरें. का. अ. जिना यांनीं युरोपिअन्स जर

गळले जात असतील तर मुसलमानांना अधिक जागा द्या असें म्हणून पाहिले. पण त्यांचें म्हणणें सयुक्तिक नव्हतें. कारण १० लाखाला एक या प्रमाणांत मुसलमानांना जागा मिळाल्याच होत्या. तेव्हां जिनांचा हा आक्षेप विचारांत घेतला गेला नाहीं.

'ब' गटांत मात्र गटांची घटना न बनण्याची शक्यता नाहीं. तेथें २२ मुसलमान जागा, ४ शिख जागा व ९ सर्वसाधारण जागा आहेत. २२ मुसलमान जागांपैकीं सरहद्द प्रांतांत २ जागा कॉंग्रेसला मिळाल्या आहेत व एक जागा पंजाबांत युनिअॅनिस्टाला मिळाली आहे. बलुचिस्थानची जागा स्वतंत्र गृहस्थाला मिळाली आहे. शिखांचा बहिष्कार असल्यामुळें त्या ४ जागा रिकाम्याच राहतील. पण कांहीं झालें तरी या गटांतील ३६ जागांपैकीं, निम्म्या जागा गटविरोधी मताला मिळणें शक्य नाहीं.

शेवटची घटना तयार झाल्यावर सरहद्द प्रांत 'ब' गटांतून फुटेल असें वाटतें. तसें झाल्यास जिनांचें पाकिस्थानचें स्वप्न विरेल व शेवटीं पाकिस्थान म्हणजे पंजाब व सिंधचा मोठा प्रान्त एवढेंच शिल्लक उरेल. या सर्व गोष्टींचा विचार करूनच कॉंग्रेसनें या गटाच्या राजकारणाला जास्त विरोध करावयाचा नाहीं असें ठरविलें असावें.

## घटनापरिषदेचे प्रतिनिधी

वर उल्लेखिलेल्या सहा कलमी योजनेनंतर ही योजना अंमलात आणण्याकरतां कांहीं तरी यंत्र उभारणें जरूर होतें. त्याकरतां घटनापरिषदेचा जन्म झाला. पण या परिषदेंत सभासद किती घ्यावयाचे, कसे घ्यायचे वगैरे प्रश्न मंत्र्यापुढें होते. प्रथम त्यांनीं सर्व कायदे मंडळांत जे सभासद असतील त्यांच्या एकदशांश सभासद घ्यावेत असें ठरविलें. पण ती संख्या फार लहान होते असें कॉंग्रेसचें म्हणणें. एकंदर हिंदी कायदे मंडळाचे सभासद १५८५ आहेत. त्याच्या दशांश घ्यायचें म्हणजे १५९ सभासद झाले असते. तेव्हा मंत्र्यांनी हिंदुस्थानांतील लोकसंख्येवर ही घटनापरिषदेच्या प्रतिनिधींची

संख्या आधारली. १० लाखाला एक सभासद हें प्रमाण त्यांनीं ठरविलें.

तें प्रमाण सर्वांना मान्य झालें. त्यांतील युक्तीवाद पटण्यासारखा आहे. प्रत्येक कायदे मंडळाला जे सभासद ठरवून दिले आहेत ते लोकसंख्येच्या प्रमाणांत ठरविलें नाहींत. आसामची लोकसंख्या १ कोट आहे पण त्याला १०८ सभासद दिले आहेत. बंगालची ६ कोटी लोकसंख्या आहे पण बंगालला ६०० सभासद दिले नसून फक्त २५० च दिले आहेत. जातीय निवाड्यामुळें कांहीं प्रांतांना अधिक व कांहीं प्रांताना कमी जागा मिळाल्या आहेत हें दुसरेंहि कारण आहे. मुंबईत मुसलमानांची लोकसंख्या २० लाख आहे; पण त्यांना १० जागा जास्त म्हणजे ३० जागा दिल्या आहेत. बंगालमध्यें मुसलमान ५५ टक्के आहेत, पण त्यांना ४८ टक्केच जागा दिल्या आहेत. जातीय निवाडयामुळें निर्माण झालेली विषमता दूर करण्याकरतां लोकसंख्येच्या प्रमाणांत घटनापरिषदेच्या सभासदांची वाटणी केल्यामुळें हिंदुंना किंवा मुसलमाना तक्रारीला जागा राहिली नाहीं. वास्तविक जिनांनीं बंगालमधील अन्याय दूर करा पण इतर प्रांतांतील अन्याय राहूं द्या असें म्हणावयास हवें होतें. पण त्याचें म्हणणें टिकलें नसतें.

वरवर विचार करतां ही विभागणी न्यायाची झाली असें वाटतें. पण खोल विचार केला असतां तींत अन्याय दूर होत नाहीं. सध्याच्या कायदेमंडळांत ख्रिश्चन, जमीनदार, अस्पृश्य, स्त्रिया, अँग्लो इंडियन्स, मजूर वगैरेंना ज्या जागा मिळाल्या आहेत त्या लोकसंख्येवर तर नाहींतच नाहीं किंवा जातीय निवाड्याच्या तत्त्वावरहि नाहींत. सर्वांना प्रतिनिधित्व द्यावें म्हणून ती एक व्यवस्था आहे. पण काँग्रेसच्या पोटांत हे सारे पक्ष कमी अधिक प्रमाणांत समाविष्ट होत असल्यामुळें काँग्रेसनें तक्रार केली नाहीं. एरवीं स्त्रियांना अधिक प्रतिनिधित्व मिळावयास नको होतें कां? इतर वर्गांबद्दल असेंच म्हणतां येईल. पण घटनापरिषदेचा प्रश्न हा थोड्या दिवसांचा असल्यामुळें त्याबद्दल कोणीं तक्रार केली नाहीं.

त्रिमंत्र्यांनीं लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधी निवडण्याचें जें तत्त्व

ठरविलें आहे तेंच तत्त्व घटनापरिषदेनें पुढें निश्चित केलें पाहिजे. मुसलमान, हिंदु वगैरेंना लोकसंख्येच्या प्रमाणांतच यापुढें प्रतिनिधित्व द्यावें.

त्रिमंत्र्यांनीं मुसलमान, शिख व सर्वसाधारण असें तीनच वर्ग मान्य केले आहेत. इतर अल्पसंख्यांकांना या योजनेंत पुरेशा जागा मिळणार नाहींत म्हणूनच त्यांच्या करतां एक निराळीच व्यवस्था केली आहे. या अल्प-संख्यांकांचे एक सल्लागार मंडळ नेमलें जाणार आहे. या मंडळानें नागरिकांचे अल्पसंख्याकांचे, वन्यजातींचे व वगळलेल्या प्रदेशांतील लोकांचे हक्क काय असावेत हें ठरवावें. तो अहवाल त्यांनीं संयुक्त घटना परिषदेला सादर करावा. त्यांत मूलभूत हक्क, अल्प संख्याकांच्या संरक्षणाची तरतूद, आणि उपरोक्त वन्य व वगळलेल्या प्रदेशांतील लोकांवरील राज्यकारभार कसा चालवावा हें नमूद करावें. तसेच हे हक्क गटाच्या घटनेंत समाविष्ट करावेत कां संयुक्त राज्याच्या घटनेंत समाविष्ट करावेत याचाहि उल्लेख करावा.

अ विभागांत मद्रास, मुंबई, संयुक्तप्रांत, बिहार, मध्यप्रांत व ओरिसा हे सहा प्रांत येतात. त्यांत मुसलमानाना २० जागा व मुसलमानेतरांना १६७ जागा दिल्या आहेत. याशिवाय दिल्ली, अजमीरमेरवाड आणि कूर्ग ह्या कमिशनच्या ताब्यांतील प्रांताना प्रत्येकी एकेक जागा दिली आहे. दिल्ली व अजमीर मेरवाडा यांचा घटनापरिषदेंतील प्रतिनिधी हा स्वतंत्रपणें न निवडतां मध्यवर्ती कायदेमंडळाचा जो सभासद आहे तोच या प्रांताचा प्रतिनिधी म्हणून जाईल. कूर्गमध्यें जे कायदेकौंसिल आहे ते आपला प्रतिनिधी पाठवील अशी कूर्गची व्यवस्था केली आहे. अशाप्रकारें 'अ' विभागांत १७० सर्वसाधारण व २० मुसलमान प्रतिनिधी होतात.

ब विभागांतून ९ सर्वसाधारण, ४ शिख व २२ मुसलमान पाठवा-वयाचे ठरलें. शिवाय बलुचिस्थानचा एक प्रतिनिधी याच विभागांत समाविष्ट केला आहे. म्हणजे २३ मुसलमान, ४ शिख व ९ सर्वसाधारण प्रतिनिधी 'ब' विभागाला दिले आहेत.

क विभागांत ३६ मुसलमान व ३४ सर्वसाधारण प्रतिनिधी आहेत.

त्यांत आसामचे ७ सर्वसाधारण व ३ मुस्लीम प्रतिनिधी आहेत. बंगालला २७ व ३३ जागा आहेत.

आतां संस्थानांचा प्रश्न उरतो. सर्व संस्थानाना मिळून ९३ जागा दिल्या आहेत व त्या १० लाखाला एक ह्या प्रमाणांतच दिल्या आहेत. ह्या जागा कशा भरावयाच्या हें ठरलें नाहीं. पण त्यांनीं त्याकरतां वाटाघाट करणारें मंडळ स्थापावयाचें आहे. हें वाटाघाट मंडळ पहिल्या घटनापरिषदेला संस्थानामार्फत उपस्थित राहील. संस्थानांचा प्रश्न हा मागाहून येणार असल्यामुळें त्यांच्या निवडणुका मागाहून केल्या तरी चालतील.

घटनापरिषदेच्या पहिल्या बैठकींत अध्यक्षाची व इतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक होईल व अल्पसंख्य वगैरेच्या प्रश्नाकरतां सल्लागार मंडळ स्थापन केलें जाईल. नंतर प्रतिनिधी अ ब व क गटामध्यें विभागून बसतील. हे गट आपल्याला संयुक्त घटना हवी कां नाहीं हें ठरवतील आणि तशी घटना असावी असें ठरल्यास कोणते विषय त्यांत असावेत याचा निर्णय घेतील. गटांतून फुटण्याचा अधिकार हा प्रांतांना यावेळीं मिळणार नाहीं, तो नव्या घटनेच्या पहिल्या निवडणुकानंतर मिळणार आहे.

हें प्रांतांचें राजकारण समाप्त झाल्यावर संयुक्त राज्यघटनेला सुरवात होईल. त्याकरतां तीनहि गटाचे आणि संस्थानाचे प्रतिनिधी एकत्र बसतील व संयुक्त हिंदुस्थानची घटना बनवतील.

त्रिमंत्र्यांनीं वर ज्या ६ कलमी शिफारसी केल्या आहेत, त्या जर बदलावयाच्या असतील अगर एखादा मोठा जातीय प्रश्न विचारांत घ्यायचा असेल, तर त्याला हजर व मतें देणाऱ्या हिंदु व मुसलमान सभासदांचें पृथक बहुमत असावे लागेल.

पण एखादा प्रश्न जातीय आहे कां नाहीं तसाच तो महत्वाचा आहे कां नाहीं हें कोण ठरवणार ? घटनापरिषदेच्या अध्यक्षाचा तो अधिकार आहे, पण जर हिंदु किंवा मुसलमान जातीपैकीं एका जातीच्या बहुसंख्येनें हा प्रश्न फेडरल कोर्टाच्या सल्ल्याकरितां पाठवावा असें म्हटलें तर अध्यक्षानें फेडरल कोर्टाचा

सल्ला घ्यावा. पण हा सल्ला सल्ल्याच्या स्वरुपाचा असल्यामुळें तो अध्यक्षानें मानलाच पाहिजे असें नाहीं. अर्थात योजनेंत सल्ला मानावा कां मानू नये याबद्दल स्पष्ट अनुज्ञा नाहीं. त्यांत फक्त एवढेंच म्हटलें आहे कीं, अध्यक्षानें निर्णय देण्यापूर्वी फेडरल कोर्टाचा सल्ला तशी विनंती त्या परिस्थितींत केल्यास घ्यावा.

व्हाईसरॉयनें जसा घटनापरिषदेच्या निवडणुका लवकर कराव्या असा आदेश प्रांताना द्यावयाचा आहे, तसा संस्थानाना वाटाघाटींची कमिटी नेमा असा आदेश द्यावयाचा आहे. संक्रमणाचा काळ लवकर संपावा म्हणून तांतडीनें सर्व गोष्टी व्हाव्यात अशी त्रिमंत्र्यांची इच्छा.

घटनापरिषदेचें कार्य समाप्त झाल्यावर हींच घटनापरिषद ब्रिटिश सरकार बरोबर तह करील. सत्ता संक्रमणामुळें जी सत्ता हिंदुस्थानकडे जाईल त्यासंबंधींच हा तह होईल. हा तह झाल्यावर ब्रिटिश पार्लमेंट अल्पसंख्याकांना पुरेसे संरक्षण मिळाले आहे कां नाहीं हे ठरवील आणि नंतर हिंदुस्थानच्या घटनेला मान्यता देईल. ही मान्यता मिळाल्यावर हिंदुस्थान स्वतंत्र होईल व हिंदुस्थानांतून ब्रिटिश सैन्य, ब्रिटिश अधिकारी निघून जातील. अशाप्रकारें सत्ता संक्रमणाचें हें यंत्र व ही पद्धती ठरविण्यांत आली आहे.

शेवटीं एकच प्रश्न उरला. तो म्हणजे व्हाईसरॉयच्या तात्पुरत्या कार्यकारी मंडळाचा. १९४५ सालीं व्हाईसरॉयनीं सिमला येथें जो प्रयत्न केला होता तो समप्रतिनिधीत्वाच्या खडकावर फुटला होता. पण दिल्लीला पुनः त्याच भूमिकेवरून हा प्रश्न हाताळण्यांत आला. त्याला कारण एकच आहे. जिना असें धरून चालले आहेत कीं, मुसलमान हें स्वतंत्र राष्ट्र आहे. पण पाकिस्थान अमान्य केल्यानंतर मुसलमानाना समप्रतिनिधीत्व कां द्यावें हें कळत नाहीं. १९४५ सालीं युद्ध होतें व पाकिस्थानचा प्रश्न निकालांत निघाला नव्हता. त्यावेळीं हिंदु व मुसलमान किंवा कॉंग्रेस व लीग किंवा सवर्ण हिंदु आणि मुसलमान यांचे प्रतिनिधी सारख्या प्रमाणांत घ्यावेत हें कळू शकत होते. युद्धांत ब्रिटिशांना साऱ्यांचीच मदत हवी होती. पण १९४६ सालीं युद्ध व पाकिस्थान

या दोहोंचाहि निकाल लागला होता. तेव्हां समप्रतिनिधीत्वाचा हा हट्ट काय म्हणून ? तडजोडीकरतां कशा विचित्र गोष्टी जमून येतात हें खरोखर पहाण्यासारखें आहे. प्रांतिक कायदेमंडळांत ज्या जागांची वाटणी केली आहे तींत कांहीं जमातींना त्या रुष्ट नयेत म्हणून जादा जागा दिल्या. घटनापरिषदेंत लोकसंख्येचें प्रमाण मानलें आणि हंगामी सरकारांत समप्रतिनिधित्व कबूल केलें. या साऱ्या प्रकारांत कोठें राजकारण शास्त्राची दृष्टी आहे का ? ज्यावेळीं जें जमेल तें करावयाचें व रुष्ट पक्षाला संतुष्ट करावयाचें एवढाच त्यांत हेतू आहे. अशानें राजकारणाचा विचका होतो व तसा विचका हिंदी राजकारणाचा आजवर ब्रिटिशांनीं केला.

हंगामी सरकारच्या घडणीला व्हाईसरॉयनीं १२ सभासदापासून सुरवात केली. ५ हिंदु, ५ मुसलमान व २ अल्पसंख्य. कॉंग्रेसनें १५ जागांचा हट्ट धरला. तेव्हां व्हाईसरॉय १३ जागावर आले. ५ हिंदु, ५ मुसलमान, १ अस्पृश्य, १ शिख व १ ख्रिश्चन त्यांत समप्रतिनिधीत्व सोडलें असें व्हाईसरॉयचें म्हणणें. कारण अस्पृश्य जो यावयाचा तो कॉंग्रेसचाच येणार. तेव्हां कॉंग्रेस व लीग यांचें ६ व ५ असें सभासद झाले. हिंदु व मुसलमान म्हटले तरी ६ व ५ असें प्रमाण पडत होते. पण कॉंग्रेसच्या आग्रहानें १३ जागाच्या १४ जागा व्हाईसरॉयनें केल्या व १४ वी जागा पारशाला द्यावयाची असें ठरविलें. पण जो पारशी घेतला तो सरकारी माणूस निघाला व कॉंग्रेसनें त्याला हरकत घेतली. त्या जागेकरतांच जर हंगामी सरकार मोडलें असते तर व्हाईसरॉयनीं त्याच्या जागीं दुसरा गृहस्थ घेतला असता. असें सांगतात कॉंग्रेसनें हंगामी सरकारांत जावयाचें ठरविलेंहि होतें. कॉंग्रेसनें, कॉंग्रेसच्या मुसलमानाबद्दलचा हट्टहि सोडला होता. पण जिनांनीं व्हाईसरॉयना १८ जूनला एक पत्र पाठविले व त्या पत्रांत 'जर कॉंग्रेसनें लीगेतर मुसलमानाला आपल्या यादींत समाविष्ट केले तर लीग त्याला तीव्र विरोध करील असें म्हटलें.' हें जिनांचें पत्र प्रसिद्ध झालें नसतें तर कॉंग्रेस राष्ट्रीय मुसलमानाचा हट्ट सोडून हंगामी सरकारांत गेली असती. व्हाईसरॉयना सुद्धां जिनांचें म्हणणें मान्य होते. कारण त्यांनीं असा राष्ट्रीय मुसलमान घेता येणार नाहीं असें मौलानाना कळविले. हें कॉंग्रेसला

विचित्र वाटले. कारण ज्यावेळीं काँग्रेसनें सरहद्द प्रांतांत अयशस्वी झालेल्या अबदुल रब निस्तारच्या नांवाला हरकत घेतली तेव्हां व्हाईसरॉय म्हणाले तुम्हांला लीगच्या नांवाला हरकत घेणार नाहीं. पण जिना काँग्रेसच्या नांवाना —राष्ट्रीय मुसलमानाला हरकत घेऊ शकतात व शकले आणि व्हाईसरॉयनीं ती हरकत उचलून धरली. त्यामुळें हंगामी सरकारची योजना फिसकटली.

सिमल्याची १९४५ ची बोलणी युनियनिस्ट पक्षाच्या मुसलमानाकरतां मोडली आणि १९४६ ची दिल्लीची बोलणी राष्ट्रीय मुसलमानाकरतां मोडली. जिनांचा या नांवांना इतका विरोध कां ? त्यांचा पहिल्यापासून असा दावा होता व आहे कीं, लीगशिवाय अन्य कोणीहि मुसलमान, मुसलमान समाजाचे प्रतिनिधी होऊ शकत नाहींत. दुसरा प्रतिनिधी मान्य करणें म्हणजे लीगच्या एकमेव हक्काला हरताळ फासणें आहे. त्यांनीं निवडणूकींत हा आपला दावा सिद्ध केला होता हें खरें आहे. त्यांना जवळजवळ ९० टक्के जागा प्रांतिक निवडणुकींत मिळाल्या होत्या आणि ७५ टक्के मतदान त्यांच्या बाजूचे होते. तेव्हां जिना जर त्या आधारावर आपला हक्क मांडीत असले तर तें चूक कसे ? याच्या उलट काँग्रेसची स्थिती. काँग्रेस ही राष्ट्रीयत्वावर हक्क सांगणारी संस्था. काँग्रेसला सरहद्द प्रांताशिवाय मुसलमान जागा सर करतां आल्या नसल्या तरी आपलें राष्ट्रीयत्व काँग्रेस तेवढ्यामुळें सोडून देऊ शकत नव्हती. शिवाय काँग्रेस लीगच्या वाट्याला आलेल्या जागापैकीं, जागा मागत नव्हती. ती आपल्याच जागेपैकींच एक जागा राष्ट्रीय मुसलमानाला देऊ इच्छित होती. काँग्रेसनें लीगच्या ५ जागापैकीं एक जागा आम्हाला द्या असें म्हटलें असते तर लीगनें निवडणूकांचा निकाल काँग्रेसच्या तोंडावर टाकला असता. पण तसें काँग्रेसनें केलें नाहीं त्यामुळें काँग्रेसला दोष देणें हें चूक आहे.

पण प्रश्न असा आहे कीं, जी काँग्रेस १८ जून रोजीं हंगामी सरकारांत जाण्याचा निर्णय घेते, तीच काँग्रेस जिनांच्या पत्रामुळें इतकी बिथरते, हें काय ? जिनांची वृत्ति काँग्रेसला ठाऊक नव्हती असें नाहीं.

१९४५ च्या सिमल्याच्या परिषदेनंतर जिनांची वृत्ती बदलण्यास कोणतेंहि कारण झालें नव्हतें. उलट निवडणुकांतील यशामुळें जिना अधिकच बलिष्ट

झाले होते. अशा स्थितींत जिनांच्या पत्रामुळें काँग्रेसनें निकाल बदलावयास नको होता. तो निर्णय अगोदरच घेतला असता तर हरकत नव्हती. पण जिनांच्या पत्राबरोबर ता. २२ जूनचे व्हाईसरॉयचें पत्र आले व त्या पत्रांतहि त्यांनीं जीनांना उचलून धरले म्हणून काँग्रेसला निकाल बदलणें भाग पडलें असावें.

हंगामी योजना न स्वीकारण्यास आणखी एक कारण झालें. त्या योजनेंत व्हाईसरॉय असें कबूल करून बसलें कीं, कार्यकारी मंडळांत जर एखादा महत्त्वाचा जातीय प्रश्न आला तर तो एकंदर बहुमतानें निकालांत निघणार नाहीं. दोन्ही जातींचें जर बहुमत झाले तरच तो मान्य होईल. याचा अर्थ व्हाईसरॉयच्या हातीं जी व्हेटोची सत्ता होती ती लीगच्या हातीं गेली. काँग्रेसनें दोन्ही जमातींचें बहुमत हें दीर्घकालीन योजनेकरतां स्वीकारलें होतें. अल्पकालीन योजनेकरतां स्वीकारलें नव्हते.

हंगामी योजना जर एखादा पक्ष स्वीकारीत असेल तर ती आम्ही अंमलांत आणूं, असें व्हाईसरॉयचें १६ जूनचें पत्रक होते. त्या पत्रकाप्रमाणें लीग व काँग्रेसेतरांचें हंगामी सरकार व्हाईसरॉयनीं स्थापावयास पाहिजे असें जिनांचें म्हणणें. ता. १८ व नंतरचीं जीं पत्रकें जिनांनीं गर्दीगर्दीनें प्रसिद्धीला दिलीं त्या पत्रकांचा हेतु काँग्रेसला डिवचावें व ती हंगामी सरकारांत येऊ नये असा कशावरून नसेल? पण जिनांचें हें कारस्थान असलेंच तर तें यशस्वी झालें नाहीं. जिनांनीं सरकारवर वचनभंगाचा आरोप केला. पण सरकारनें असें उत्तर दिले कीं, आम्ही हंगामी योजना टाकून दिली नाहीं. कांहीं काळ विश्रांति घेऊन आम्ही पुन: प्रयत्न करणार आहों. हें उत्तर हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें योग्य असले तरी ता. १६ जूनच्या घोषणेला धरून नव्हते. त्यांत वकिली होती. काँग्रेसशिवाय हंगामी सरकार कसें चालणार? जिनांची त्यामुळें भयंकर निराशा झाली व त्यांचें सर्व डाव फसले.

जिनानीं आपल्या कार्यकारी मंडळाचा व लीग कौन्सिलचा सल्ला घेऊन हंगामी सरकार व दीर्घकालीन योजना यांत भाग घ्यावयाचा नाहीं असें आतां

ठरविलें. पण त्यांनीं भाग घेतला नाहीं तरी घटना परिषद भरेल व ती घटना तयार करील. यामुळेंच जिना घटनापरिषदेपासून अलिप्त रहातील असें वाटत नाहीं. अशाप्रकारें त्रिमंत्री योजनेचें स्वरूप आहे, त्यांत कोणी काय मिळवले व कोणीं काय गमविलें हें आपण पाहूं. या घडामोडींतलें पहिले हिस्सेदार ब्रिटिश. हिंदुस्थानकडे स्वातंत्र्य देण्याची त्यांची इच्छा या खेपेला तरी खरीखुरी दिसतें. फक्त आतां शेवटीं तहाच्या वेळेला ते काय खेंगटी काढतात तें पहावयाचें आहे. कारण घटनापरिषदेचें ठराव अंमलांत आणणें हे दोन गोष्टींवर त्यांनीं अवलंबून ठेवलें आहे. एक ब्रिटिशांबरोबरचा समाधानकारक तह व दुसरे अल्प-संख्याकांच्या हक्कांचें संरक्षण. लीगची पाकिस्तानची मागणी कितपत खरी होती हें ठाऊक नाहीं. पण ती मागणी उधळली गेली हें खरें आहे. जिना जर पाकिस्थानबद्दल खरोखरच सर्वस्व पणाला लावायला तयार असते तर ते स्वस्थ बसले नसते. पण त्यांनीं गटांत पाकिस्थानची बीजें आहेत यावरच समाधान मानले. त्यांचा आजचा सर्वच योजना नाकारण्याचा पवित्रा हा निव्वळ त्रागा आहे. तिसरी त्यांची आशा हंगामी कार्यकारी मंडळांत समप्रतिनिधीत्व मिळावे अशी होती. तीहि मान्य झाली नाहीं. आतां फक्त लीगशिवाय दुसरा कोणीहि मुसलमान मुसलमानांचें प्रतिनिधीत्व करूं शकत नाहीं हा त्यांचा एकच मुद्दा राहिला आहे. त्याचाहि निकाल लवकरच लागेल.

घटनापरिषदेंत जिना आले तर आपल्याबरोबर पुष्कळच विघ्नें आणणार आहेत. गटापासून तो संयुक्त सरकारच्या घटनेपर्यंत वेळोवेळीं ते अडचणी निर्माण करतील. पण घटनापरिषदेंत आतां तिसरी कोणतीहि सत्ता नसल्यामुळें त्यांचें चालणार नाहीं.

कॉंग्रेसच्या दृष्टीनें विचार केला तर कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी मान्य करण्यांत आली आहे. पाकिस्तान हें अमान्य करण्यांत आलें आहे. गटांचें भय हें अवास्तव आहे. संस्थानिकांचा प्रश्न हा वाटाघाटींत सुटूं शकेल. मात्र समाज-सत्तावाद्यांचें त्यांत समाधान होत नाहीं. कारण समाजवाद्यांना सत्ता बळकावयाची आहे. तिचें संक्रमण त्यांना मान्य नाहीं. म्हणून समाज-वाद्यांना हा युक्तिवाद मान्य होणार नाहीं.

अस्पृश्यांना राखीव जागा ठेवल्या तरी समाधान नाहीं. त्यांना स्वतंत्र मतदार संघ पाहिजे आहे. गेल्या प्रांतिक निवडणुकींत अंबेडकरांचा पक्ष सपशेल पराभूत झाला. त्याचें कारण संयुक्त मतदार संघ आहे हें खरें आहे. पण जर अंबेडकरांनीं प्राथमिक निवडणुका लढविल्या असत्या तर त्यांची अशी शोचनीय स्थिती झाली नसती. प्राथमिक निवडणुका हेंच अंबेडकरांचें खरें संरक्षणाचें साधन आहे. राष्ट्र आतां स्वतंत्र मतदार संघाकडे परत मागें जाणार नाहीं. ही अविश्वासाची वृत्ती जर अंबेडकर टाकून देतील व काँग्रेस-मध्यें येतील तर काँग्रेस अंबेडकरांना काय देणार नाहीं? काँग्रेसबद्दलचा त्यांचा राग हाच त्यांचा वैरी आहे. जेथें मुसलमानांचेहि स्वतंत्र मतदार संघ असूं नयेत अशी काँग्रेसची दृष्टी आहे, तेथें अस्पृश्यांकरितां रद्द केलेले स्वतंत्र मतदार संघ हे पुनः सुरू होतील व राजकारण मागें जाईल असें वाटत नाहीं.

शिख हेहि असेंच रुष्ट झाले आहेत. ती एक लढवय्यांची जात असूनहि संरक्षण मागत आहे. त्यांचा तीन गोष्टींबद्दल राग आहे. घटना परिषदेंत त्यांना ४ च जागा दिल्या. पूर्वी त्यांना लोकसंख्येपेक्षां जास्त जागा होत्या, त्या यामुळें कदाचित् कायमच्या जातील अशी त्यांना भीती आहे. दुसरें त्यांचें असें म्हणणें आहे कीं, अखिल हिंदुस्थानच्या घटनेंत हिंदूंच्या व मुसलमानांच्या स्वतंत्र मान्यतेशिवाय जसा कोणताहि महत्त्वाचा प्रश्न सुटणार नाहीं, तसेंच 'ब' गटाच्या बाबतींत व्हावयास पाहिजे. तेथें शिख, हिंदु व मुसलमान यांच्या संमतीशिवाय जातीय प्रश्न सुटणार नाहीं असें म्हटलें जावयास त्यांना पाहिजे आहे. ही सवलत गटाच्या घटनेचे वेळीं ते मागूं शकतील. पण त्यांची खरी तक्रार पुढेंच आहे. पंजाबांत शीख हे मुसलमानांच्या ताब्यांत जातील. त्याकरतां पंजाबची पुनर्रचना त्यांना हवी आहे व पंजाबच्या १२ जिल्ह्यांचा स्वतंत्र प्रांत ते मागतील. पण 'ब' गटांत शिख व हिंदु यांची संख्या घटनापरिषदेंत कमी असल्यामुळें त्यांचें म्हणणें मान्य होणार नाहीं अशी त्यांना भीति वाटते. या १२ जिल्ह्यांचा स्वतंत्र प्रांत जर झाला नाहीं तर घटनेंत संरक्षणाची तरतूद करून घेणें एवढेंच शिल्लक उरतें. त्या बाबतींत त्यांना वाटेल ती मदत काँग्रेस करील.

अशाप्रकारें कागदावरील या योजनेंत काँग्रेससारख्या राष्ट्रीय संस्थेला कांहीं अपायकारक दिसत नाहीं. जातीय प्रश्न हा अवघड नाहीं. कारण ब्रिटिशांनीं मुसलमानांना इतके संरक्षक हक्क दिले आहेत कीं, त्यापेक्षां जास्त हक्क कोणते असणार? सैन्यांत जास्त किंवा बरोबरीनें मुसलमान घ्या वगैरे मागण्या जिना करतील. पण त्या कोण मान्य करणार? पुढें अडचणी नाहींत असें नाहीं. पण जर औदार्य, खंबीरपणा आणि राष्ट्रीयत्व याच्या आधारानें घटना बनविण्यास बसले तर सर्वसंमत घटना होणार नाहीं असें वाटत नाहीं.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हें आतां मान्य झालें असल्यामुळें मुसलमान व अस्पृश्य यांच्या बाबतींत जितकें औदार्यानें वागता येईल तितकें वागावयास पाहिजे. कारण घटना तयार करणें हें आपल्या त्यागाचे ध्येय नाहीं. तीं घटना कार्यक्षम कशी होईल व त्या घटनेमुळें हिंदुस्थान माणुसकीच्या पातळीवर कसा येईल हेंच आपणास बघावयाचें आहे. नुसत्या सामर्थ्यावर तयार केलेल्या घटना यशस्वी होत नाहींत. त्या यशस्वी करावयाच्या असतील तर त्या घटनेखालीं नांदणारी जनता संतुष्ट असावयास पाहिजे. नवी घटना तयार करणें म्हणजे जुनी वैरें संपविणें. नव्या घटनेला असंतोषाचें सुरुंग लागतां कामा नयेत म्हणून या घटनापरिषदेंत ज्यावेळीं कित्येक विसंगत सूचना येतील, त्यावेळीं त्या महत्वाच्या नसतील तर असंतुष्टांचा असंतोष काढून टाकण्याकरतां त्यांचा स्वीकार करावा. घटनापरिषदेंत काँग्रेस जी बसणार ती ब्रिटिश आजवर ज्या जागीं बसत त्या जागेवर बसणार आहे. मुसलमानांना हें रुचणार नाहीं व खपणार नाहीं. पण तें खरें नाहीं का? अशा वेळीं काँग्रेसनें अत्यंत औदार्यानें वागले पाहिजे व ही आपली श्रेष्ठत्वाची भूमिका लक्षांत ठेवली पाहिजे.

हिंदुस्थान स्वतंत्र होणार म्हणजे आपण गुलाम होणार किंवा पूर्वीची आपली गुलामगिरी संपणार नाहीं अशी कोणत्याही घटकाची भावना रहातां कामा नये. ही स्वातंत्र्याची भावना प्रत्येकांत निर्माण व्हावी म्हणून काँग्रेसनें अप्रिय वाटणारा कांहीं त्यागहि केला पाहिजे. राज्य हे घटनेवर टिकत नाहीं, तरवारीवर टिकतां कामा नये, ते जनतेच्या प्रेमावर, संतोषावरच टिकलें पाहिजे.

★

नगर वाचनालय
ता. ......
सातारा.

# स्वतंत्र हिंदुस्थानची घटना : : ४

हिंदुस्थानच्या दीर्घकालीन इतिहासांत असा प्रसंग कधींच आला नव्हता कीं, साऱ्या देशांतील जनतेचे प्रतिनिधी एकत्र बसले व त्यांनीं घटनेचा विचार केला. ही घटनापरिषद ( लीग आल्यास ) अपूर्व अशीच आहे. हिंदुस्थानांतील राजकारणपटुत्वांची ती परीक्षा आहे. आमच्यांत प्रतिकारशक्ती पुष्कळ आहे हें आम्ही दाखविलें; पण विधायक स्वरुपाची कामगिरी करण्याचे प्रसंग इतक्या दिवसांत आमचेवर आले नव्हते. म्हणूनच ही घटनापरिषद अपूर्व आहे असें वाटतें.

घटना कशाकरतां केली जाते ? ज्या वेळीं साध्या कायद्यांनीं भागत नाहीं त्याच वेळीं घटनापरिषद बोलावून मूलग्राही कायदे करावे लागतात असें मागें सांगितलें. घटनापरिषदेंत आपण काय ठरविणार आहोंत ? हिंदुस्थानांतील व्यक्तींच्या जीवनाचा विकास कसा होईल, त्या व्यक्तींची सर्वांगीण उन्नति कशी करतां येईल, याकरतां मुख्यत्त्वें करून घटना तयार करावयाची आहे.

## आत्मिक-शक्तीवर आधारलेली घटना हवी

आधुनिक काळांत कोणतेंहि राष्ट्र संन्याशासारखे अलिप्त राहूं शकत नाहीं. एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रांची मदत घ्यावी लागते. स्वतंत्र राष्ट्रांचा एक मित्रसंघ जगांत निर्माण करावा लागतो. परस्परांच्या सहकार्यावर जर जागतिक संघ स्थापन करतां आले नाहींत तर कोणतेंहि राष्ट्र यापुढें आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवूं शकणार नाहीं. एकेकाळीं परदेशी मालावर बहिष्कार घाला असें सांगणाऱ्या हिंदुस्थानला अन्नाचा, कागदाचा दुष्काळ पडतांच अमेरिकेच्या व कानडाच्या दारांत जाऊन त्या त्या वस्तूकरतां याचना करावी लागली. तेव्हां जग हें असें परस्परांच्या गरजांनीं बांधलें जात आहे. युद्धाच्या काळांत तर हें परस्परांचें सहकार्य किती वाढतें हें आपण पाहिलेंच.

व्यक्तींचा विकास आणि जागतिक सहकार्य हीं जशी हिंदुस्थानच्या भावी घटनेचीं अवश्यक अंगें आहेत, त्याचप्रमाणें देशांतील निरनिराळ्या जाती, निरनिराळे धर्म, निरनिराळे पक्ष, पंथ, वर्ण वगैरेंचें सहकार्य कसें संपादन करतां येईल याचाहि घटनापंडितांनीं विचार करावयास पाहिजे. अशाप्रकारें वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय या तीन दृष्टीनें जी घटना तयार होईल तीच घटना राष्ट्राला उपकारक ठरेल.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, आजकाल ज्या घटना व जे कायदे केले जातात त्यांत जर प्रभावी विचार कोणते असतील तर ते व्यक्तींचें स्वातंत्र्य कसें नियमित करतां येईल, राष्ट्रांतील पक्षांचें, जातींचें संभाव्य बंड कसें चिरडून टाकतां येईल आणि अन्य राष्ट्रांच्या सहकार्याऐवजी त्यांचें आक्रमण झालें तर त्याला तोंड कसें देतां येईल हेच विचार प्रधान असतात. घर बांधण्यापूर्वी गांवाला प्रथम तटबंदी करावी, नंतर वाड्याभोंवतीं जाडजुड उंच उंच भिंती बांधाव्या आणि नंतर आपल्या खोल्यांभोंवतींहि विटांच्या पडद्या बांधाव्या अशी सांप्रतची घटना तयार करणारांची दृष्टी असते. जग शांतताप्रिय, उद्योगी व नीतिमान लोकांना आज ज्वालामुखीसारखें झालें आहे. आपल्याला चहूंकडे शत्रूच शत्रू दिसतात, मित्र कोणीच दिसत नाहीं.

मित्राकडे आपण प्रच्छन्न शत्रूच्या दृष्टीनें पहातों; आणि इतर जनता आपल्याकडे त्याच दृष्टीनें पहात असते. ही परिस्थिती शोचनीय असली तरी खरी आहे. त्यामुळें वैयक्तिक जीवनापासून तों अंतरराष्ट्रीय संबंधापर्यंत घटनापंडीत हे साध्या तारेचीं नव्हेत पण विजेच्या तारांचीं घटनेची कुंपणें घालीत असतात. आपल्याला मूलभूत हक्क हे निर्दिष्ट करण्याची कां पाळी यावी ? एकदां आपण स्वतंत्र झालों म्हणजे मूलभूत हक्क प्रतिपादन करण्याची अवश्यकताच काय आहे ? मूलभूत हक्क प्रतिपादन करणें याचाच अर्थ बाकीचे हक्क आपल्याला नाहींत असें सांगणं आहे. गोडगोड नांवाखालीं व्यक्तींचे हक्क अपहृत करण्याची ही एक युक्ति आहे असें म्हटलें तर कोणी नाराज होऊं नये. पण व्यक्तींचे हक्क हे सर्व स्थळीं असेंच नियमित केले गेले आहेत. त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर मिळालेल्या हक्काबद्दल धन्यवाद दिले जातात. जसें व्यक्तींचे तसेंच इतर दोन घटकांचेहि संबंध हे घटनेंत नियमित करण्यांत येतात.

घटना करणें याचाच अर्थ हक्कांचे नियमन करणें, नियम करणें असा आहे. हे नियम ज्यावेळीं जाचक ठरतात त्याच वेळीं बंडाचे पडसाद उठूं लागतात. म्हणून घटना करणारानीं राष्ट्रीय जीवन अशा रीतीनें करकचून आवळूं नये कीं, ज्यामुळें व्यक्तीच्या जीवनांतील स्वतंत्र प्रवृत्ती ही गुदमरून नष्ट होऊन जाईल. जगांतील प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक संस्था व प्रत्येक राष्ट्र हे हक्काकरतां झगडत असते. पण हक्क मागणारांनीं कर्तव्याकडे पाहिले पाहिजे. ज्यांना हक्क हवेत त्यांनीं कर्तव्यें केली पाहिजेत. कर्तव्य न करणारांना हक्क मिळत नाहींत. तसेंच जेथें हक्क नाहींत तेथें कर्तव्य करण्याची जबाबदारी घेतां कामा नये. हक्क व कर्तव्यें हीं हातांत हात घालून ज्या राष्ट्रांत चालतात, त्याच राष्ट्रांचा उत्कर्ष होतो. सरकारजवळ हक्क असतात आणि जनतेजवळ कर्तव्याची साधनसंपदा असते. ह्या दोहोंचा मधुर संगम जेथें घडून येतो, तेथेंच राष्ट्रांची उन्नती होते. मूलभूत हक्काच्या मागणीबरोबर मूलभूत कर्तव्याची यादी ही दार्शित केली पाहिजे. राज्यकर्ते प्रजेची अमुक अमुक कर्तव्यें आहेत हें गृहीत धरूनच चालतात आणि प्रजेला आपल्या कर्तव्याचा उल्लेख झाला

नाहीं तर बरें वाटतें. पण तें बरोबर नाहीं. निदान हिंदुस्थानच्या घटनापंडितानीं प्रजेच्या मूलभूत हक्कांबरोबर प्रजेच्या मूलभूत कर्तव्याचाहि विचार केला पाहिजे व ते निर्दिष्ट केले पाहिजेत. जे राष्ट्रासंबंधीचीं कर्तव्यें करण्यास तयार नसतात, त्यांना हक्क देणें हें बरोबर ठरणार नाहीं.

जनता जर आपलीं कर्तव्यें योग्य प्रकारें करू लागली तरच तें राष्ट्र टिकू शकतें. हीं कर्तव्यें जनतेला करतां यावींत म्हणून राज्यसंस्थेनें त्यांना अनुकूल परिस्थिति निर्माण करून दिली पाहिजे. जसें राज्यसंस्थेनें जनतेच्या हक्काआड येतां कामा नये तसेंच जनतेनें राज्यसत्तेच्या अपेक्षित कर्तव्याआड येतां कामा नये. अखेरीस हक्क मिळण्याची पात्रता ही कर्तव्यानेंच प्राप्त होत असतें. जेथें कर्तव्यांत कमतरता नसते तेथें हक्कांचे नियमन कांटेकोरपणानें करण्याची आवश्यकता नसते. आधुनिक काळांत हीच गोष्ट सर्व देशांत दृष्टीआड केली जाते. मी अमुक देशांत जन्माला आलों आहे, एवढ्याकरतांच मला अमुक हक्क मिळालेच पाहिजेत असें प्रत्येकजण म्हणतो. राज्यकर्तेहि आपण राज्य करतो म्हणजे कांहीं गुन्हा करतो, असें समजून आपल्या प्रजेला जन्मजात हक्क देत असतात. राष्ट्रानें प्रत्येक माणसाला जीवनवेतन जसें दिले पाहिजे, तसेंच त्या त्या माणसानें कमीत कमी काम केलेंच पाहिजे. ज्याला भाषणस्वातंत्र्य हवें असेल त्यानें भाषणस्वातंत्र्याच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत.

राष्ट्राचें स्थैर्य अगर स्वातंत्र्य हें अशा कर्तव्यतत्पर जनतेच्या सामर्थ्यावर आधारलेलें असतें. जितकी जनता शक्तिशाली तितकें राज्य शक्तिशाली असते. ह्या शक्तीच्या विकासाला पूर्ण वाव देणें हें राज्यघटनेचें प्रधान कार्य असते. ज्या राज्यांत ह्या शक्तीच्या विकासाला पूर्ण वाव नसतो, तें राज्य प्रभावी होत नाहीं. जनतेची शक्ति ही नेहमींच व्यक्त होतें असें नाहीं. ती कधींकधीं सुप्तावस्थेंत असतें. अशा वेळीं ती सुप्त शक्ती जागृत कशी होईल याचा विचार करावा लागतो. नव्या नव्या विचाराचे, आकांक्षाचे बीजारोपण करणें व त्या बीजाच्या वाढीला अनुकूल वातावरण निर्माण करणें हें राज्यकर्त्यांचे कर्तव्य असते. तेव्हां प्रजेलाच कर्तव्यें असतात आणि राज्यकर्त्यांना

नसतात असें नाहीं. तसेंच प्रजेलाच हक्क असतात व राज्यकर्त्यांना नसतात असें नाहीं. दोघांच्या कर्तव्याची व हक्कांची क्षेत्रें भिन्न भिन्न असली तरी त्यांचें ध्येय एकच असते. जेव्हां कर्तव्यांचा व हक्कांचा संघर्ष सुरू होतो तेव्हांच राज्याचें स्थैर्य डळमळूं लागते.

प्रजेच्या शक्तींमध्यें शारीरिक, बौद्धिक व नैतिक शक्तींचा अंतर्भाव होतो. प्रजेनें आपलीं कर्तव्यें राज्यकर्त्याप्रमाणेंच आपल्या शक्तीच्या द्वारां बजवावयाची असतात. ज्या राष्ट्रांत ह्या तीनहि शक्तींचा भरपूर संचय असतो तेंच राष्ट्र प्रतापी व प्रभावी होते. नुसत्या शारीरिक, नुसत्या बौद्धिक किंवा नुसत्या नैतिक शक्तींवर कोणतेंहि राष्ट्र जगूं शकत नाहीं. शारीरिक व बौद्धिक शक्तीला जर नैतिक शक्तीची जोड नसेल तर तें राष्ट्र खचावयास फारसा वेळ लागणार नाहीं. शारीरिक व नैतिक शक्तीला बुद्धीची व बौद्धिक व नैतिक शक्तीला शारीरिक शक्तीची जोड नसेल तर देखील तीच दशा होईल.

आजच्या जगांत आपल्याला ह्या शक्ती कमी-अधिक प्रमाणांत पहावयास सांपडतात.

पण आज जर कांहीं पहावयास सांपडत नसेल तर, आत्मिक शक्ती. ह्या आत्मिक शक्तीचें संशोधन म. गांधींनीं केले आहे. नैतिक व आर्थिक ह्या दोन निरनिराळ्या शक्ती आहेत. नैतिक शक्ती ही जगांतील कांहीं राष्ट्रांनीं ठरविलेली एक शक्ती आहे. त्यांनीं नीतिमत्तेच्या कांहीं व्याख्या ठरविलेल्या आहेत. ह्या व्याख्येंत जें बसेल तें नैतिक, बाकीचें अनैतिक. आत्मिक शक्तीचें तसें नाहीं. ती शक्ती बाह्य नियमावर आधारलेली नसते. तिचें आश्रयस्थान सात्विक अंतःप्रवृत्ती हें असतें. सत्य व अहिंसा हे त्या प्रवृत्तीचे झरे आहे. सत्य व अहिंसेच्या व्याख्या ह्या राज्यकार्य करणारांनीं केलेल्या नसतात. किंबहुना त्याच्या व्याख्याहि करतां येत नाहींत व त्यांना मर्यादाहि नाहींत. प्रेमाला किंवा सत्याला कोण मर्यादा घालणार ?

जगांतील राज्यकर्ते आपापल्या राष्ट्रांच्या क्षेम स्थैर्याकरतां अनेक घटना,

अनेक कायदे करतात. त्यांच्या घटनेंत सत्य व अहिंसा नसते असें नाहीं. पण ती सापेक्ष असते, निरपेक्ष नसते. आत्मिक बलांची उभारणीच मुळीं सत्यावर व प्रेमावर झालेली असल्यामुळें सापेक्षता तेथें चालत नाहीं. आत्मिक शक्तीची वाढ झाली व ती जर सर्व जनतेंत बव्हंशीं झाली तर घटना कशाला आणि राज्य तरी कशाला ? आपले कारभार आपण स्वतःच व्यक्तीशः व संघशः करूं लागलों म्हणजे राज्यसंस्थेची जरुरीच उरत नाहीं. व्यक्तींच्या व संघाच्या नालायकीमुळें किंवा कमी लायकीमुळें राज्यसंस्था जन्माला आली. ती राज्यसंस्था लयाला जायची असेल तर वैयक्तिक व सांघिक जीवनाची उंची व खोली वाढली पाहिजे. परक्यांची गुलामगिरी वाईट व स्वतःची चांगली हें तारतम्यानेंच म्हणता येईल. पण मी स्वकियाच्या गुलामगिरींत—तो शब्द वाईट लागला तरी खरा आहे—कायमचा रहावयास तयार आहे हें म्हणणें विकासवादाला मान्य नाहीं. स्वराज्यांत स्वकियांची गुलामगिरी असते. पण ती चांगली असते म्हणून जाणवत नाहीं इतकेंच. राष्ट्र स्वतंत्र झाल्याबरोबर व्यक्ती स्वतंत्र होतात हा चुकीचा सिद्धांत आहे. ज्याला राज्य करावयाचें असते त्याला सत्ता चालवावी लागते आणि ही सत्ता चालविणें याचाच अर्थ शासन-संस्था स्थापन करणें. तेव्हां गांधी म्हणतात, तुम्हाला खरें स्वतंत्र व्हायचे असेल तर तुम्ही राज्यसंस्थेवर अवलंबून रहातां कामा नये. अराजक घटना हीच खऱ्या स्वातंत्र्याची घटना. बाकीच्या घटना या गौरवानें स्वातंत्र्याच्या घटना आहेत.

कार्ल मार्क्सनें 'स्टेट विदर्स अवे' असें राज्यपद्धतीबद्दल म्हटलें आहे. वर्गरहित समाजरचना झाली व खरी लोकशाही स्थापन झाली म्हणजे पिकलेल्या पानाप्रमाणें राज्यसंस्था गळून पडते. राज्याची जरुरीच जेथें लागत नाहीं तेंच राज्य आदर्श. बाकीची राज्यें हीं कमी अधिक प्रमाणांत परराज्येंच आहेत. 'दॅट गव्हर्मेंट इज दी बेस्ट युइच गव्हर्न्स दी लिस्ट' असें म्हणण्यांत येते. यांचेंहि तात्पर्य तेंच आहे. ज्या राज्यांत कमीत कमी शासन असते तेंच राज्य उत्तम. आजचीं राज्यें पाहिलीं तर त्यांच्या कायद्यांच्या व कानूंच्या पुस्तकांनीं कपाटें भरलेलीं असतात. 'दॅट गव्हर्मेंट इज दी बेस्ट युइच गव्हर्न्स

दी मोस्ट ' अशी आजची स्थिती आहे. प्रजेच्या स्वातंत्र्याला आवळून टाकण्याकरतां कायद्याच्या इतक्या शृंखला घडविण्यांत आल्या आहेत कीं, व्यक्तींचें जीवन त्या शृंखलांनीं खचून गुदमरून गेले आहे. यांचें कारण एकच दिसते. राज्यकर्ते प्रजेला भीत असतात. त्यांना वाटते कीं, प्रजा स्वतंत्र झाली म्हणजे आपलें स्वातंत्र्य जाईल. किंवा त्यांना असेंहि वाटते कीं, प्रजा इतकी दुबळी व शिशुसमान आहे कीं, तिच्या भोंवती कायद्याची कांटेरी जाळीं उभारली नाहींत तर ती प्रजा कोणाकडून तरी जिंकली जाईल. एकुलत्या एक फार दिवसांनीं झालेल्या मुलाला रोगापासून व चोरापासून जपण्याकरतां अर्धवट शास्त्रें शिकलेले व भेकड आईबाप जसे जपतात तशी जपणूक आज जगांतील बहुतेक राज्यकर्ते आपल्या प्रजेची करीत आहेत. शस्त्र हें निर्भय करते. तसें तें भेकडहि बनविते. आज शस्त्रांच्या वाढीमुळें निर्भयता आली नसून भित्रेपणा आला आहे.

आजची शस्त्रास्त्रांची संशोधनें हीं स्वतःच्या प्रभुत्वापेक्षां प्रतिस्पर्धी राष्ट्रांच्या भीतीमुळें व स्पर्धेमुळें होत आहेत. ह्याला आपण आदर्श राज्य म्हणूं शकूं कां ? ज्या राज्यांत स्वतःचें स्वातंत्र्य टिकवण्याकरतां लोकांच्या रक्ताचें महोदधि निर्माण करावें लागतात आणि शांततेच्या काळांत त्यांच्या श्रमाचें कोट्यावधी रुपये, डॉलर्स किंवा पौंड हे खड्ड्यांत टाकावे लागतात तें स्वातंत्र्य खरें स्वातंत्र्य आहे काय ?

## प्रेम धर्मावर आधारलेली हिंदी घटना

हिंदुस्थानला नवी घटना बनवावयाची आहे हिंदुस्थान कांहीं आदर्श डोळ्यासमोर ठेऊन घटना बनवणार कां पाश्चात्य राष्ट्रांच्या पावलावर पाऊल टाकणार ? हिंदुस्थानच्या घटनेंत आमच्या संस्कृतीचे, परंपरेचें, आमच्या तत्त्वज्ञानाचें प्रतिबिंब दिसणार कां आम्ही युरप अमेरिकेच्या उष्ट्या कल्पना घेणार ?

हिंदुस्थान कसा आहे ? जातीभेद, धर्मभेद, वर्गभेद, वर्णभेद या साऱ्या भेदांनीं तो भरलेला आहे. आमच्याकडील जनता गरीब आहे एवढेंच नव्हे तर

घरीं शिजवलेले अन्न वर्षानुवर्ष न मिळणारे कांहीं लोक येथें आहेत. आमचे उद्योगधंदे अद्याप प्रौढावस्थेला पोहोचले नाहींत. शिक्षणांत आम्ही मागासलेले आहों. आमची शेती पोटाला पोटभर अन्न देऊ शकत नाहीं. ज्याला राष्ट्रीयत्व म्हणतात तें आमच्यांत आलें नाहीं. देशाकरतां त्याग करावा लागतो ही भावना अद्याप व्हावी तितकी रूढ झाली नाहीं. स्वार्थ हा आमच्या जीवनाचा मध्यबिंदु आहे. राष्ट्रीय शील हें अद्याप अंकुरीत व्हावयाचें आहे. कदाचित आक्षेपक म्हणतील कीं पारतंत्र्यामुळें आमचे सारे सद्गुण लुप्त झाले आहेत. थोड्याफार प्रमाणांत तें खरें आहे असें मानलें तरी स्वातंत्र्य प्राप्तीबरोबर सद्गुणांची वृष्टि होत नाहीं. ते गुण कोठल्याहि परिस्थितींत लुप्त होता कामा नयेत हें आपण विसरून चालणार नाहीं. हिंदुस्थानची राज्यघटना ह्या असल्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय परिस्थितींत आपल्याला घडावयाची आहे. ती घटना बनविणारे बहुतेक पंडित हे पाश्चात्य विचारसरणींत वाढलेलें, पाश्चात्य घटना अभ्यासलेलें व पाश्चात्य राज्यपद्धतींत नांदलेलें असें आहेत. आपल्या बुद्धिवर झालेलें संस्कार ते पुसूं शकणार नाहींत.

कोठलीहि राज्यघटना ही त्या घटनेंतील कलमापेक्षां, घटना राबवणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असते. लोक ज्या आचारविचाराच्या पातळीवर असतात त्या प्रकारचें राज्यशासन त्यांना उपलब्ध होत असते. समाजसत्तावादी राज्यघटना ही अमेरिकेंत आणि भांडवलशाही घटना रशियांत यशस्वी होईल कां ? हिटलरच्या जर्मनींत जर खरी लोकशाहीप्रधान घटना लादली असती तर जर्मनीनें तिचें तुकडे पाडलें असते किंवा तेथील जनता निरुपयोगी झाली असती. जपानच्या राज्यांत राजसत्तेशिवाय कोणती सत्ता टिकाऊ झाली असती ? प्रत्येकाची शरीरप्रकृती जशी विशिष्ट स्वरुपाची असते तसे प्रत्येक राष्ट्राचें असतें. जर जपानला समाजसत्तावाद किंवा लोकशाही हवी असती तर तेथील जनतेनें आपल्या राजाविरुद्ध बंड पुकारलें नसते कां ? याचा अर्थ असा नाहीं कीं, लोकशाही किंवा समाजसत्तावाद चांगला नाहीं. पण ते ते वाद आत्मसात करण्यास त्या त्या देशांतील जनतेच्या विचारांची परिणति व्हावी लागतें. जनतेंत विशिष्ट राज्यपद्धतीविरुद्ध असलेला असंतोष हा उसळून वर

यावा लागतो व प्रतिकारापर्यंत त्याची शीग लागावी लागते म्हणजेच झालेला बदल किंवा क्रांति ही फलद्रुप होते.

हिंदुस्थानचें असें काय वैशिष्टय आहे ? हिंदुस्थान जर कोणा एका बाबतींत एक मताचा असला तर आपल्याला ब्रिटिश राज्य नको ह्याबाबतींत. अजून हिंदुस्थानांत व्यक्तीपूजेला फार उच्च स्थान आहे. त्यांना गांधी पूजनीय वाटतात पण गांधीवाद पूजनीय वाटत नाहीं. जनतेला राष्ट्रीय लोकशाही-प्रधान स्वराज्य आपल्याला स्थापन करावयाचें हें सांगावं लागतें, शिकवावें लागते. समाजवाद, कम्युनिझम शिकवावा लागतो. आपल्या कल्याणाकरतां आपल्याला विशिष्ट राज्यपद्धतीची जरुरी आहे असें हिंदी जनतेनें व्यक्त केलें नाहीं. स्थानिक स्वराज्यसंस्थांत असलेली लोकशाही कशी भ्रष्ट झाली आहे हें काय आपल्याला ठाऊक नाहीं ? नाहीं म्हणावयास कॉंग्रेस, लीग, हरिजन, शिख वगैरे संस्थाबद्दल त्या त्या वर्गांच्या व जातींच्या लोकांना आदर आहे व त्यांची शिस्त मानली जाते. याच शिस्तीमुळें त्या संस्थांची वाढ झाली आहे. त्याला कारण संकटाची जाणीव, बेशिस्त वर्तनामुळें होणाऱ्या दंडाची भीति, त्या संस्थांतील व्यक्तीबद्दल आणि संस्थांच्या कार्यामुळें निर्माण झालेला आदर. पण ज्या राष्ट्रांत अशाप्रकारची परिस्थिती नसते तेथें राष्ट्र टिकवण्याचें साधन दंड हेच असतें. मनूनें म्हटलें आहे.

दंड: शास्ति प्रजा: सर्वा दण्ड एवाभिरक्षति ।
दण्ड: सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधा: ॥ ७।१८

मनूचा काळ आज राहिला नसला तरी दंडावरच जगांतली राज्यें जगत आहेत. कायदेकानू, कोर्टकचेऱ्या, वकील न्यायाधिश, तुरुंग, पोलीस हे प्रजेला दंडाच्या भयानें सरळ वागावयास सांगत असतात.

दंडाशिवाय जेथें प्रजा आपली कर्तव्यें करतें तेथें दंडाची जरुरीच लागत नाहीं. सुधारलेल्या देशांत दंडुकेशाही कमी असते पण मागासलेल्या देशांत दंडुकेशाही धुमाकूळ घालीत असते. कोणत्याहि राष्ट्राचें ध्येय दंडुकेशाही गाजवावी असें नसतें. अपरिहार्य झालें तरच दंडच उगारला जातो. पण दंडाशिवाय

जगांत राज्य करण्याचें दुसरें साधन नाहीं. याचें कारण राज्यकर्ते काय किंवा प्रजा काय हिंसावृत्तीपासून मुक्त झाली नाहींत. किंबहुना दंडाशिवाय राज्यकरतां येतें हेंच त्यांना ठाऊक नाहीं.

राज्यसंस्थेचें अंतिम ध्येय जर अराजकता असेल तर दंड हा नष्ट झाला पाहिजे. त्याची जागा प्रेमानें घेतली पाहिजे आणि आणि मग हाच मनूचा श्लोक आपण,

> प्रेमैव हि प्रजाः शास्ति प्रेमैव परिरक्षति ।
> प्रेम सुप्तेषु जागर्ति प्रेम धर्मं विदुर्बुधाः ॥

असा बनविला पाहिजे. हिंदुस्थानच्याच काय पण जगाच्या राज्यसंस्थेची परिणती वरील श्लोकांत व्यक्त केलेल्या विचारांत झाली पाहिजे.

आपण हक्कांचें फारच स्तोम माजवितो. राज्यकर्त्यांची कर्तव्यें काय, आणि प्रजेची कर्तव्यें काय, राज्यकर्त्यांचे हक्क कोणते आणि प्रजेचे हक्क कोणते याचीच चर्चा फार केली जाते. कांहीं काळ ही चर्चा अवश्य असली तरी शेवटीं हक्क व कर्तव्यें हीं एकमेकांत विलीन झाली पाहिजेत आणि जीवनाच्या विकासाला पूर्ण वाव मिळाला पाहिजे. तो अहिंसेशिवाय मिळेल असें वाटत नाहीं.

राज्य करणारांना तर मग कांहींच काम नाहीं असें कोणी म्हणेल. राज्य-संस्थेची अंतिम परिणति ही अराजक निर्माण होण्यांत जरी व्हावयास पाहिजे, तरी संक्रमणावस्थेच्या काळांत हिंसा ही अपरिहार्य आहे. पण हिंसेच्या साध-नाचा, अतिहिंसा हा विकास नाहीं, अहिंसा हाच विकास आहे. ही साधन-साध्याची प्रणाली लक्षांत ठेऊन जर हिंसा अपरिहार्य झालीच तर शासन संस्थेला तिचा आश्रय करावा लागेल. पण तो आश्रय घेतांना आपल्याला अहिंसेकडे जावयाचें आहे, आत्यंतिक हिंसेकडे जावयाचें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदुस्थानची राज्यघटना तयार करणारे हे विचार डोळ्यासमोर ठेवतील काय ?

## वैयक्तिक विकास व घटना

राज्यघटना तयार करणारांची मतें दोन प्रकारची असतात. एका मताचे पंडीत असें म्हणतात कीं, राज्यघटना ही वरून तयार करीत आणावी. मध्यवर्ती सत्ता ही पोलादाइतकी बळकट असावी. राज्ययंत्र जितकें बळकट तितकें राज्य बळकट. जनता ही या यंत्रातील एक घटक आहे व अगदीं उपेक्षणीय घटक आहे. राज्यकारभाराचे कायदे हेच जनतेचें शीलसामर्थ्य बनवण्यास समर्थ आहेत. तेव्हां हे कायदे जितके व्यापक असतील तितकी जनतेची शक्ती वाढत जाईल. जनता ही जात्याच आळशी, बेशिस्त, स्वार्थी असते. तेव्हां जनतेंतील हे दुर्गुण काढून टाकण्यास त्यांना राज्ययंत्राचें उत्तम घटक केलें पाहिजे. जगामध्यें ही समज आजची नाहीं. राज्यकर्तें व प्रजा यांच्यांतील झगड्यांचा इतिहास पाहिला तर त्याचें मुख्य कारण हेंच सांपडेल. राजे जुलमी कां होतात? डिक्टेटरशिप कां नको असते? त्याचें कारण त्या त्या राज्यसंस्था आपल्या हातीं अमर्याद सत्ता घेत असतात व प्रजेला कस्पटासमान लेखत असतात. या वृत्तीमुळें जनतेंतील स्वाभाविक प्रवृत्ती नष्ट होतें व जनतेंतहि अरेरावी वृत्ती संचरते. अशा राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ती ही कायदेबाज जुलमी व अरेराव बनते. हेंच राष्ट्रीय शील म्हणून समजण्यांत येते. त्याचा परिणाम असा होतो कीं, मानवी अंतःकरणांतील प्रेमळपणा, वात्सल्य, भूतदया हे गुण लुप्त होतात आणि कायदा हाच जीवनाचा वाटाड्या होतो. कांहीं कांहीं देशांत जर जनता या कायद्याप्रमाणें बदलत गेली नाही तर ती निष्प्रभ व निर्माल्यवत होते. जनतेंतील प्रतिकार वृत्तीचा कायद्याच्या बेताल चाबकानें जर नाश केला तर प्रजेनें दुसरें काय करावें? हिंदी संस्थानांत आपल्याला मृतवत् झालेली प्रजा कां दिसते? जुलमानें, करानें ग्रस्त झालेली प्रजा प्रतिकाराकरतां आवाजहि काढूं शकत नाहीं. तेथील राजे व त्या राजांचें कांहीं हस्तक प्रजेला गुलामाप्रमाणें वागवित असतात. कायद्याकरतां प्रजा आहे, प्रजेकरतां कायदे नाहींत अशी त्यांची समज. पण या वृत्तीमुळें त्या राजांचें राज्य जरी चांगलें चाललें तरी प्रजा ही खंगतच जाते. राजसंस्था ही तर जगानें त्याज्य

ठरविलीच आहे; पण आतां पोलादी चौकटीच्या राज्यसंस्था ह्याहि त्याज्य ठरविण्याचा काळ आला आहे. हिटलर मुसोलिनींनीं आपल्या प्रजेच्या भावनांचा विचार करून युद्ध केलें होते कां ? हे डिक्टेटर्स आपल्या महत्वाकांक्षा मनांत आखीत असतात आणि प्रजेला त्या पुऱ्या करण्याकरतां जोखडाला जुंपत असतात. त्या महत्त्वाकांक्षा सफल झाल्या तरी प्रजेला काय स्वातंत्र्य असते ?

रशियांत डिक्टेटरशिप आहे आणि त्या डिक्टेटरशिपचा जगांत उदो-उदो होत आहे. रशियाचे डिक्टेटर्स हे फार सूज्ञ आहेत. तेथें प्रजेला अन्न, वस्त्र, घर वगैरेची कमतरता नाहीं असें सांगतात. तेथें कामगारांचा स्वर्ग वसवला आहे. त्या स्वर्गाचीं वर्णनें वाचून पुष्कळ देशांतील लोक आपल्याकडे असें राज्य केव्हां येईल याची वाट पहातात अगर त्याकरतां प्रयत्न करतात. रशियाच्या या स्वर्गाचीं वर्णनें खरी आहेत असें आपण धरून चालूं. पण सारा रशिया देश हा एक कामगारांचा प्रचंड कारखानाच नाहीं का ? लहानसहान गिरण्यांत, खाणींत, कारखान्यांत कामगार ज्या हक्क व सवलतीकरतां झगडत असतात, ते सर्व हक्क व सवलती रशियांतल्या प्रत्येक मनुष्याला उपलब्ध झाल्या आहेत असें आपण समजूं. या कारखान्याचे चालक जे आहेत ते कामगारांना पिळत नाहींत, त्यांच्यावर सक्ती करीत नाहींत, त्यांच्या आजारीपणाची व म्हातारपणाची तरतूद करतात वगैरे अनेक गोष्टी खऱ्या असल्या तरी रशिया हा एक प्रचंड कारखाना आहे ही गोष्ट काय खोटी आहे ? यंत्रांतल्या खिळ्यांना जसें स्वातंत्र्य नसते, तसें या मानवी खिळ्याना स्वातंत्र्य नाहीं. समाजवादी घटनेनें त्यांचे सारें जीवन हें कसें नियमबद्ध, सूत्रबद्ध केलें आहे ! तेथील प्रजेच्या बुद्धीवर हें राज्य, कामगारांचें व शेतकऱ्यांचें आहे असे संस्कार यशस्वीरीत्या करण्यांत आले आहेत. रशियांत वैयक्तिक जीवनाच्या संपूर्ण विकासाला संधी आहे असें वाटत नाहीं. राष्ट्रीय जीवनाचा परिपोष मात्र तेथें व्यवस्थितपणें चालू आहे. पण कोणतेंहि राज्ययंत्र जनतेची शक्ती, जनतेचें शील, जनतेची उपक्रमशीलता यावाचून टिकत नाहीं व प्रगतिमान होत नाहीं. जनतेमध्यें कांहीं आत्मिक शक्ती आहे व त्या शक्तीच्या विकासावरच राज्य

अवलंबून असतें हें गृहित धरण्यांत येत नाहीं. त्यामुळें राज्ययंत्र कितीहि परिपूर्ण असले तरी तें यंत्र चालविणाऱ्या व्यक्ती ह्या सजीव, स्वयंप्रभ, उपक्रमशील आहेत हें जोंवर अनुभवास येत नाहीं तोंपर्यंत तें यंत्र इतर यंत्राप्रमाणेंच एक यंत्र म्हणून राहील. तेव्हां रशियाचा समाजवाद हा यांत्रिक व कृत्रिम आहे. कायद्यानें त्यांना समतावादी बनविलें आहे. शहरांतील एखाद्या बागेचा माळी जशी कात्रीनें झाडें झुडपें छाटून तीं सारखीं करतो, तसें रशियांतल्या राजकीय माळ्यांनीं रशियांत ही समता आणली आहे. स्वतःच्या जाणीवेनें, स्वतःच्या त्यागानें, स्वतःच्या आत्मिक उर्मीनें जेव्हां समता निर्माण होते, तेव्हांच ती खरी समता. इतर समता ह्या डिक्टेटरशिपच्या बडग्यानेंच टिकवलेल्या असतात. हा बडगा जर दूर होईल तर स्वाभाविक प्रवृत्ती वर डोकें काढील. रशियांतली डिक्टेटरशिप गेल्यानंतर जर तेथें समता टिकली तरच ती खरी समता.

दुसरा एक विचार या राज्यघटनासंबंधीं असतो. राष्ट्रांतल्या व्यक्तींचे जीवन हें निर्दोष व भक्कम केले म्हणजे त्या व्यक्तींच्या सांखळीनें घडलेलें जें राष्ट्र तें राष्ट्र निर्दोष व भक्कम होईल. व्यक्तीचें जीवन सुधारणें हा घटनेचा हेतु असावा. जोपर्यंत वैयक्तिक जीवन सुधारत नाहीं तोपर्यंत राज्याचा गाडा सुरळीत चालणार नाहीं. कायद्याच्या बडग्यानें जीवनांत सुधारणा होत नाहीं. ती सुधारणा व्हावयास भौतिक शक्ती जाज्वल्य करून भागणार नाहीं, आत्मिक शक्तीच जागृत करावयास पाहिजे. मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती ही हिंसात्मक नाहीं. ती प्रवृत्ती कारुण्य, वात्सल्य, प्रेम, परोपकार, त्याग वगैरे भावनांची बनलेली आहे. आजच्या जगांत ती प्रवृत्ती लुप्त झाल्यासारखी दिसते. त्या प्रवृत्तीवर आज राख चढलेली असली तरी आंतला अग्नी विझलेला नाहीं. तेव्हां घटनाकारांनीं घटना बनवितांना वैयक्तिक प्रवृत्तीवर चढलेलें हे अनिष्ट संस्कार दूर कसे होतील याचा विचार केला पाहिजे. वैयक्तिक जीवनाच्या विकासाला योग्य मार्गदर्शन, भरपूर संधी, अनुकूल परिस्थिती निर्माण करून देणें हें आजचें आद्य कर्तव्य आहे.

हें जीवन सुधारल्याशिवाय ग्रामपंचायतीचा कृत्रीम सांगाडा उभा केला

तरी कार्यभाग होणार नाहीं. रशियानें समाजवादी राष्ट्र निर्माण केलें आणि आम्ही पंचायतींचें राज्य निर्माण केलें एवढेंच आपण म्हणूं शकूं. पण नुसती ग्रामपंचायत काय करणार ? ग्रामपंचायतींतील लोक जर दुष्ट प्रवृत्तीचें असतील, अगर कायद्याच्या बडग्यानें त्यांना सरळ केले जात असेल तर ती ग्रामपंचायत उपयुक्त ठरणार नाहीं. नुसती ग्रामपंचायत स्थापन केल्यानें त्या पंचायतींत सर्व सद्गुण येतात असें थोडेच आहे ? त्या पंचायती चालविणाऱ्या व्यक्तींत जर निस्वार्थी व स्वावलंबी वृत्ति नसेल तर त्या पंचायतींच्या म्युनसिपालिट्या व्हावयास वेळ लागणार नाहीं. सत्तेचें विकेंद्रीकरण अवश्य आहे; पण विकेंद्रित सत्ता जर योग्य माणसांच्या हातीं गेली नाहीं तर केंद्रित सत्तेच्या पापांचे व दोषांचें विकेंद्रीकरण होईल. आपल्याला सत्तेचे विकेंद्रीकरण करावयाचें आहे याचा अर्थ चांगल्या गुणांचें विकेंद्रीकरण करावयाचें आहे.

तेव्हां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, सत्ता म्हणजे काय ? जनतेचें कल्याण करण्याची, त्यांचें रक्षण करण्याची जी शक्ती तिला सत्ता असें म्हणतात. कल्याण कशाला म्हणतात आणि रक्षण कशाला म्हणतात ? यंत्रशक्तीनें निर्माण झालेलें पर्वतप्राय ढीग हे कल्याण करतात काय ? आजच्या जगाचा खरा शत्रू यंत्र आहे. याचा अर्थ यंत्राची उपयुक्तता नाहीं असें नाहीं. पण मनुष्य हा यंत्राचा मालक नसून नोकर झाला आहे म्हणून यंत्र हे शत्रूवत् झालें आहे. यंत्राच्या फाजील उत्पादनामुळें रहाणीचा दर्जा वाढला आहे. तो कायम टिकवण्याकरतां उत्पादन हें अवश्य होऊन बसलें आहे. अमेरिका अमुक एका वार्षिक उत्पन्नाखालीं आपला दर्जा संभाळूच शकत नाहीं. तेथील लोक अन्नवस्त्रापेक्षां चैनीच्या वस्तूकरतां अधिक पैसा खर्च करतात आणि त्याला रहाणीचा दर्जा म्हणतात. हा दर्जा खोटा, कृत्रिम व हानिकारक आहे. गांधींजी म्हणतात त्याप्रमाणें जीवनाचा दर्जा वाढला पाहिजे, रहाणीचा दर्जा वाढवून उपयोग नाहीं.

जीवनाचा दर्जा वाढण्याकरतां जीवनाकडे पहाण्याचा सारा दृष्टीकोण बदलला पाहिजे. हा दृष्टीकोण बदलला म्हणजे आर्थिक उत्पादन, युद्ध, लष्कर वगैरेकडे पहाण्याची आपली दृष्टी निराळी होईल.

आजच्या संस्कृतीला यांत्रिक व आर्थिक स्पर्धा हीच कारणीभूत झाली आहे. त्यासंबंधींची आपली दृष्टी बदलली व व्यावसायिक स्वावलंबनावर आपण आलों म्हणजे हिंसावृत्ति कमी कमी होत जाईल व आदर्श राज्य आपल्याला निर्माण करतां येईल. हा प्रश्न इतका मोठा आहे कीं, त्याचें संपूर्ण विवरण येथें करतां येणार नाहीं. म. गांधी एकदां म्हणाले होते त्याप्रमाणें जर खेडोपाडी आपली स्वावलंबी राज्यें स्थापन झाली तर जगांतली कोणतीहि शक्ती ह्या राज्यांना जिंकू शकणार नाहीं. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर जें आक्रमण करते, त्यांत आर्थिक कारण एक असते. तुमच्या देशांतला कच्चा माल तरी त्याला हवा असतो, किंवा तुमच्या देशाची बाजारपेठ तरी त्याला हवी असते. नुसत्या हाडामासांच्या व दगडधोंड्याच्या देशावर राज्य करण्याची कोणाची इच्छा असते ? तसेंच जरुरी पुरतें ज्यांचें उत्पादन असते व जे कोणत्याहि परिस्थितींत स्वत्व गमविण्यास तयार नसतात त्यांच्यावर कोणीहि आक्रमण करीत नाहीं.

हिंसेला आरंभ जो होतो, तो पैशापासून. लहान लहान ग्रामराज्यें आपलें पुष्कळसे व्यवहार जर पैशावाचून चालवूं शकली व त्यांच्यांत सामुदायिक जीवनाच्या परिपूर्णतेची जर जाणीव झाली तरच अहिंसक राज्याचा पाया घातला जाईल. पण त्याकरतां व्यक्ती ही आद्यघटक मानली पाहिजे. व्यक्तींवर ग्रामराज्य व ग्रामराज्यावर पुढील राज्यांचें इमले उठावावयास पाहिजेत.

हिंदुस्थानांत अशाप्रकारची घटना तयार व्हावी असें कांहींना वाटत असलें तरी त्याची शक्यता तूर्त तरी दिसत नाहीं. जर आपण अहिंसात्मक मार्गानें संपूर्ण क्रांति करू शकलों असतो, म्हणजेच गांधींचा विधायक कार्यक्रम अंमलांत आणू शकलों असतो, तर वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें आपलीं ग्रामराज्यें स्थापन झाली असतीं. आज इंग्रजांचा अंमल दूर कसा होईल एवढीच एक चिंता आपल्याला लागली आहे. तेव्हां हिंदुस्थानांत भरणारी ही घटना परिषद कांहीं क्रांतीकारक गोष्टी करील असें बिलकूल वाटत नाहीं. आपली राज्यघटनाहि पुष्कळशीं प्रचलित कायद्याच्या आधारावरच निर्माण होणार आहे. त्या कायद्यांत ज्या उणिवा आहेत तेवढ्या दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळें घटना-

परिषदेंतून अहिंसक राज्यघटना किंवा समाजवादी राज्यघटना बाहेर पडेल अशी आशा नाहीं.

आजची राज्यघटना लोकशाही प्रधान आहे. लोकशाही घटना हीं राज्यशास्त्र विशारदांपैकीं पुष्कळांच्या तिरस्काराचा विषय झाली आहे. जर्मनींत, रशियांत, अमेरिकेंत, इंग्लंडमध्यें सगळीकडेच लोकशाही होती व आहे. त्या लोकशाहीचें स्वरुप प्रत्येक देशांत निरनिराळें असते. निरपवाद लोकशाही ही स्वप्नवत् आहे. लोकशाहींत लायक माणसांना निवडून येण्याची फारच थोडी संधी असते. मतें ही चहा साखरेप्रमाणें घाऊक खरेदी केली जातात. त्यामुळें पैसेवालेच तेवढे प्रतिनिधी होऊ शकतात. जातीचा विचार हाहि निवडणुकींत एक प्रमुख घटक असतो. हिंदुस्थानांत तर जातीशिवाय निवडूनच येतां येत नाहीं. अशा विचारसरणींत चांगल्या माणसांना कशी संधी मिळणार ? अमेरिकेंत तर या निवडणुकीकरतां कोट्यवधी रुपये खर्च करणारे एकेक प्रतिनिधी आहेत. रशियांतील निवडणूक ही मामुली असते. तेथें पैशाचा किंवा इतर प्रश्नाचा निवडणूकीशीं संबंध नसला तरी तेथील प्रतिनिधी राज्यकर्त्यांच्या मतांशीं विसंगत मत व्यक्तच करू शकत नाहींत. इंग्लंडमध्यें लोकमताचा दाब थोडाबहुत राज्यपद्धतीवर पडतो व तेथें पक्षांतर होऊ शकते. रशियांत कांय पक्षांतर होऊ शकणार !

पण लोकशाहींत कितीहि दोष व घाण असली तरी जगामध्यें आज लोकशाहीशिवाय दुसरी कोणतीच पद्धत मान्य होण्यासारखी नाहीं. ज्या राष्ट्राचें बस्तान नीट बसलेले असतें, त्यांचें व्यवहार या पद्धतीनें चालण्यास कोणतीच अडचण येत नाहीं. पण हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशाला लोकशाहीचे बरेवाईट परिणाम हे भोगायलाच पाहिजेत. एकूण हिंदुस्थान हा लोकशाही-प्रधान राष्ट्रीय व स्वतंत्र देश होणार आहे.

## कांहीं सूचना

हिंदुस्थानच्या भावी घटनेंत नागरिक स्वातंत्र्याचें हक्क निर्दिष्ट केलें जातील, निवडणूकांची पद्धत ठरविली जाईल, गव्हर्नरचे जागीं प्रांताचे व

व्हाईसरॉयचे जागीं राष्ट्राचें अध्यक्ष येतील. प्रांताकडे आतां पुष्कळच खातीं येणार आहेत. तेव्हां प्रांतानें जिल्हा कायदेमंडळें बनवावींत व त्यांच्याकडे बरींच कामें सोपवावींत. फक्त सबंध प्रांतावर ज्या गोष्टी अवलंबून असतील तेवढे अधिकार त्यांनीं आपल्या हातीं ठेवावे. सध्यांची लोकलबोर्डें बंद करून त्यांना कायदेमंडळाचें स्वरुप द्यावें. यामुळें सत्तेची विभागणी होऊ शकेल. फांशीची शिक्षा बंद करणें, जन्मठेपीची मुदत १० वर्षें करणें, गुन्हेगाराना शासन करण्याऐवजीं सुधारण्याचें धोरण ठेवणें ह्या गोष्टी केल्या पाहिजेत. सध्याची न्यायपद्धत ही अत्यंत खर्चाची आहे. न्याय हा सुलभतेनें मिळाला पाहिजे. तेव्हां बहुतेक दिवाणी दावे हे गांवोगांवच निकालांत निघाले पाहिजेत. किरकोळ फौजदारी खटले हेहि गांवोगांवच पंचामार्फत मिटवले पाहिजेत.

शेतसारा हा प्राप्तीवरील कराच्या प्रमाणांत वसूल केला पाहिजे. अमुक एका उत्पन्नाच्या खालीं शेतसारा घेतां कामा नये असें ठरविले पाहिजे. गांवाची शेती ही सामुदायिक पद्धतीनें करण्यास लोकांची मनें वळवली पाहिजेत. सरकारनें डोंगराळ भागांत, नदीच्या प्रदेशांत धरणें बांधली पाहिजेत. धरणाशिवाय या देशाला आतां धडगत नाहीं.

खरेदी, विक्री व उत्पादनाला सामुदायिक सहकारी पद्धत हीच अत्यंत उपकारक आहे हें प्रत्यक्ष उदाहरणानें पटविलें पाहिजे. गांवाच्या रक्षणापासून तो देशाच्या रक्षणापर्यंत साऱ्या गोष्टी सहकारी पद्धतीनेंच कराव्या. पोलिस हा शास्ता नसून रक्षणकर्ता मित्र आहे ही भावना वाढीस लागली पाहिजे.

हिंदुस्थानांत इतकी मनुष्यशक्ती आहे कीं, यंत्र शक्तीची आपल्याला अवश्यकताच आहे असें नाहीं. तेव्हां मनुष्यशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे. चीन-जपानप्रमाणें ग्रामोद्योगाकडे या मनुष्यशक्तीचा ओघ वळविला पाहिजे.

उद्योगधंद्याचें राष्ट्रीयकरण केलें पाहिजे असें आपण म्हणतो. पण तें प्रारंभीं कितपत शक्य होईल याबद्दल शंकाच आहे. रेल्वेसारखे कांहीं धंदे हे आजहि सरकारी आहेतच. पण ते संपूर्णतया सरकारी नाहींत. त्यांतील

देशी परदेशी भांडवल हे फेडले पाहिजे. नवे उद्योगधंदे हे अल्प प्रमाणावर सरकारी होतील. पण तसें न होणाऱ्या धंद्यांचा नफा हा ठरवून टाकला पाहिजे. म. गांधींच्या म्हणण्याप्रमाणें जनतेच्या मालकीचें न होणारे धंदे हे त्या त्या मालकांनीं विश्वस्त म्हणून चालविले पाहिजे. याचा अर्थ नव्या धंद्यांना लिमिटेड कंपन्या म्हणून मान्यता न देतां ट्रस्ट केला तरच मान्यता मिळेल असें ठरविलें पाहिजे. त्याकरतां इंडियन ट्रस्ट ॲक्ट हा नव्या धोरणानें लिहिला गेला पाहिजे.

सहकारी जीवन, सहकारी उद्योगधंदे व विश्वस्त म्हणून रहाण्याचें तत्त्व एवढ्या गोष्टी जरी सध्यांच्या घटनाकारांनीं प्रचारांत आणल्या तरी भांडवलशाहीचे दुष्परिणाम बरेच कमी होतील.

निवडणुकीची पद्धत हीहि सुधारली पाहिजे. फक्त दोन निवडणुका प्रत्यक्ष कराव्या. एक जिल्हा कायदे मंडळाची आणि दुसरी अखिल भारतीय अध्यक्षाची. बाकीच्या सर्व निवडणुका अप्रत्यक्ष असाव्या. मत देण्याचा अधिकार हा २१ वर्षे वयाच्या स्त्रीपुरुषाला असावा. पण हें मतदान सक्तीचें करावें. मत देण्यास न येणाऱ्या मतदाराला दंड किंवा शिक्षा अथवा दोन्ही ठेवाव्या. आजारीपण किंवा अन्य अडचणीचा योग्य पुरावा दाखल केला तरच त्याची शिक्षा माफ व्हावी. लांचलुचपत थांबविण्यास जशी ही सक्ती उपयोगी पडेल, तसेंच प्रत्येकाला आपलें हें राज्य आहे असें वाटावयास हीच सक्ती उपयोगी पडेल. मतदान हें मूलभूत कर्तव्य आहे व तें केलेंच पाहिजे. तसें झालें तरच लोकमताचें प्रतिबिंब राज्यकारभारांत पडावयास सांपडेल.

हिंदुस्थानच्या ईशान्य सरहद्दीवर नेपाळ व भूतान ही संस्थानें आहेत. स्वतंत्र संस्थानें म्हणून तीं ब्रिटिशांनीं हातची राखली आहेत. आतां त्यांना हिंदुस्थानांत यावयास हरकत नाहीं. पण त्याहिपेक्षां पोर्तुगीज व फ्रेंच यांची खड्याएवढीं लहान लहान राज्यें निष्कारण येथें राहिली आहेत. ती सरळ सरळ विकत घेऊन टाकावींत अगर त्यांच्याकडून ती वहिवाटीस घ्यावींत. वार्षिक खंडणी त्यांना त्याबद्दल द्यावी.

ब्रह्मदेश, सिलोन हे हिंदुस्थानच्या लगतचे देश आहेत. ते ब्रिटिशांच्या ताब्यांत रहाणें हें हिंदुस्थानला तापदायकच होणार आहे. आज आपण त्या देशाबद्दल कांहीं करू शकत नाहीं. पण पुढें मागें हिंदुस्थानच्या युनियनमध्यें त्या देशांना त्यांची इच्छा असेल तर समाविष्ट करावे. हिंदी संस्थानें ही प्रजेच्या ताब्यांत येतील अशाबद्दल घटनापरिषद खटपट करीलच. ब्रिटिशांचा संबंध सुटल्यावर संस्थानिकांना हिंदी राष्ट्रीय लोकशाहीच्या पद्धतीची राज्यें स्थापन करण्यावांचून गत्यंतरच नाहीं.

हिंदुस्थानच्या भावी घटनेबद्दल पुष्कळ सूचना करण्यासारख्या आहेत. पण तात्पुरत्या सुधारणा काय किंवा कायम सुधारणा काय, सध्यां केल्या जातील असें वाटत नाहीं. इंग्रजांचा संबंध संपल्यानंतरच हिंदुस्थानांत पुन: घटना तयार करण्याकरतां नव्या विचारसरणीच्या तज्ज्ञाना नव्या घटनापरिषदेकरतां बसावें लागेल व साऱ्या राज्यकारभारांत बदल करावा लागेल. तोपर्यंत सध्या प्रचलित असलेली राज्यपद्धतच आपल्यावर अंमल चालविणार आहे. त्यामुळें वरील सूचनांचा तूर्त उपयोग नाहीं.

घटनापरिषदेनें आपल्या घटनेंत निदान भावी घटनेचें बीजारोपण तरी करून ठेवलें पाहिजे. तें बीजारोपण पाश्चात्य राज्यपद्धतीचें नसावें. इतकें कार्य जरी केलें गेलें तरी घटनापरिषदेनें आपली कामगिरी बजावली असें होईल.

— समाप्त —

नगर वाचनालय
ता. ......
सातारा.

# परिशिष्ट १

## रशियाची घटना

६ फेब्रुआरी १९३५ रोजीं रशियानें आपल्या घटनेंत दुरुस्ती केली. ही दुरुस्ती कां केली ? १९२४ सालच्या घटनेंत ज्याला 'नेप' (न्यू एकॉनॉमिक पॉलिसी) म्हणतात ती अस्तित्वांत आली. भांडवलशाही पद्धती या धोरणानुसार मान्य केली गेली. शेंकडा २० टक्के भांडवलशाही व ८० टक्के समाजसत्ताशाही तेव्हां अस्तित्वांत होती. शेतींत कुलक वर्ग होता. तसेंच लहान लहान शेतीचे असंख्य तुकडे तेथें होतें व त्या तुकड्यांचे मालक शेतकरी होते. सामुदायिक व सरकारी शेती लहान प्रमाणावर होती. तिसरा वर्ग व्यापाऱ्यांचा. ५० ते ६० टक्के व्यापार तेव्हां समाजवाद्यांच्या हातांत होता व जवळजवळ तितकाच खासगी व्यापार होता.

१९३६ सालीं 'नेप'चें धोरण संपलेः सारी भांडवलशाही नष्ट झाली. शेतींतला कुलक वर्ग संपला. लहान लहान शेतकरी आटोपले. ९८ टक्के शेती सामुदायिक पद्धतीनें होऊं लागली. खासगी व्यापारी हा हद्दपार झाला. सरकारी सहकारी पेढ्यांनीं सारा व्यापार ताब्यांत घेतला. १९३६ सालीं उरल्यासुरल्या भांडवलशाहीचें उच्चाटन झाल्यामुळें त्यांना आपल्या घटनेंत दुरुस्ती करणें जरुरीचे वाटले.

नव्या घटनेची कांहीं मूलतत्त्वें स्टालीननें सांगितली तीं अशीः—

(१) आपण पूर्णपणें समाजवादी बनलों; पण कम्युनिस्ट बनलों नाहीं. समाजवादाचें आद्य तत्त्व 'प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीप्रमाणें घेणें व प्रत्येकाला त्याच्या कामाप्रमाणें देणें' हें आहे. कम्युनिझमचें मूळ तत्त्व 'प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीप्रमाणें घेणें व त्याच्या गरजेप्रमाणें देणें' हें आहे. आपल्याला अजून कम्युनिझमच्या या उदात्त तत्त्वाकडे जावयाचें आहे. आपली घटना समाजवादावर आधारली आहे.

(२) रशियांत भांडवलशाही संपली व समाजसत्ता सुरू झाली. 'जो काम करीत नाहीं त्याला खायलाहि मिळायचे नाहीं.' हें दुसरें तत्त्व. त्यांत खालील गोष्टी येतात. प्रत्येकाला काम मिळालें पाहिजे, विश्रांति व रजा मिळाली पाहिजे; शिक्षण मिळालें पाहिजे इत्यादि.

(३) समाजांत विरोधी वर्ग नाहींत. समाज दोनच मित्र वर्गाचा बनला आहे. कामकरी व शेतकरी हे ते दोन वर्ग. राज्याचें नेतृत्व हें कामकरी वर्गाच्या हातीं आहे.

(४) भांडवलशाहीपद्धतींत राष्ट्राराष्ट्रांत फरक केलेला असतो. कांहीं राष्ट्रांना संपूर्ण हक्क असतात तर कांहींना नसतात. तिसऱ्या प्रकारच्या म्हणजे वसाहतीच्या राष्ट्रांना अगदीं अल्प हक्क असतात. भांडवलशाही घटना ह्या राज्यकर्त्या राष्ट्रांच्या घटना असतात. आमची घटना ही आंतरराष्ट्रीय आहे. जगांतली सारी राष्ट्रें व वर्ण सारखे आहेत असें आम्ही मानतो. तीं राष्ट्रें सबल असोत वा दुर्बल असोत, त्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक हक्क सारखे आहेत.

(५) आमची घटना संपूर्ण लोकशाहीची आहे. आम्ही स्त्रीपुरुष, नागरिक बिननागरिक, शिक्षित अशिक्षित, संपत्ति असणारे नसणारे, असे भेद करीत नाहीं. सर्वांना सारखे हक्क आहेत असें मानतो. वैयक्तिक काम व लायकी हे आम्ही प्रमाण मानतो.

( ६ ) आम्ही इतर देशाप्रमाणें नुसते मूलभूत हक्क सांगत नाहीं; तर तें उपलब्ध करून देतो. काम करणें हा नुसता हक्क आम्ही सांगत नाहीं. तर काम मिळवून देतो. लेखन स्वातंत्र्याबरोबर छापण्याची साधनें; भाषण स्वातंत्र्याबरोबर सभेच्या जागा, वगैरे देतो.

ही रशियाच्या नव्या घटनेची मूलभूत भूमिका स्टॉलिननें सांगितली.

## रशियाच्या घटनेचीं कांहीं कलमें:—

रशियाच्या घटनेचीं एकंदर १४६ कलमें आहेत. त्यांतील महत्त्वाचीं कलमें येथें देत आहों.

कलम १:—यू. एस. एस. आर. हे कामकरी व शेतकरी यांचें समाजवादी राज्य आहे.

कलम २:—कामकरी प्रतिनिधींची सोव्हिएटस्...ही यू. एस. एस. आर. चा राजकीय पाया आहेत.

कलम ६:—जल, स्थल, जंगलें, गिरण्या, कारखाने, रेल्वे, जहाजें, विमानें, बँका, पोस्ट, तार, टेलिफोन, घरें-दारें, वगैरे सर्व लोकांच्या मालकीचीं आहेत.

कलम ७:—सामुदायिक शेतीव्यतिरिक्त, या शेतींत काम करणाऱ्या प्रत्येकाला स्वतःच्या उपयोगाकरतां एक जमिनीचा लहान तुकडा देण्यांत आला आहे. तेथें असलेलें घर, जनावरें, कोंबड्या, लहानसहान शेतकीचीं औतें, ही त्यांची खाजगी मालमत्ता आहे.

कलम ९:—कायद्यानें वैयक्तिक शेतकऱ्याला व हस्तव्यवसाय करणाराला, स्वतःच्या श्रमानें पैसा मिळविण्यास परवानगी आहे. फक्त त्यांत दुसऱ्याच्या श्रमाची पिळवणूक नसावी.

कलम १२:—काम करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व तो एक मान आहे. जो काम करीत नाहीं, त्याला खायला मिळणार नाहीं. समाजवादाचें

तत्त्व 'प्रत्येकाला त्याच्या शक्तीप्रमाणें व प्रत्येकाला त्याच्या कामाप्रमाणें' हें आहे.

कलम १३:—यू. एस. एस. आर. ची घटना फेडरल आहे. त्यांत १६ सोव्हिएट रिपब्लिकस आहेत.

कलम १४:—यांत यू. एस. एस. आर. च्या हक्कांचें निदर्शन केलें आहे. अंतरराष्ट्रीय संबंध, तह, युद्ध व शांतता, नव्या रिपब्लिक्सना परवानगी, सरहद्दी ठरविणें, संरक्षण, परराष्ट्रीय व्यापार, एकच अंदाजपत्रक सर्वांकरतां तयार करणें, सर्व उद्योगधंद्यांचे, शेतीचे व व्यापाराचें नियंत्रण, वहातुक, नाणीं, विम्याची व्यवस्था, कर्ज, शिक्षण व आरोग्याचीं मूलतत्त्वें ठरविणें, मजूर कायद्याचीं मूल तत्त्वें, दिवाणी फौजदारी कायदे, न्याय, नागरिकांचे व परक्या लोकांचे हक्क, कैद्यांना माफी देण्याचे कायदे.

कलम १५ व १६, १७:—युनिअन रिपब्लिकसचें सार्वभौमत्व हें १४ व्या कलमांनीं मर्यादित केलें आहे. त्या नियमांशिवाय बाकीच्या बाबतींत रिपब्लिक्सना स्वतंत्रपणें राज्यकारभार चालवितां येईल. यू. एस. एस. आर. च्या घटनेला विसंगत नसणारी घटना युनियनरिपब्लिकला करतां येईल. युनियन रिपब्लिक हे मध्यवर्ती सभेंतून फुटून जाऊं शकेल.

कलम २१:—नागरिकत्वाचे नियम सर्वांना सारखेच आहेत.

कलम ३०:—राज्यसत्तेचें वरिष्ठ मंडळ, यू. एस. एस. आर. चे सुप्रीम सोव्हिएट हें आहे.

कलम ३३:—सुप्रीम सोव्हिएटचीं दोन सभागृहें आहेत. युनिएनचे सोव्हिएट व नॅशनॅलिटींचे सोव्हियट.

कलम ३४:—युनियनचे सोव्हिएट हे यू. एस. एस. आर. च्या नागरिकाकडून ३ लाखाला एक याप्रमाणें निवडले जाते.

कलम ३५: —सोव्हिएट ऑफ नॅशनॅलिटीज हे प्रत्येक युनियनरिपब्लिकचे २५ प्रतिनिधी, प्रत्येक स्वयंशासीत रिपाब्लिकचे ११ प्रतिनिधी, प्रत्येक

स्वयंशासीत प्रदेशाचे ५ व प्रत्येक नॅशनल एरियाचा १ अशा प्रतिनिधींचे बनते.

कलम ३७, ३८, ३९:—दोन्हीं सभागृहांना सारखे हक्क असतात. ( त्यांची मुदत ४ वर्षांची असते ) त्यांना कायदे सुचविता येतात. पण प्रत्येक असा कायदा दोन्हीं गृहांत पास व्हावा लागतो. दोन्हीं सभागृहांच्या बैठकी एकदम सुरू होतात व संपतात.

कलम ४७:—दोन्हीं सभागृहांत जर भांडणें झालीं तर त्याचा निकाल तडजोड कमिटीनें लावावा. ह्या कमिटींत दोन्हीं गृहांचे समान प्रतिनिधी असतील. त्यांचा निकाल एकाहि सभागृहाला नापसंत वाटला तर त्याचा दोन्हीं गृहांत फेरविचार होईल. त्यांत जर पुनः एकमत झालें नाहीं तर प्रेसिडिअम नव्या निवडणूकांचा हुकूम सोडतें.

कलम ५६:—दोन्हीं गृहांच्या संयुक्त बैठकींत सुप्रीम सोव्हिएट आपलें सरकार म्हणजे कौंसिल ऑफ पिपल्स कमिशनर्स नेमतें.

कलम ५९:—सुप्रीम सोव्हिएट हें कायदेमंडळ आहे.

कलम ६१:—हें कायदेमंडळ प्रेसिडिअम निवडतें. त्यांत अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस व सभासद असतात.

कलम ६४:—पिपल्स कमिसार्सचें कौंसिल हें कार्यकारी व कारभारी मंडळ आहे. तें सुप्रीम सोव्हिएटला जबाबदार असतें.

कलम ७०:—या कौन्सिलांत अध्यक्ष, उपाध्यक्ष व ६ खातेंप्रमुख असतात.

इतर स्वयंशासित राज्यांच्या घटना याच नमुन्यावर केल्या आहेत.

## मूलभूत हक्क

कलम ११८:—यू. एस. एस. आर. च्या नागरिकांचा काम करणें हा हक्क आहे. याचा अर्थ त्यांना काम मिळवून देणें व त्या कामाच्या योग्यतेप्रमाणें व प्रमाणाप्रमाणें त्यांना वेतन देणें हा आहे.

कलम ११९:—नागरिकांना रजा व विश्रांतीचा हक्क आहे. रजेकरतां ७ तासाचा दिवस करण्यांत आला आहे. वार्षिक विश्रांती ही पगारी मिळते व त्यांच्या विश्रांतीच्या जागेची व्यवस्था करण्यांत येते.

कलम १२०:—म्हातारपण, आजारीपण व काम करण्याची अपात्रता असल्यास त्याना पोसले जाण्याचा हक्क आहे.

कलम १२१:—शिक्षण मिळणें हा त्यांचा हक्क आहे. शिक्षण मोफत, सक्तीचें व सार्वत्रिक आहे. उच्च शिक्षणाचीही व्यवस्था सुलभ केली आहे.

कलम १२२:—स्त्रीयांना, आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक, सामाजिक व सरकारी खात्यांत समान हक्क आहेत. त्यांच्याकरतां प्रसूतीगृहें, प्रसूतीपूर्वी व नंतर रजा, वगैरे व्यवस्था आहे.

कलम १२३:—वर्णभेद किंवा राष्ट्रीयत्व याचा विचार न करतां यू. एस. एस- आर. च्या सर्व नागरिकांना समान हक्क कायद्यानें प्राप्त होतात. त्यांत भेदाभेद केल्यास शिक्षा होते.

कलम १२४:—धार्मिक स्वातंत्र्य हें प्रत्येक व्यक्तीला आहे. फक्त राज्ययंत्रापासून चर्च हीं वेगळीं काढलीं आहे. धर्माविरुद्ध चळवळीला तेथें परवानगी आहे.

कलम १२५:—कामगार हिताशीं सुसंबद्ध असण्याकरितां, समाजवादी पद्धत सामर्थ्यशाली करण्याकरतां प्रत्येक नागरिकाला भाषण, मुद्रण, सभा-स्वातंत्र्य आहे. रस्त्यावरील निदर्शनें व मिरवणूकांनाहि स्वातंत्र्य आहे. त्याकरतां लागणारीं सर्व साधनें सरकार उपलब्ध करून देतें.

कलम १२६:—कामगारहिताला पोषक असे संघस्वातंत्र्य त्यांना आहे. सोव्हिएट युनियनच्या कम्युनिस्ट पक्षांत त्यांना जातां येतें. हा पक्षच राज्याचा पुढारी पक्ष समजण्यांत येतो.

कलम १२७, १२८:—कोणालाहि कायद्याशिवाय पकडता येत नाहीं, त्यांच्या घरावर आक्रमण करतां येत नाहीं व कोणाचा खासगी पत्रव्यवहार पहातां येत नाहीं.

कलम १२९:—जे परराष्ट्रांतील लोक कामगारांच्या हितरक्षणाकरितां छळले जात असतील, जे शास्त्रीय संशोधन करीत असतील किंवा राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ करीत असतील त्यांना रशियामध्यें आसरा मिळेल.

कलम १३०, १३१, १३२ व १३३:—या कलमांत जनतेच्या कर्तव्यांचा उल्लेख केला आहे. कायदे पाळणें, मजूरशिस्त पाळणें, प्रामाणिकपणें सरकारी कामें करणें, सभाजवाद्यांची संपत्ति ही पवित्र मानणें, त्याची नासधूस करणारे समाजाचे शत्रू समजणें, पितृभूमिचें रक्षण करणें, व हें पवित्र कर्तव्य समजणें वगैरे.

१९४४ मध्यें या घटनेंत दुरुस्ति करण्यांत आली. या दुरुस्तींत युनियन रिपब्लिक्सना सैन्यसंघटना करण्यास व परक्या राष्ट्रांबरोबर प्रत्यक्ष संबंध स्थापन करण्यास व करार करण्यास परवानगी देण्यांत आली.

★

# परिशिष्ट २

## अहिंसक राज्यघटना

म. गांधींना सत्य अहिंसेवर अधिष्ठित झालेली, अशी राज्यघटना हवी आहे. त्यांच्या घटनेचा आद्य घटक व्यक्ती आहे. त्यापुढील घटक खेडें आहे. प्रत्येक गांव सर्व दृष्टीनें स्वयंपूर्ण असावे म्हणजेच निरनिराळ्या स्पर्धेमुळें होणारी हिंसा टळूं शकेल, समाजांत सेवाभाव निर्माण होईल व प्रत्येक गांव हा एक स्वातंत्र्याचा भक्कम घटक होईल. म. गांधींच्या कल्पनेप्रमाणें औंध संस्थानांत घटना झाली आहे. तिचें यशापयश हें अर्थातच घटनेवर अवलंबून नसून ती घटना चालविणाऱ्या व्यक्तींवर अवलंबून आहे. वर्ध्याच्या व्यापारी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. अगरवाल यांनींहि गांधी घटनेवर पुस्तक लिहिलें आहे. याशिवाय म. गांधी वेळोवेळीं ह्या घटनेसंबंधीं हरिजनमध्यें लिहित असतातच.

श्री. अगरवाल यांनीं जी मूलभूत घटकाची–खेड्याची–घटना दिली आहे तीच येथें सारांशानें देत आहों.

प्रत्येक गांवांत प्रौढ मतदानांनीं निवडलेली पंचायत असावी. तींत साधारणपणें ५ सभासद असावेत. त्यांनीं आपला सरपंच निवडावा. त्यांचें

एकमत झालें नाहीं, तर गांवानें पंचापैकीं एकाची निवड करावी. ते पंच तीन वर्षें अधिकारावर रहावे. एखाद्या पंचावरचा विश्वास उडाला तर त्याच्याविरुद्ध शेंकडा ७५ टक्के मतें पडल्यास त्याला जागा खालीं करण्यास लागावे. ह्या पंचांचा गांवकामगारांवर अधिकार चालावा. विशेषतः अल्पसंख्याकांच्या बाबतींत पंचाचे ठराव एकमताचे असावेत.

त्यांचीं कामें:—

१ शिक्षण:—नईतालीम किंवा वर्धा योजनेनुसार प्राथमिक शिक्षण देणें. गांवांत वाचनालय व पुस्तकालय चालविणें; रात्रीची शाळा चालविणें.

२ करमणूक खेळ:—आखाडे, क्रीडांगणें ठेवणें. देशी खेळांना उत्तेजन देणें. कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविणें. सर्व जातींचें उत्सव सामुदायिक रीत्या साजरे करणें. जत्रा भरविणें. भजन व कीर्तनमंडळें स्थापणें. ग्रामीण गीतें, ग्रामीण नृत्य व ग्रामीण रंगभूमी यांना प्रोत्साहन देणें.

३ संरक्षण:—चोर, दरवडेखोर व रानटी जनावरापासून रक्षण करण्याकरतां खेड्यांतील रक्षक तयार करणें. सत्याग्रहाचें, अहिंसात्मक प्रतिकाराचें व संरक्षणाचें तंत्र समजावून सांगणें.

४ शेती:—खेड्यांतील प्रत्येक शेत तुकड्याचा खंड ठरविणें व तो वसूल करणें. जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण व सहकारी शेतीची प्रवृत्ती वाढविणें. पाटबंधाऱ्याची सोय करणें. सरकारी दुकानामार्फत उत्तम बीं बीयाणें व औतें पुरविणें. शक्य तर गांवाला लागणारे धान्य गांवांत उत्पन्न करणें. पैशाच्या पिकाला प्रोत्साहन न देणें. कर्जाची पहाणी, तपासणी व शक्यतर कर्ज कमी करणे व त्यांच्या व्याजाचे दर नियंत्रित करणें. शक्य तेथें सहकारी पतपेढ्या स्थापणें. जमीनीची धूप थांबविणें व नापिक जमीन संयुक्त प्रयत्नानें लागवडीस आणणें.

५ उद्योग:—खेड्याकरतां खादी निर्माण करणें. इतर उद्योग सहकारी तत्त्वावर सुरुं करणें. सहकारी दुग्धालय काढणें. म्हशीऐवजी गोपालनाला उत्तेजन देणें. मृत जनावरांची कातडी कमवण्याचा धंदा सुरू करणें.

६ व्यापार व धंदे:—शेतकीच्या व उद्योगाच्या पदार्थांकरतां सहकारी खरेदी विक्री सुरू करणें. खरेदीदारांची सहकारी संस्था काढणें. गांवच्या जरुरीपेक्षां जास्त असलेले पदार्थ बाहेर पाठविणें व जरुरीपुरतीच पदार्थांची आयात करणें. सहकारी भांडारें ठेवणें. खेड्यांतील कारागिरांना जरुरी करतां स्वस्तांत कर्ज मिळवून देणें.

७ स्वच्छता व आरोग्य:—गांवांत गटारें बांधून आरोग्य राखणें. लोकाकडून केली जाणारी घाण थांबविणें व सांथीच्या फैलावाला प्रतिबंध करणें. चांगल्या पिण्याच्या पाण्याची सोय करणें. खेड्यांत रुग्णालय व प्रसूतीगृह चालविणें. मोफत औषधोपचाराची व्यवस्था करणें. आयुर्वेद वगैरेची औषधें, निसर्गोपचार व बायो केमिस्ट्रीला उत्तेजन देणें.

८ न्याय:—लवकर थोडक्या खर्चांत न्याय मिळवून देण्याची सोय करणें. पंचायतीला दिवाणी व फौजदारी खटल्याबाबत जास्तीत जास्त कायदेशीर हक्क असतील. मोफत कायदेशीर सल्ला व माहितीची व्यवस्था करणें.

९ उत्पन्न व कर:—खेड्यावर विशिष्ट कामाकरतां कर बसविणें व वसूल करणें. हे कर बिगर पैशाच्या व श्रमाच्या स्वरुपांत मिळण्यास उत्तेजन देणें. सामाजिक व धार्मिक प्रसंगीं देणग्या मिळविणें. जमाखर्च नीट ठेवणें. लोकांना पहाण्यास व तपासण्यास ते खुले ठेवणें.

खेड्यानंतर तालुका, तालुक्यानंतर जिल्हा, जिल्ह्यांनंतर प्रांत व प्रांतानंतर देश अशी पुढील घटना बनविण्यांत आली आहे. वरच्या वरच्या संस्थाकडे जास्त मोठी व जास्त विभागाना लागू असणारी कामें दिली आहेत. पण सर्वांची कामें वरील धर्तीवर आखलीं आहेत. उदाहरणार्थ तालुक्याकडे हायस्कूलचें शिक्षण, जिल्ह्याकडे कॉलेजचें व प्रांताकडे युनिव्हर्सिटीचे शिक्षण सोपविलें आहे.

—मध्यवर्ती कायदेमंडळाचीं कामें कोणतीं याचा विचार आतां नव्या परिस्थितींत करावयाचा असल्यामुळें प्रो. अगरवाल यांची योजना पुनः लिहिली जावयास हवी. त्यामुळें ती किंवा प्रांतिकची योजना येथे

देण्यांत स्वारस्य नाहीं. फक्त त्यांनीं कल्पिलेले मूलभूत हक्क व कर्तव्यें येथें देत आहों.

## मूलभूत हक्क व कर्तव्य

१ कायद्याच्या दृष्टीनें सर्व नागरिक सारखे आहेत. जात, धर्म, वर्ण, पंथ, स्त्री-पुरुष, किंवा संपत्ति याचा विचार केला जाणार नाहीं.

२ नोकरी, मानसन्मान, उद्योगधंदे याला जात, धर्म पंथ याचा अडथळा होणार नाहीं.

३ अहिंसेचीं तत्वें व सार्वजनिक नीतिमत्ता सांभाळून प्रत्येक व्यक्ती हीं स्वतंत्र आहे. भाषण, सभा, चर्चा, व एकत्र येणें याला वरील बंधनें पाळून स्वातंत्र्य राहील.

४ सार्वजनिक शांतता व नीतिमत्ता याला विघातक नसणाऱ्या अशा सामाजिक चालीरीति आणि सद्सदविवेक बुद्धीला अनुसरून वागणें याला पूर्ण स्वातंत्र्य आहे.

५ लिपी, भाषा व संस्कृती यांचें रक्षण व वाढ करण्यास प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे.

६ सार्वजनिक उपयोगाकरतां खासगी व्यक्तींनीं दिलेल्या किंवा सरकारी अथवा स्थानिक पैशांतून चालविलेल्या विहिरी, तळीं, रस्ते, शाळा, धर्मशाळा या सर्व नागरिकांना सारख्याच उपलब्ध होतील.

७ प्रत्येकाला वर्धा शिक्षण मोफत मिळेल.

८ व्यक्तींच्या शरिरावर किंवा मालमत्तेवर कोणी अत्याचार, सक्ती किंवा धाकदपटशा दाखवित असेल तर त्याला पोलीस व कायद्याची मदत मिळेल

९ प्रत्येकाला प्रामाणिकपणें केलेल्या कामाच्या किंवा नोकरीच्या द्वारां जीवनवेतन मिळेल.

१० आठ तासापेक्षां कोणाकडून काम घेतलें जाणार नाहीं. यामुळें त्याला विश्रांति मिळेल.

११ वैद्यकीय स्वातंत्र्य प्रत्येकाला मिळेल. ( देवी काढणें किंवा टोचून घेणें यासंबंधीचे नियम दुरुस्त केले जातील )

१२ प्रौढ मतदानाच्या द्वारां प्रत्येक स्त्री पुरुषाला राज्यकारभारांत भाग घेतां येईल.

१३ कायदेकानूंची बंधनें पाळून प्रत्येकाला शस्त्रें ठेवतां व वापरतां येतील.

## कर्तव्यें

१ राष्ट्रीय संकट व परकीय आक्रमण यावेळीं विशेषतः, प्रत्येकानें आपल्या राज्याला एकनिष्ठ राहिलें पाहिजे.

२ प्रत्येकानें सार्वजनिक कल्याणाकरतां पैसा, धान्यधुन्य, किंवा श्रम कायद्याप्रमाणें दिलें पाहिजे.

३ परस्परांतील पिळणूक टाळणें, प्रतिबंध करणें व जरुर तर प्रतिकार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य राहील.

★

ता.
सातारा

# परिशिष्ट ३

## म. गांधीचे अहिंसक राज्य-घटनेचें कल्पना सूत्र

स्वातंत्र्य हिंदी लोकांचेंच समजलें पाहिजे. त्यांच्यावर जे सत्ता गाजवित आहे त्यांचें नव्हे. सत्तेखालीं असलेल्या लोकांचे इच्छेवरच राज्यकर्त्यांनीं अवलंबून असावयास पाहिजे. म्हणजेच, त्यांनीं लोकांचे सेवक असावयास पाहिजे; त्यांच्या इच्छेनुसार वागावयास पाहिजे. खालच्या थरापासून स्वातंत्र्याची सुरुवात झाली पाहिजे. म्हणजेच, प्रत्येक खेडें सर्वसत्ताधिकारी प्रजातंत्र किंवा पंचायत बनावयास पाहिजे. याचा अर्थ असा कीं, प्रत्येक ग्राम स्वयंपूर्ण आणि स्वसंरक्षणासहित सर्व कारभार सांभाळण्यास पात्र बनले पाहिजे. बाह्य आक्रमणाविरुद्ध स्वतःचा बचाव करतांना आत्मार्पण करून घेण्यापर्यंत त्याची तयारी असावयास पाहिजे तसें शिक्षण त्याला मिळालें पाहिजे. शेवटीं व्यक्ति हाच एकम् असतो. बाह्य जगाचा किंवा शेजाऱ्याचा स्वखुषीनें घेतलेला आधार किंवा साहाय्य याचा ह्यांत समावेश होत नाहीं असें नाहीं. पण हा स्वतंत्र आणि स्वखुषीचा विनिमय होईल. प्रत्येक पुरुष आणि स्त्री एकमेकांच्या गरजा ओळखू लागेल आणि त्याहिपेक्षां जास्त म्हणजे इतरांना समान परिश्रम करूनहि जें मिळत नाहीं तें मागणारच नाहीं. अशा प्रकारचा समाजच सुसंस्कृत ठरतो.

स्वाभाविकपणें समाज सत्य आणि अहिंसेवरच आधारलेला असणार. आणि सत्य आणि अहिंसा ही ईश्वरावरील जिवंत श्रद्धेशिवाय शक्य नाहींत. हा ईश्वर म्हणजे स्वयंभू, सर्वज्ञ, जगांतील सर्व शक्तींत अंतर्व्याप्त असलेली,

कोणावरहि अवलंबित नसलेली, आणि इतर सर्व शक्ति लोप पावतील किंवा कार्य करण्याचें सोडून देतील तरी कायम राहणारी, अशी चैतन्य शक्ति. या सर्वव्यापी चैतन्यशक्तीवर श्रद्धा ठेवल्याविना माझ्या स्वतःच्या जीवनाचें स्पष्टीकरण करतां येणें मला शक्य नाहीं.

असंख्य खेड्यांच्या या रचनेंत सतत विस्तार पावणारीं अनेक वर्तुळें राहतील. एकावर एक अशीं वर्तुळें राहणार नाहींत. ज्याच्या शिरोबिंदूला तळाचा आधार आहे असें मानवी जीवन सूच्यग्रस्तंभ राहूं शकत नाहीं. परंतु तें महासागरांतील विस्तृत वर्तुळासारखें राहील आणि त्याचा मध्य बिंदू खेड्यासाठीं आत्मबलिदान करण्यास तत्पर असणारी व्यक्ति राहील.

हें खेडें ग्रामसमूहासाठीं बलिदान करण्यास तयार राहील, सर्वांचें जीवन एक होऊन जाईल. हें जीवन अशा लोकांचें असेल का जें उद्धट आणि आक्रमक नसतील पण नम्र आणि सेवाभावयुक्त असतील. ज्या महान् जीवनाचे ते मूलभूत एकम् असतील त्याची भव्यता त्यांच्या ठिकाणीं आलेली असेल.

म्हणून बाह्यतम परिघाला आंतील वर्तुळांना चिरडून टाकण्याची शक्ति राहणार नाहीं तर तो आंतील वर्तुळांना शक्ति प्रदान करील. त्याचप्रमाणें केन्द्राकडून स्वतःला शक्ति प्राप्त करून घेईल. हें सर्व हवेंतले किल्ले आहेत व त्याचा जरासुद्धां विचार करण्याचें कारण नाहीं असा ह्यावर कोणी आरोप करील. मानवाकडून प्रत्यक्ष काढतां येणार नसला, तरी ज्याप्रमाणें युक्लिडच्या बिंदूला अमर मूल्य आहे, त्याचप्रमाणें मानव जातीला जगण्यासाठीं मी काढलेल्या वरील चित्रालाहि मूल्य आहे. ते पूर्णपणें कृतींत उतरणारें नसलें तरी त्या सत्य चित्रांसाठीं हिंदुस्थानला जगूं द्या. पूर्ण चित्राच्या जवळपास येणारे चित्र हातीं येण्यापूर्वीं आपणांस काय पाहिजे आहे ह्याचें पूर्ण चित्र आपल्याजवळ असलें पाहिजे. हिंदुस्थानचें प्रत्येक खेडें जर कधींकाळीं प्रजातंत्र बनावयाचें असेल तर माझ्या चित्राच्या सत्यतेबद्दल माझा दावा कायम राहील. ह्या माझ्या चित्रांत शेवटचा आणि पहिला सारख्याच दर्जाचा राहील किंवा कोणी पहिला किंवा शेवटचा ही कल्पनाच राहणार नाहीं.

ह्या चित्रांत प्रत्येक धर्माला संपूर्ण आणि समान स्थान आहे. पृथ्वीच्या गर्भांत ज्याचीं मूळें खोल रुजलीं असल्यामुळें ज्याचा बुंधा मजबूत आणि अविचल बनला आहे अशा वैभवशाली वृक्षाचीं आपण सर्व पानें आहोंत. केवढेहि जोरदार वादळ त्याला हलवूं शकत नाहीं.

या व्यवस्थेंत मानवी श्रमाची हकालपट्टी करणाऱ्या आणि मोजक्या लोकांच्या हातांत सत्ता केंद्रित करणाऱ्या यंत्रास मुळींच वाव नाहीं. सुसंस्कृत मानवी कुटुंबांत श्रमाला अपूर्व स्थान आहे. व्यक्तीला साहाय्य करणाऱ्या यंत्रालाहि स्थान आहे. परंतु तें यंत्र कोणते असावें याबाबत मी कसल्याहि प्रकारचा विचार करूं शकलों नाहीं हें मला कबूल केलें पाहिजे. मी सिंगर शिवण-यंत्राबाबत विचार केला परंतु तो सुद्धां वरवरच. माझ्या या चित्रांत त्याला स्थान देण्याची मला गरज भासत नाहीं.

माझ्या हेतूसिद्धिसाठीं जे हवे ते घटना समितीमध्यें सांठवलेले आहे. सरकारी पत्रकांत आशादायक कांही नाहीं हे माझ्या परिमित आशेचे कारण नव्हे. त्याचें स्वरूप ऐच्छिक असल्यामुळें त्याला बहुसंख्य पक्षाची सामान्य मान्यता लागेल. या पक्षांचे ध्येय एक नाहीं. स्वातंत्र्यांत काय येतें ह्यावर कॉंग्रेसजनांचेंसुद्धां मतैक्य नाहीं. अहिंसा किंवा चरखा किंवा विकेंद्रीकरण ह्यांना पूर्ण मान्यता आणि ग्राम हेंच मूलबिंदु मानण्यास तयार असणाऱ्या अशा लोकांची संख्या किती आहे हे मला माहित नाहीं. या उलट, मला हें ठाऊक आहे की, हिंदुस्थान पहिल्या दर्जाचे लष्करी राष्ट्र असावे, तसेंच प्रबळ केंद्रिय सरकार असावे आणि त्या सभोंवती सर्व समाजरचना व्हावी असे इच्छिणारे बरेच लोक आहेत. या संघर्षाच्या गोंधळांत जर शुद्ध विचारावर आधारलेल्या शुद्ध कृतीचें नेतृत्व हिंदुस्थानकडे येणार असेल तर ईश्वर ह्या मोठ्या माणसांच्या बुद्धिमध्यें गोंधळ निर्माण करणार नाहीं आणि खेड्यांना त्यांच्या इच्छेनुसार आपल्या आकांक्षा प्रगट करण्याची शक्ति तोच त्यांना देईल हें मी जाणतो.

—'हरिजन' वरून
२८।७।४६

———

नगर वाचनालय ता. सातारा.